# जिंकणाऱ्याचे जग

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय व्या० वा०
दा. क्र. ७६७६८

: लेखक :

मेजर शं. गं. चाफेकर

मूल्य : रु. ३·००

IRBK-0116167
IRBK-0116167

व्हीनस प्रकाशन : पुणे

# जिंकणाऱ्याचे जग

: लेखक :

मेजर शं. गं. चाफेकर

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
क्र. १६१६८ नों दि ४।८।८५
वि. वा. वा.

मूल्य : रु. ३·००

IRBK-0116167
IRBK-0116167

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ती पहिली
आक्टोबर १९६५

© मेजर शं. गं. चाफेकर

चित्रकार :
श्री. जोशी

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
'तपश्चर्या'
३८१ क, शनिवार पेठ : पुणे २

मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ : पुणे २

## समर्पण

ज्यांनी आपल्या जिद्दीने, कर्तबगारीने, त्यागाने, ध्येयनिष्ठेने आणि कर्तव्यबुद्धीने शारीरिक शिक्षणक्षेत्रांत शून्यातून महाराष्ट्रीय मंडळाचे विश्व निर्माण केले त्या माझ्या सुहृदास, कॅप्टन शिवराम विष्णु दामले यांस, ही अल्पकृती सादर, सप्रेम अर्पण करीत आहे.

२३ ऑक्टोबर १९६५ **शं. गं. चाफेकर**

# प्रास्ताविक

हे पुस्तक युवकांकरिता लिहिले आहे. आजची मुले उद्याचे नागरिक आहेत. ( Children of today are the citizens of tomorrow. ) तीच उद्याच्या समाजाची घटक आहेत. आपल्या देशाचा कारभार नजीकच्या भविष्यकाळात त्यांच्याच हाती जाणार आहे. तीच भविष्याची शिल्पकार आहेत. उद्याच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय जीवनावर त्यांच्याच कर्तृत्वाचे, कल्पकतेचे, संघटना-कौशल्याचे ठसे उमटणार आहेत. उद्याचे नेते आजच्या मुलांतून निर्माण व्हायचे आहेत. समाजनौकेचे तेच कर्णधार होणार आहेत.

भारताचा प्रातिनिधिक क्रिकेट-संघ निवडताना भारतातील उत्कृष्ट फलंदाज, यष्टिरक्षक वेचून काढून त्यांचा राष्ट्रीय संघात अंतर्भाव करण्यात येतो. उद्याच्या संघाकरिता शाळा-कॉलेजांतील होतकरू क्रिकेटपटूंना तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण देण्यात येते. मग उद्याच्या समाजाचे नेतेपण ज्यांच्याकडे जाणार आहे त्यांचे, त्यांच्यावर पडणाऱ्या जबाबदाऱ्यांकरिता मार्गदर्शन करावयास नको काय ? दुर्दैवाने या महत्त्वाच्या प्रश्नाकडे पुढाऱ्यांचे तर राहोच पण बहुसंख्य पालकांचे, त्यांना जन्म देणाऱ्या व त्यांच्या भवितव्याची जबाबदारी असणाऱ्या त्यांच्या मातापित्यांचेही लक्ष नाही असे खेदाने म्हणावे लागते. आपल्या मुलाचे भवितव्य ठरविणारे किती पालक आढळतात ? आपल्या मुलात कोणते गुण आहेत, कोणते अवगुण आहेत, त्याच्या सवयी काय आहेत, त्याचे मित्र कोण आहेत, तो काय वाचतो, काय पाहतो, काय बोलतो, काय ऐकतो, त्याचा कल कोणत्या गोष्टीकडे आहे, भविष्याबद्दल त्याच्या कल्पना, त्याच्या आशा-आकांक्षा काय आहेत

याचा विचार किती पालक करतात? आपल्या वर्गात शिकणाऱ्या मुलांचे मार्गदर्शन किती शिक्षक व प्राध्यापक करतात! देशाकरिता नवे पुढारी तयार केले पाहिजेत, घडविले पाहिजेत असे किती पुढाऱ्यांस वाटते?

रस्त्यावर दिवे व पाट्या कशाकरिता लावण्यात येतात? रस्त्यांतील खाचखळगे पथिकास दिसावे, त्यास हवा असणारा रस्ता त्यास सहज सापडावा याकरिता हे दिवे व पाट्या लावलेल्या असतात. मग जीवनाच्या वाटेवर पदार्पण करणाऱ्या युवकांचे मार्गदर्शन करण्याकरिता त्यांना जीवनातील खाचखळगे दाखवून देण्याकरिता असे दिवे व पाट्या नकोत काय? आपल्याकडे वाङ्मय विपुल निर्माण होत आहे ही गोष्ट खरी आहे, पण युवकांचे मार्गदर्शन करणारे वाङ्मय किती निर्माण होत आहे? युवकांच्यापुढे उत्कृष्ट आदर्श ठेवणारे, त्यांच्यातील सुप्त आकांक्षांना जागृत करणारे, त्यांच्यातील सत्प्रवृत्तींना आवाहन करणारे, त्यांना चारित्र्यसंपन्न बनविणारे, त्यांच्यात ध्येयनिष्ठा, जिद्द, महत्त्वाकांक्षा धैर्य, साहस, उमेद, आशावाद उत्पन्न करणारे वाङ्मय कितीसे निर्माण होते?

जग व विशेषतः आपला देश संक्रमणावस्थेतून जात आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या देशाची, समाजाची नवी घडी बसवायची आहे. त्याकरिता त्यागी, ध्येयनिष्ठ, प्रामाणिक, देशप्रेमी, निःस्वार्थी, कल्पक, संघटनाकुशल नेतृत्वाची जरूर आहे. आज चोहींकडे स्वार्थ, लोभ, मत्सर, जातीयवाद, वशिलेबाजी, अहंकार, चैनबाजी, सुखलोलुपता यांचे साम्राज्य पसरले आहे. म्हणूनच जीवनात यशस्वी होण्याकरिता, नेतृत्वाकरिता आवश्यक असणाऱ्या गुणांची जोपासना युवकांच्या मनात करावयास पाहिजे; तरच त्यांतून सुदृढ नेतृत्व निर्माण होईल.

या छोट्या पुस्तकात जीवनात यशस्वी होण्याकरिता लागणाऱ्या गुणांची जोपासना युवकांत करण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. अशा तऱ्हेचे वाङ्मय मुलांच्या हाती पडले पाहिजे. त्यांच्यांत ईर्ष्या, महत्त्वाकांक्षा, धैर्य,

ध्येयनिष्ठा उत्पन्न व्हावी हा या पुस्तकाचा हेतू आहे. मी शालेय व कॉलेज जीवनांत सॅम्युअल स्माइल्स, लॉर्ड अॅव्हबरी व अमेरिकन लेखक ओरिसन स्वेट मॉर्डन यांची पुस्तके वाचली होती. त्यांच्याप्रमाणे आपणही मराठी भाषेत युवकांकरिता पुस्तक लिहावे असे घोळत होते. व्हीनस प्रकाशनचे संचालक व माझे मित्र श्री. पाध्ये यांच्याजवळ मी गेल्या ( १९६४ ) मार्च महिन्यात व्हीनस प्रकाशनच्या रौप्य महोत्सवाच्या वेळीं सहज बोललो. श्री. पाध्ये यांना ती कल्पना फार आवडली, व त्यांनी "तुम्ही पुस्तक लिहून द्या, प्रकाशन करणे माझ्याकडे लागले" असे म्हटले. त्याचाच परिपाक म्हणजे हे पुस्तक होय. ते युवकांस आवडेल असा विश्वास वाटतो.

२३ ऑक्टोबर १९६५
पुणे

शं. गं. चाफेकर

* * *

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रयत्नान्ती परमेश्वर | ... | १ ते ६ |
| २. | ध्येयनिष्ठा | ... | ७ ते १७ |
| ३. | स्वावलंबन | ... | १८ ते २४ |
| ४. | साहसे श्री वसति | ... | २५ ते ३१ |
| ५. | संपत्तीशिवाय श्रीमंती | ... | ३२ ते ३७ |
| ६. | अडचणी : अडसर का वरदान ? | | ३८ ते ४४ |
| ७. | निर्णय | ... | ४५ ते ५१ |
| ८. | यश आणि संपत्ती—आहे तुमच्या हाती | | ५२ ते ५८ |
| ९. | कृतीशिवाय गती नाही | ... | ५९ ते ६५ |
| १०. | लक्ष्मी असता उभी दारी | ... | ६६ ते ७२ |
| ११. | विचार हाच उपचार | ... | ७३ ते ७७ |
| १२. | निरुद्योग हा महारोग | ... | ७८ ते ८२ |
| १३. | छोट्या गोष्टींतील मोठी शक्ती | ... | ८३ ते ८८ |
| १४. | चारित्र्य | ... | ८९ ते ९६ |
| १५. | जिद्द | .. | ९७ ते १०२ |
| १६. | भीती करी सर्वस्वाची माती | ... | १०३ ते १०८ |
| १७. | माझा देश | ... | १०९ ते ११६ |

९६९६८ - ६।८।६५
ग्रा० वा०

# प्रयत्नान्ती परमेश्वर

१

'प्रयत्नान्ती परमेश्वर' ही म्हण सर्व सुशिक्षितांना माहीतच आहे. पण ही म्हण प्रत्यक्ष व्यवहारात आणताना मात्र फारच थोडी माणसे आढळून येतात. म्हणूनच जगात 'परमेश्वर' कमी दिसतात. ज्यांचे यश डोळ्यांत भरण्यासारखे असते, ज्यांनी लक्षावधी रुपये कमावले आहेत, ज्यांचे नाव घेताच ते ऐकणाराचे कर आपोआप जुळतात, ज्यांचे नाव वाचताच हृदय कृतज्ञतेने भरून येते अशी माणसे आपणास जगात किती आढळतात? 'फारच थोडी'—असेच उत्तर द्यावे लागते, याचे कारण बहुसंख्य माणसे जीवनात पहिलाच अडथळा आला, पहिलेच अपयश आले, पहिलीच टीका ऐकली, प्रतिकार होतो आहे असे दिसून आले, वाटेतले खाचखळगे दिसू लागले व यशाचा पल्ला फार लांब आहे असे वाटू लागले, की नाउमेद होऊन प्रयत्न सोडून देतात, हाती घेतलेले काम टाकून देतात. मुंबईत चौपाटीवर लोक भेळ खाऊन कागद फेकून देतात तसेच जीवनाच्या रस्त्यावर अर्धवट सोडून दिलेल्या कामांचे कागद इतस्तत: पडलेले आढळून येतात.

प्रत्येक कार्य सहजगत्या करता येण्यासारखे असते तर जगात अपयशच दिसले नसते. प्रत्येकजण यशस्वी, सुखी व आनंदी दिसला असता. पण जगात, व्यवहारात यश मिळणे इतके सोपे नसते. यशाकरिता कष्टांचे, श्रमांचे, घामाचे मोल द्यावे लागते. वाण्याकडे दोन पैसे टाकून खडीसाखर विकत घेण्याइतके यश मिळविणे सोपे नसते.

इंग्रजीत एक म्हण आहे "There is no royal road to success, wealth, honour and fame." तुम्हांस संपत्ती, प्रतिष्ठा, कीर्ती हवी असेल तर त्याकरता कष्ट केले पाहिजेत, प्रयत्न केले पाहिजेत. या गोष्टी आपोआप, विनासायास मिळू शकत नाहीत. सर रोनाल्ड रॉस या शास्त्रज्ञाचे नाव कोणास ठाऊक नाही ? मलेरियाचा डास शोधून काढून त्याने जगावर अनंत उपकार करून ठेवले आहेत. त्यास नोबेल पारितोषिक मिळाले. त्याच्या नावे लंडनमध्ये Ross Institute of Tropical Diseases ही वैद्यकीय संस्था आहे. जगातील अनेक विश्वविद्यालयांनी त्याच्यावर पदव्या व पदके यांची खैरात केली. पण सर रोनाल्ड यास अनेक वर्षे रात्रंदिवस कष्ट करावे लागले. दिवसामागून दिवस, रात्रीमागून रात्री, हजारो निर-निराळ्या डासांचे विच्छेदन तो करीत राहिला. अनेक वर्षांच्या कष्टानंतर मलेरियाच्या गूढाचा उलगडा झाला. त्याने कष्ट केले नसते, जागरणास कंटाळून आपले प्रयोग बंद केले असते तर आणखी अनेक वर्षे या गूढाचा उलगडा झाला नसता.

एकदा आपले ध्येय निश्चित केल्यावर ते गाठण्याकरता कराव्या लागणाऱ्या कष्टांचा कंटाळा करू नका. एव्हरेस्ट शिखर जिंकण्याकरता, निसर्गावर मात करण्याकरता १९२० सालापासून गिर्यारोहक प्रयत्न करीत होते. अनेक देशांतील गिर्यारोहकांनी अनेक मोहिमा आखल्या. काही गिर्यारोहक पाय घसरून दहा दहा हजार फूट खोल दऱ्यांत कोसळून मृत्यू पावले. लँबर्ट एव्हरेस्टच्या शिखरापासून फक्त ६००–७०० फूट अंतरावर पोचूनही प्रतिकूल हवामानामुळे त्यांस माघार घ्यावी लागली. एव्हरेस्ट चढून काय मिळणार होते ? वर काय सोने होते ? पण मानवाचे निसर्गावर मात करण्याचे ध्येय आहे. मानवाच्या कर्तबगारीची, कर्तृत्वाची, चिकाटीची, शारीरिक क्षमतेची ती एक

कसोटी होती. म्हणून गिर्यारोहक जिद्दीस पेटले. शेवटी मानवी प्रयत्नास १९५३ साली यश मिळाले. शेरपा तेनझिंग व हिलरी यांनी एव्हरेस्ट जिंकले. त्याआधी तेनझिंगने ६ वेळा एव्हरेस्टवर चढण्याचा प्रयत्न केला होता. प्रत्येक वेळी त्यास अपयश आले. पण तेनझिंग नाउमेद झाला नाही. जणू काय तो एव्हरेस्टला म्हणत होता, " बरे आहे, बच्चंजी ! या खेपेस तू जिंकलेस खरे ! पण तुला जिंकल्याशिवाय मी राहणार नाही." ही जिद्दच शेवटी उपयोगी पडली. सातव्या खेपेस त्यास यश मिळाले. दर खेपेस तो अधिकाधिक उंच उंच जात होता. शेवटी त्याने शिखर गाठले.

प्रत्येक वेळी प्रत्येकास आपले ध्येय गाठताच येईल असे म्हणता येणार नाही. पण त्या ध्येयाच्या अधिक जवळ मात्र हमखास जाता येते. एव्हरेस्ट २९१४२ फूट उंच आहे. तुम्ही तेवढे चढू शकला नाही तरी ५–१०–१५–२० हजार फूट जरूर चढू शकाल. एव्हरेस्टची उंची बघून हातपाय गाळलेत तर तुम्ही पायथ्याशीच राहाल, पण प्रयत्न केलात तर अर्ध्या उंचीपर्यंत म्हणजेच ध्येयाच्या अधिक जवळ पोचाल यात शंका नाही.

स्कॉटलंडच्या रॉबर्ट ब्रूस राजाची गोष्ट हेच तत्त्व शिकविते. राजा ब्रूस सहा वेळा पराभूत झाला होता. शत्रू त्याच्या मागे लागला होता. त्यास चुकविण्याकरता तो रानावनातून वणवण हिंडत होता. एकदा शत्रू पाठीवर होता त्यास चुकविण्याकरता एका गुहेत तो लपून बसला. गुहेच्या वरच्या टोकास एक कोळ्याचे जाळे होते. त्याचा एक धागा गुहेच्या जमिनीस टेकला होता. कोळी जमिनीवरून त्या धाग्याच्या सहाय्याने वर जाण्याचा प्रयत्न करीत होता. राजा कुतूहलाने कोळ्याकडे पाहत होता. पहिल्या खेपेस फूट–दीड फूट कोळी धाग्यावरून वर चढला पण तितक्यात तो घसरून फिरून जमिनीवर आला. कोळी फिरून चढू

लागला. या खेपेस तो ३—३।। फूट चढला व फिरून घसरून खाली आला. राजाचे कुतूहल वाढले. आता कोळी काय करतो ते तो पाहू लागला. कोळी फिरून वर चढू लागला. प्रत्येक वेळेस तो पहिल्यापेक्षा अधिक उंचीवर पोहोचे; पण दरवेळेस घसरून फिरून खाली येई. असे सहा वेळा झाले. कोळी इतक्या अपयशानंतर वर चढण्याचा प्रयत्न सोडून देईल असे ब्रूसला वाटले. पण प्रयत्न सोडण्याऐवजी कोळी फिरून सातव्या खेपेस वर चढू लागला. एक एक इंच तो वर जाऊ लागला. १-२-३-४-५-६-७-८-९ फूट ! आता जाळे काही इंचांवर होते. कोळी सावकाश चढत राहिला. शेवटी त्याने जाळे गाठले. ब्रूस थक्क झाला. त्याचाही सहा वेळा पराभव झाला होता. तो निराश झाला होता. पण कोळ्याने त्यास धडा शिकविला. त्याने कोळ्यापासून स्फूर्ती घेतली. त्याने फिरून सर्व सैन्य जमविले. सातव्या खेपेस त्याची शत्रूशी गाठ पडली. या खेपेस ब्रूसला जय मिळाला त्याचे राज्य त्यास फिरून मिळाले. 'प्रयत्नान्ती परमेश्वर' या म्हणीची सत्यता त्यास पटली.

म्हणून तरुणांनो, जीवनात पहिले अपयश येताच तुम्ही नाउमेद होऊ नका. उलट अपयशाने खचण्याऐवजी जास्त जोमाने, अधिक उत्साहाने व हिरीरीने कामास लागा. अपयश आले की आत्मसंशोधन करा. अपयश का आले याची चिकित्सा करा. आपल्यातील ज्या दोषामुळे, कमतरतेमुळे अपयश आले असे तुम्हांस वाटेल ते दोष व ती कमतरता काढून टाका व फिरून प्रयत्न करा. इंग्रजीत Failures are stepping stones to success अशी म्हण आहे. अपयशच यशाची पायरी आहे हे लक्षात ठेवा.

जीवनात पहिल्या प्रयत्नातच भरघोस यश पदरात पडले असे क्वचितच घडते. यशाकरिता कष्टाची किंमत द्यावी लागते. थॉमस एडिसनने सुमारे १ हजार नवे शोध लावले हे ऐकून आपण थक्क होतो.

पण त्याच एडिसनला इतर शेकडो प्रयत्नांत अपयश आले होते. एकेका शोधाकरिता रात्रीचा दिवस करून तो प्रयोग करीत बसे. तो तहान-भूक विसरून जाई. प्रत्येक वेळी प्रयोगातल्या चुका तो दुरुस्त करी. म्हणूनच एडिसनला अपूर्व यश मिळाले. तो अपयशाने नाउमेद झाला नाही. अपयशाच्या पायावरच यशाचे मंदिर उभे राहते.

भारताचा जलमार्ग शोधण्याकरिता धाडसी युरोपियन नावाडी शंभरांहून अधिक वर्षे प्रयत्न करीत होते. कित्येक जहाजे बुडाली. कित्येकांचा पत्ता लागला नाही. कित्येक नावाडी अपयश घेऊन परत आले. पण या अपयशाने त्यांचा धीर खचला नाही. भारताचा मार्ग शोधण्याकरिता कोलंबस निघाला. समोर अथांग अटलांटिक महासागर पसरला होता. वाटेत सोबतचे एक जहाज परत गेले. ६०-७०-८० दिवस एकसारखे जहाज पाण्यातून पुढे जात राहिले. बरोबरचे खलाशी बेचैन झाले. कोलंबस आपणास जलसमाधी देणार असे त्यांना वाटू लागले. खलाशांपैकी काहीजण बंडाचा विचार करू लागले. आता आपणास आपला देश, बायका-मुले फिरून दिसणार नाहीत असे त्यांना वाटू लागले. पण कोलंबस धीरोदात्त होता. तो म्हणे— " घाबरू नका. आणखी थोडी कळ काढा. माझ्यावर विश्वास ठेवा. " पण खलाशी नाउमेद झाले होते. ते ' परत चला ' म्हणून कोलंबसाच्या मागे लागले. पण कोलंबस तसाच पुढे जात राहिला. इतक्यात एके दिवशी त्यांना समुद्रातून वाहत जाणाऱ्या झाडाच्या फांद्या दिसल्या. ज्या ठिकाणी फांद्या तुटल्या होत्या त्या जागा अजून पांढऱ्या दिसत होत्या. त्याचा अर्थ त्या नुकत्याच तोडलेल्या होत्या असा होता. म्हणजेच किनारा फार लांब नाही असा निष्कर्ष निघत होता. आता खलाशांचा उत्साह वाढला. लौकरच एके रात्री त्यांना दूर अंतरावर जाळ दिसला. त्यांचा आनंद गगनात मावेना. अखेर ते जमिनीजवळ पोचले. कोलंबस काही खलाशांना घेऊन बेटावर

उतरला. त्याने ईश्वराचे आभार मानले. अशा रीतीने अमेरिकेचा शोध लागला. कोलंबस जर सुरुवातीच्या अपयशाने नाउमेद झाला असता, खलाशांच्या निराशेचा संसर्ग त्याने आपणास होऊ दिला असता, व आपला प्रयत्न सोडला असता तर आणखी अनेक वर्षे अमेरिका अज्ञातच राहिली असती. कोलंबसाच्या प्रयत्नामुळेच तो यशस्वी झाला

x x x

## ध्येयनिष्ठा

## २

गुरुदेव द्रोणाचार्य आपल्या शिष्यांची परीक्षा घेत होते. गुरुकुलातील पांडव, कौरव, कर्ण आदी विद्यार्थी धनुर्विद्येची परीक्षा देत होते. द्रोणाचार्यांनी एका उंच झाडाच्या फांदीवर एक कृत्रिम पक्षी ठेवला होता. ठराविक अंतरावरून नेम धरून पक्ष्याचा वेध घ्यावयाचा होता. सर्व विद्यार्थी लांब अंतरावर उभे होते. ज्याचे नाव पुकारले जाई तो विद्यार्थी पुढे येई. पहिला विद्यार्थी पुढे आला. त्याच्या हाती धनुष्यबाण होता. आचार्यांनी त्यास नेम धरण्यास सांगितले. त्याने प्रत्यंचेवर बाण चढवला. एक पाय पुढे ठेवून त्याने बाणासह प्रत्यंचा कानापर्यंत मागे ओढली. तेव्हा आचार्यांनी त्यास विचारले, " तुला काय दिसत आहे ? " शिष्य म्हणाला, " आचार्यदेव ! मला तुम्ही, झाडे, आकाश, ढग दिसत आहेत. " आचार्य म्हणाले, " थांब, बाण सोडू नको. पलीकडे जाऊन उभा राहा. तुझी तयारी पुरी झाली नाही. " शिष्य हिरमुसला होऊन मागे गेला. दुसऱ्या शिष्यास बोलावण्यात आले. त्याने पवित्रा घेतला. पुन्हा आचार्यांनी तोच प्रश्न विचारला. तोही शिष्य म्हणाला, " मला आकाश, झाडे, फळे, ढग, आपण व माझे वर्गबंधू दिसत आहेत. " फिरून आचार्यांनी म्हटले, " थांब, बाण सोडू नको. तुझी अजून धनुर्विद्येची तयारी झाली नाही. " प्रत्येक शिष्य पुढे येई. तोच प्रश्न विचारला जाई. बहुधा तेच उत्तर मिळे. आचार्य प्रत्येकास नापास करीत होते. अखेर अर्जुनाची पाळी आली.

त्याने आकर्ण प्रत्यंचा ओढली. आचार्यांनी प्रश्न केला, "तुला काय दिसत आहे?" तत्काल उत्तर आले, "मला फक्त त्या पक्ष्याची मान दिसत आहे." "शाबास! अर्जुना, तू खरी धनुर्विद्या शिकलास. ज्यास लक्ष्याशिवाय दुसरे काही दिसत नाही, सुचत नाही तोच खरा धनुर्धारी सोड आता बाण!" प्रत्यंचेचा टणत्कार झाला. बाण सू सू करीत फांदीवरच्या पक्षाच्या मानेत घुसला. दुसऱ्या क्षणी मानेतल्या बाणासह पक्षी खाली पडला.

महाभारतातील ही गोष्ट बहुतेकांस माहीत असेल. पण ही गोष्ट आपणास काय शिकविते? एकदा एक ध्येय, एक लक्ष्य ठरविल्यावर त्यावरच आपले सर्व लक्ष, सर्व शक्ती केन्द्रित केली पाहिजे; तरच यश मिळते, सिद्धी मिळते ही महान शिकवण ही गोष्ट आपणाला शिकविते. पण रोजच्या जीवनात किती माणसे ही शिकवण अमलात आणतात? बहुसंख्य लोकांना ध्येयच नसते. परिस्थितीच्या लाटांबरोबर जीवन-समुद्रात ते सुकाणूविरहित जहाजाप्रमाणे भरकटत असतात. म्हणूनच ते यशाचे बंदर गाठू शकत नाहीत. प्रत्येक तरुणाने जीवनात पदार्पण करताना आपले कार्यक्षेत्र विचार करून, आपले शिक्षण, बौद्धिक पात्रता, शारीरिक क्षमता लक्षात घेऊन निश्चित केले पाहिजे व त्या क्षेत्रात आपण काय कामगिरी करणार हे ठरविले पाहिजे. या बाबतीत त्याचे शिक्षक व त्याच्या मातापित्यांनी त्याला मार्गदर्शन केले पाहिजे. पण केवळ आई-वडील किंवा शिक्षक सांगतात म्हणूनच एखादे कार्य-क्षेत्र निवडणेही योग्य होणार नाही. निवडलेल्या कार्याबद्दल तुमच्यात आवड व प्रेम पाहिजे. नाही तर तो जुलुमाचा रामराम ठरेल. ज्या कार्याबद्दल, कामाबद्दल तुम्हांस आवड नाही ते काम तुम्ही कधीच चांगले करू शकणार नाही, हात एका कामात गुंतलेले असताना मन दुसऱ्याच कामाचा विचार करीत असल्यास तुम्ही ते काम यशस्वीरीत्या करू

शकणार नाही. अनेक वेळा मातापित्यांच्या, नातेवाईक वा वडीलधाऱ्या माणसांच्या सांगण्यावरून कार्यक्षेत्र निवडण्यात येते. पण त्यात तुमचे मन रमत नाही. तुम्ही काम निष्काळजीपणे करू लागता. त्या क्षेत्रात तुम्ही कधी पुढे येऊ शकत नाही. आयुष्याच्या शेवटी यशाच्या परीक्षेत तुम्ही अपयशी ठरता.

पुष्कळ वेळा आपण पाहतो की वडील डॉक्टर किंवा वकील असले व त्यांची प्रॅक्टिस चांगली असली तर त्यांची इच्छा मुलाने वकील किंवा डॉक्टर व्हावे अशी असते. " येवढी प्रॅक्टिस द्यायची तरी कुणाला ? तू पास होण्याचा अवकाश की ही सर्व प्रॅक्टिस तुलाच मिळेल." असे वडील मुलास सांगतात. मुलास व्हायचे असते एंजिनियर. वडिलांच्या आग्रहाने मुलगा वकील होतो. तो कोर्टात जातो. पण त्याचे मन तेथे नसते. त्याला सारखे वाटत असते की हे आपले कार्यक्षेत्र नाही. पण तेथून त्यास बाहेर पडता येत नाही. चरकात हात सापडल्यासारखी त्याची स्थिती होते; व शेवटी त्यास वकिलीत यश मिळत नाही.

आज दोन पिढ्यांपूर्वीसारखे जीवन संथ नाही. गतिमान व अधिक धकाधकीचे बनले आहे. मानवाचे कार्यक्षेत्र अधिक विशाल बनत आहे. नव्या शोधांमुळे, वाढलेल्या गरजांमुळे जीवनकलह तीव्र बनला आहे; व ही तीव्रता एकसारखी वाढत आहे. ज्याला इंग्रजीत स्पेशलायझेशन म्हणजेच विशिष्ट पारंगतता म्हणता येईल ती वाढत आहे. म्हणून आजच्या या नव्या मनूत आपली सर्व मानसिक शक्ती व शारीरिक क्षमता, विचार करून निवडलेल्या कामावर केंद्रित करणे आवश्यक आहे. चिकाटीने, निश्चयाने, धैर्याने काम करीत राहिलात तरच हाती घेतलेल्या कार्यात तुम्हांस यश मिळेल. कोठल्याही विलोभनास बळी पडून कार्याकडे दुर्लक्ष केलेत तर तुमच्या कपाळी अपयश येईल. अर्धवट माहिती असलेल्या, जुजबी तांत्रिक ज्ञान असलेल्या डझनभर गोष्टी केल्यात तरी

त्यांत तुम्हास यश मिळणार नाही. पण ज्या धंद्याचा किंवा विशिष्ट ज्ञानाचा तुम्ही पूर्ण अभ्यास केला असेल व ज्यांत तुम्हांस गोडी वाटते अशा एकाच धंद्यात तुम्हांस अमाप यश किंवा संपत्ती मिळेल.

पुण्यात पूर्वी एक गृहस्थ पाण्याच्या नळाचे पितळी कॉक ( तोट्या ) बनवीत. आणि त्यात ते एवढे पारंगत बनले की अनेक वर्षे झाली तरी त्यांची तोटी गळत नसे. त्यांच्या तोट्यांना इतकी मागणी असे की, ती त्यांस पूर्ण करता येत नसे. त्यांच्या तोट्यांस लोक खुषीने इतर तोट्यां-पेक्षा सव्वापट किंमत अधिक देत कोल्हापूरला पूर्वी शेठ शिवराम बापू उपळेकर हे प्रसिद्ध जवाहिऱ्ये होते. ते प्रथम मिरजेच्या एका प्रसिद्ध सराफी पेढीत काम करीत. पेढीचे मालक रत्नपारखी होते. त्यांच्यापाशी शिवरामबापूंनी जवाहिरांचा सूक्ष्म अभ्यास केला. हल्ली मोती व हिरे खरे आहेत का नकली आहेत हे पाहण्याकरता विद्युत् व प्रकाशलहरींचा उपयोग करतात पण शिवराम बापू नुसत्या नजरेने रत्नांची पारख करीत. मोठमोठे संस्थानिक व मुंबई—कलकत्त्याचे शेठजी शेठ शिवरामबापूंकडे रत्नांची पारख करवून घेण्याकरिता येत, व लाखो रुपयांचे व्यवहार शिवरामबापूंच्या शब्दावर होत.

नेपोलियन एका वेळी एकाच गोष्टीवर आपले सर्व लक्ष केन्द्रित करीत असे. लढाईस तोंड लागले की शत्रूच्या फळीतील कमकुवतपणा कोठे आहे हे पाहून आपली सर्व शक्ती, सर्व तोफांची मारगिरी त्या एका बिंदूवर केन्द्रित करून तो शत्रूची फळी फोडून टाकी. व्हिक्टर ह्यूगोने आपली ‘ नोत्रदाम ’ ही कादंबरी १८३० च्या क्रान्तिकाळात लिहिली. पॅरिसमध्ये हलकल्लोळ माजला होता. राजवटीविरुद्ध बंड सुरू झाले होते. त्याच्या घराच्या छपरावरून व बागेत गोळे पडत होते. पण व्हिक्टर ह्यूगोने स्वतःस एका खोलीत कोंडून घेतले. अंगावरचेही कपडे उतरून ते दुसऱ्या खोलीत ठेवून त्या खोलीची किल्ली मुद्दाम

फेकून दिली. हे कशाकरता? तर आपणास बाहेरील गंमत बघायची इच्छा होऊ नये, व झाली तरी कपडे मिळू नयेत ह्याकरता गोळ्यांच्या कडकडाटाकडे, लोकांच्या ओरड्याकडे लक्ष न देता सर्व लक्ष त्याने आपल्या कादंबरीवर केन्द्रित केले. म्हणूनच जगाला एका अमर कथेचा लाभ झाला, व ह्यूगोचे नाव अजरामर झाले.

जे लोक आपल्या कार्यक्षेत्राची नीट निवड करून आपले लक्ष त्यावर केन्द्रित करतात, एका वेळी एकच गोष्ट करतात, तेच यश मिळवितात, नाव कमावतात. नटसम्राट बालगंधर्व यशस्वी का झाले? त्यांनी एकदा नाट्यक्षेत्राची निवड केल्यावर सर्व लक्ष त्यावर केन्द्रित केले. त्या काळी पुरुषच स्त्रीपार्टे करीत. बालगंधर्वांना सौंदर्याची ईश्वरदत्त देणगी होतीच, पण त्यांनी स्त्रियांच्या हालचालीचा, बोलण्याचा, आविर्भावांचा, लाजण्याचा इतका सूक्ष्म अभ्यास केला होता की त्यांचे काम पाहताना ते पुरुष असून स्त्रीचे सोंग करीत आहेत ही कल्पनाही प्रेक्षकांच्या मनास शिवत नसे. भामिनी, रुक्मिणी, सिंधू ह्या सर्व खऱ्या स्त्रियाच आहेत असे वाटे. असे सांगतात की पैजेखातर एकदा बाल-गंधर्व एका स्त्रियांच्या हळदीकुंकवाच्या समारंभास जाऊन आले. स्त्रीची दृष्टी सूक्ष्म असते, पण समोर असलेली स्त्री नसून पुरुष असेल असे कोणाच्याही मनास शिवले नाही. आपल्या क्षेत्रात बालगंधर्वांनी अमाप संपत्ती व कीर्ती मिळविली. ते नटसम्राट बनले.

आपण बडे गुलाम अली खाँ, तिरखवाँ, भास्करबुवा बखले यांना त्यांच्या क्षेत्रातील सम्राट समजतो. पण आपल्या क्षेत्रात नाव कमावण्या-साठी त्यांनी रक्ताचे पाणी केले. आठ-आठ दहा-दहा तास घसाफोड केली. तिरखवाँनी बोटांतून रक्त येईपर्यंत तबल्यावर सराव केला म्हणूनच ते तबलानवाज बनले. तुम्ही कोणतेही क्षेत्र वा काम निवडा; ते निवडण्यापूर्वी विचार करा; पण एकदा एक क्षेत्र किंवा काम निवडल्या-

वर त्यात आपला सर्व जीव ओता. कष्टाचे खतपाणी घातल्यावर यशाचा पारिजातक आपोआप फुलतो. वेब्स्टरचा इंग्रजी शब्दकोश जगप्रसिद्ध आहे; पण तो लिहिण्याकरता त्यास छत्तीस वर्षे लागली. गिबनने ' रोमन साम्राज्याची अवनती व विनाश ' हा ग्रंथ लिहिण्यात २० वर्षे घालविली. या नव्या मनूत, नव्या रोज वदलणाऱ्या जगात एकाच माणसास अनेक क्षेत्रांत तितक्याच क्षमतेने काम करणे अशक्य आहे. एका व्यक्तीने एकाच गोष्टीवर आपले लक्ष केन्द्रित केले पाहिजे इंग्रजीत ' Jack of all trades but master of none ' अशी म्हण आहे ती अगदी सार्थ आहे. आपणा सर्वांस पोवळे माहीत आहे. खरे पाहता पोवळ्याचे सूक्ष्म कीटक समुद्रतळाशी असतात. पण हेच सूक्ष्म कीटक अनेक मैलांच्या क्षेत्रावर समुद्राच्या तळापासून पोवळ्याचे डोंगर रचीत वर येतात व त्यांची बेटे बनतात.

वैज्ञानिकांच्या मते १०० एकर जमिनीवर पडणाऱ्या सूर्यकिरणांत असलेली शक्ती जर केन्द्रित करता आली तर त्या शक्तीवर जगातील सर्व कारखाने चालविता येतील. सूर्य सर्व जगावर प्रकाशतो, पण त्यामुळे कोठेच आगी लागत नाहीत. कारण त्या किरणांची शक्ती विखुरली जाते. पण जर दुर्बिणीतून तेच किरण कागदावर केन्द्रित केले तर कागद जळू लागतो हे आपण पाहतो. माणसातील कर्तृत्वशक्ती जर तो विखरू लागला, एकाच वेळी अनेक क्षेत्रांत अनेक कामे करू लागला तर त्याच्याने एकही काम नीट होणार नाही त्याने आपल्या कर्तृत्वाची किरणे एका बिंदूवर केन्द्रित केली तर त्या क्षेत्रात तो अजब करामत करून दाखवू शकेल. बंदुकीत जर अनेक छरे घातले तर दारूची शक्ती त्या अनेक छऱ्यांमागे विभागली जाते व ते छरे दूरवर जाऊ शकत नाहीत. पण जर एकच गोळी घातली तर मागील दारूची सर्व शक्ती त्या एकाच गोळीवर केन्द्रित होऊन ती दूर जाऊन इच्छित

लक्ष्याचा वेध घेऊ शकते. एकच ध्येय ठरवून ते गाठण्याकरता आपली सर्व शक्ती वेचली पाहिजे. टिळकांनी आपल्यापुढे स्वराज्याचे एकच ध्येय ठेवले. त्यांची बुद्धिमत्ता तीव्र. अनेक क्षेत्रांत ती गतिमान होती. तत्त्वज्ञान, गणित, ज्योतिष, व्याकरण या क्षेत्रांत ते अजत्र करामत करू शकले असते. त्यांना जो फुरसतीचा वेळ मिळाला, मंडालेच्या तुरुंगात जो वेळ मिळाला, त्या वेळात त्यांनी तत्त्वज्ञान, गणित व ज्योतिष क्षेत्रात ओरायन, आर्क्टिक होम इन् द वेदाज व ग्रंथराज गीतारहस्य लिहून आन्तरराष्ट्रीय कीर्ती मिळविली. पण त्यांनी एकदा राजकीय क्षेत्र निवडल्यावर आपला प्रत्येक क्षण व सर्व शक्ती आणि बुद्धी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात खर्च केली, स्वराज्याचा पाया घातला, लोकांत ‘ स्वराज्य ’ मिळविण्याची जिद्द उत्पन्न केली, म्हणूनच ते लोकमान्य बनले.

ध्येयनिष्ठा हीच यशाची गुरुकिल्ली आहे. यशस्वी मनुष्य जीवनाच्या सुरुवातीसच जीवनाचा कार्यक्रम व वेळापत्रक ठरवितो. तो आपल्या ध्येयाकडे जाणारा रस्ता पकडतो, व तो कधी सोडीत नाही. हे केन्द्रीकरणाचे युग आहे. जे कार्यक्षेत्र आपण निवडतो त्याचे शिक्षण घेतले पाहिजे, पूर्वतयारी केली पाहिजे. त्याकरता असामान्य बुद्धिमत्तेची जरूर नाही. एकच काम चांगले शिका. जगभर स्विस घड्याळे प्रसिद्ध आहेत. ह्या घड्याळांचे प्रचंड मोठाले कारखाने नाहीत. हा कुटिर-उद्योग आहे. वेगवेगळी माणसे वेगवेगळे भाग तयार करतात. आणि तेच काम सारखे करीत राहिल्याने प्रत्येक मनुष्य आपले काम करण्यात वाकबगार बनतो. कोणी कारागीर नुसते बॅलन्स चक्रच बनवितात, तर काही तास-काट्याची व मिनिट-काट्याची चक्रे बनवितात. पण प्रत्येकजण आपल्या कामातला तज्ज्ञ असतो. पुण्यात माझ्या माहितीचे एक अल्पशिक्षण मिळालेले गृहस्थ आहेत. पण यंत्रे बनविण्याकरिता जे ‘ डाईज ’ लागतात ते बनविण्यात ते इतके निष्णात आहेत की, त्यांचा हात

धरणारा मनुष्य पुण्यात नाही. केसरी छापखान्यात श्री. गायकवाड नावाचे तंत्रज्ञ आहेत. त्यांना लौकिकी शिक्षण नाही. त्यांना एंजिनीअरिंगची डिग्री नाही, पण छापण्याच्या यंत्रांची त्यांच्याइतकी माहिती असलेला मनुष्य उभ्या महाराष्ट्रात सापडणे कठीण आहे. दोन वर्षांपूर्वी केसरी छापखान्याने जर्मनीतून नवीन विजेवर चालणारे प्रचंड रोटरी मशीन मागविले. साधारणपणे त्या कंपनीचा तंत्रज्ञ यंत्र बसवून देण्यास येतो, व त्याचा खर्च खरेदीदारास करावा लागतो. पण श्री. गायकवाड यांनी " जर्मन तंत्रज्ञाची जरूर नाही; मी हे मशीन बसवून दाखवितो " असे आत्मविश्वासाने सांगताच त्यांच्या कौशल्याची जाणीव असलेल्या केसरीच्या विश्वस्तांनी विश्वासाने त्यांच्यावर ते काम सोपविले. मशीनबरोबर फक्त डबल पोस्ट कार्डाच्या आकाराचा यंत्राचा आराखडा आला होता. पण श्री. गायकवाडांनी फौन्डेशनपासून सर्व यंत्र उभारून ते यशस्वी रीत्या चालवून दाखविले. पुढे जर्मन कंपनीचा प्रतिनिधी आला व त्यानेही तोंडात बोट घातले. आज मुंबईपासून बेळगावपर्यंत कुठलेही छापखान्याचे यंत्र नादुरुस्त झाले की गायकवाडांना आमंत्रण येते. एकाच विषयास सर्वस्वी वाहून घेतल्यास कसे यश व कौशल्य प्राप्त करून घेता येते हे वरील उदाहरणावरून दिसून येईल.

पण हे कौशल्य, ही पारंगतता सहजासहजी, चुटकीसरशी येत नाही. त्याकरता दीर्घकाळ कष्ट करावे लागतात. पुष्कळजण निवडलेल्या क्षेत्रात काही दिवस काढल्यावर झटपट यश वा पारंगतता मिळत नाही हे पाहून, निराश होऊन ते क्षेत्र सोडून नव्या क्षेत्रात पदार्पण करतात. पण त्यामुळे केलेले श्रम, घालविलेला काळ, व मिळविलेली पारंगतता वाया जाते; व नव्या क्षेत्रात फिरून श्रीगणेशापासून सुरुवात करावी लागते. म्हणून प्रथम कार्यक्षेत्र विचार करून निवडा, पण ते एकदा

निवडल्यावर ते सोडण्याची घाई करू नका प्रत्येक वेळी कार्यक्षेत्र बदलू लागलात तर तुमचे बूड कोठेच टिकणार नाही.

पैलवान व्हावयास अनेक महिने, वर्षे घालवावी लागतात. रोज ४-४ तास मेहनत करून परत संध्याकाळी ४-४ तास लढत करावी लागते हळूहळू त्याच्या दंडाचा, मांडीचा, छातीचा, मानेचा, पोटरीचा घेर वाढू लागतो. अंगात रग येऊ लागते. डावपेच आत्मसात होऊ लागतात. त्याचा आत्मविश्वास हळूहळू वाढू लागतो मगच तो जगास आव्हान देऊ शकतो

कोणत्याही धंद्यात तुम्ही उमेदवारी करताना तुम्हांस हळूहळू त्या धंद्याचे बारकावे लक्षात येऊ लागतात, कौशल्य येऊ लागते व शेवटी आत्मविश्वास उत्पन्न होऊन तुम्ही यशस्वी होता. एका दिवसात तुम्हांस यश मिळणार नाही. डॉन ब्रॅडमनने लहानपणीच आपणास क्रिकेटला वाहून घेण्याचे ठरविले. बॉलवर नजर बसणे ही फलंदाजीची गुरुकिल्ली आहे. बॉल बॅटच्या कडेवर लागल्यास झेल उडतो, फटका जोरदार बसत नाही. बॉल बॅटच्या मध्यावर बसला पाहिजे. त्याला एकसारखा सराव करावा लागतो. नजर बसावी म्हणून ब्रॅडमन स्टम्पने गॉल्फचा चेंडू भिंतीवर मारून तो परत आला की फिरून तो स्टम्पनेच मारण्याचा सराव करू लागला. बॅट रुंद असते; तिच्या मानाने स्टम्प अगदीच छोटी. पण तो २०—२० वेळा स्टम्पने भिंतीवरून परत आलेला चेंडू एकदाही न चुकता मारू लागला तेव्हा त्याला बॅटने शेकडो चेंडू न चुकता मारणे हातचा मळ वाटू लागला. त्यामुळेच तो फलंदाजीत विक्रम करू शकला.

पुष्कळ लोक आपण निवडलेले कार्यक्षेत्र झटपट यश मिळत नाही असे दिसताच ते बदलून दुसरे, मग तिसरे, मग चौथे कार्यक्षेत्र निवडतात. असे करणारास यश कधीच मिळत नाही. दुसऱ्या क्षेत्रात

दुसऱ्यास यश मिळाले म्हणजे तुम्हांसही ते हमखास मिळेल असे समजणे योग्य नाही. दुसऱ्यातले गुण, ज्ञान, चिकाटी आपणात आहे का नाही हे तुम्ही पाहत नाही. हातचे सोडून पळत्याच्या पाठीशी लागणारा नेहमी फसतो. मन चंचल असता कामा नये. चंचलता ही यशाचा सर्वांत मोठा शत्रू असते. दोन मित्र किंवा ओळखीचे गृहस्थ भेटले की प्रथम एकमेकांस "हल्ली काय करता?" असा प्रश्न विचारतात. याचा अर्थ काय? तुम्ही पूर्वी करीत असलेले काम किंवा धंदा आता करीत असाल की नाही याची शंका येऊनच हा प्रश्न विचारला जातो असा नाही का त्याचा अर्थ?

काही लोकांना वाटते की एकसारखे एकच काम करीत राहिल्यास त्यात शेवटी यश मिळणारच. पण हेही सर्वस्वी खरे नाही. सातत्य उपयुक्त खरे, पण त्यासही मर्यादा आहेत ज्यात तुम्हांस गती आणि मती नाही अशा कार्यक्षेत्रात तुम्ही कितीही वर्षे काम केलेत तरी यश मिळणार नाही म्हणूनच मागे कार्यक्षेत्र निवडतानाच सर्व गोष्टीचा आधी विचार केला पाहिजे असे सांगितले आहे. जहाजाचे सुकाणू तुटल्यावर किती जरी एंजिने चालवली तरी जहाज इच्छित स्थळी कसे जाईल? त्याकरता एंजिनांची शक्ती, कप्टनचे नौकानयनाचे ज्ञान व दिशा नियंत्रित करणारे सुकाणू या सर्वांची गरज असते. एकदा कोणत्या बंदरी जायचे हे ठरले म्हणजे लाटा, वादळ, धुके यांची फिकीर न करता कप्तान ठरलेल्या मार्गाने जहाज हाकीत राहतो, व शेवटी इच्छित बंदरी पोचतो.

केवळ बुद्धी, केवळ ज्ञान, आवड, शक्ती असून चालत नाही. या सर्वांना कामास जुंपले पाहिजे, म्हणजेच ठराविक ध्येय गाठण्यात त्यांचा उपयोग करून घेतला पाहिजे. अटळ, अढळ, अचल ध्येयनिष्ठे-शिवाय जगात काहीही साध्य करता येत नाही. लाखो लोक रोज

जन्मास येतात व रोज लाखो मरतात. त्यांपैकी कितीजणांचे नाव मागे राहते? त्यांपैकी कितीजण आपल्या समाजाच्या, राष्ट्राच्या, जगाच्या इतिहासात आपली नावे चिरंजीव करतात? ध्येयवादावरच मनुष्य जगतो. ध्येयाकरताच तो जन्मभर कष्ट उपसतो, व ध्येयाकरताच तो मरतो. जीवन कशाकरता जगायचे? केवळ पोटाकरता, सुखाकरता, चैनीकरता? मग मानवात व इतर प्राण्यांत फरक काय राहील? उच्च ध्येयाने प्रेरित होऊन, जीवनाशी झुंजत धैर्याने ध्येय गाठण्याचा प्रयत्न करणाराच शेवटी जिंकतो, व आपले नाव मागे ठेवून जातो.

# स्वावलंबन

३

जीवनात प्रत्येकास यश मिळावे असे वाटते. पण यश मिळते कोणास ? जो आपल्या पायावर उभा राहतो त्यालाच यश मिळते असे आपणास दिसून येईल. जीवनाच्या प्लॅटफॉर्मवर यशाच्या गाडीची वाट पाहणारास जन्मभर वाटच पाहत बसावे लागते. राजपुत्र लुई फिलिपला परागंदा व्हावे लागले होते. पण एक दिवस आपण फ्रान्सच्या गादीवर बसणार असा त्यास आत्मविश्वास होता. पुढे राजा झाल्यावर तो नेहमी म्हणे, " सर्व युरोपियन राजांत राजा होण्यास मी एकटा लायक आहे. कारण फक्त मीच स्वतःचे बूट स्वतः पॉलिश करू शकतो. "

पुष्कळ माणसांना वाटते की, आपल्या मुलांना कष्ट पडू नयेत, हालात राहावे लागू नये; म्हणून त्यांना पुष्कळ पैसा ठेवावा म्हणजे सुखी जीवन जगता येईल. पण असे करणारांना मला असे विचारावेसे वाटते, तुम्ही आपल्या मुलांना काय देणार ? पैसा ? हा पैसा त्यांना समृद्ध जीवन जगण्यास मदत करील काय ? पैसा मिळवण्याकरिता तुम्ही स्वतःवर शिस्तीचे बंधन घालून घेतले होते, अनुभव जोडला होता, शक्ती मिळवली होती. पैसा मिळवताना व त्याच्यात वाढ करताना तुम्हांला जो आनंद प्राप्त झाला, तुमचे जे शक्तिसंवर्धन झाले,—तत्परता, पद्धतशीरपणा, चिकाटी, उरक, व्यावहारिक प्रामाणिकपणा, सभ्य वागणूक, दूरदर्शीपणा, कसब, शहाणपणा, या गोष्टी तुम्ही शिकला. त्या गोष्टी तुम्ही आपल्या मुलास देऊ शकाल काय ? त्याच्या नावे

तुम्ही बँकेत पैसे ठेवाल, पण हे गुण तुम्ही बँकेत ठेवू शकणार नाही. ते त्याला स्वतःच्या स्वानुभवाने शिकले पाहिजेत. तुम्ही दिलेला पैसा तो उधळून टाकील. दुर्दैवाने बँकेचे दिवाळे निघाले तर कामाची, कष्टाची सवय नसलेली मुले काय करतील? म्हणून तुम्ही त्यांना पैसा ठेवू नका; कारण पैसा आला की आळस व सुखलोलुपता आपोआप येते; व ती मुले कुचकामी ठरतात. त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याकरता मोकळे सोडा. तेच शेवटी त्यांच्या हिताचे ठरेल."

जगामध्ये श्रीमंत माणसांची मुले पुढे आलेली तुम्हांस क्वचितच आढळतील. मध्यम व गरीब कुटुंबांतील मुलेच कष्ट व स्वावलंबनाच्या जोरावर पुढे आलेली तुम्हांस दिसतील कारण स्वतःच्या पायावर उभे राहण्याशिवाय त्यांना गत्यंतरच नसते जो दुसऱ्यावर विसंबतो तो नेहमी पस्तावतो. टिळक, गोखले, रानडे, आगरकर, चिपळूणकर, महर्षी कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, जोतिबा फुले, ज्ञानकोशकार केतकर ही सर्व माणसे त्यांना त्यांच्या वडिलांनी ठेवलेल्या पुंजीमुळे पुढे आली नाहीत. ती आपल्या हिमतीवर, कष्टावर, त्यागावर पुढे आली. गेल्या पिढीतील अनेक थोर माणसे म्युनिसिपालिटीच्या कंदिलाच्या उजेडात अभ्यास करून पुढे आली. काही एक शिक्षण नसलेला वीस वर्षांचा एक युवक संस्कृत शिकण्याच्या ईर्ष्येने गोव्याहून पुण्यास आला एका विद्वानाने त्या वीस वर्षांच्या युवकास इतक्या उशीराने तुला संस्कृत येणे व नीट उच्चार करणे शक्य नाही असे सांगितले. पण त्या युवकाने हिम्मत सोडली नाही. त्याने अपार कष्ट केले व शेवटी संस्कृत व पाली-भाषेचा पंडित म्हणून नाव कमावले. हेच महापंडित धर्मानंद कौसम्बी होत.

यशाच्या जगात फक्त कष्टाचे नाणेच चालते. दैव या नाण्यातच व्यवहार करते. जो कष्टाचे नाणे मोजतो त्याला दैव हवे ते देते. जगात कोणतीही गोष्ट आपोआप मिळत नसते. यशोमंदिराला दरवाजा नसतो;

त्याच्या चारी भिंती बंद असतात. ज्याला यशोदेवतेचे दर्शन घ्यायचे आहे त्याला बाहेरची भिंत फोडून स्वतःच द्वार बनवावे लागते. तो आत गेला की हे द्वार आपोआप बंद होते. यशोमंदिरात जाऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक भक्तास आपापला स्वतंत्र दरवाजा बनवावा लागतो.

जगात जी खरी मोठी माणसे असतात ती अनुकूल परिस्थितीमुळे पुढे येत नाहीत. विरोधाला तोंड देऊन अडचणींचा मार्ग त्यांना उल्लंघावा लागतो. गरिबी व हीन कुळ तुमच्या आड येऊ शकत नाही. कै. डॉ. आंबेडकरांचा जन्म तथाकथित अस्पृश्य समाजात झाला होता. त्या काळच्या समजुतीप्रमाणे संस्कृत शिक्षकाने त्यांना संस्कृत शिकविण्यास नकार दिला. दारिद्र्य जन्मापासून पाचवीला पुजले होते. पण बाबासाहेबांनी हिम्मत सोडली नाही. त्यांनी स्वावलंबनावर विद्या संपादन केली. दारिद्र्य, अस्पृश्यता, विरोध, असूया, मत्सर या सर्वांवर त्यांनी मात केली. ते एक विद्वान, कायदेपंडित, दलितांचे त्राते व भारताचे कायदा-मंत्री बनले व भारताच्या घटनेचे ते शिल्पकार बनले.

पूर्वी कोकणातून मुंबईला मचव्यातून किंवा अंतर कमी असल्यास नावेतून जात. एकदा एक नाव अनेक उतारू घेऊन निघाली. दुर्दैवाने एकाएकी वादळी हवा सुरू झाली. वारा उलटा वाहू लागला. वल्ही मारणारे नावाडी दमले. होडी उलटून सर्वांना जलसमाधी मिळणार असे वाटू लागले. नावेतील सर्वांत लठ्ठ प्रवासी सर्वांत जास्त घाबरला होता. तो नाखव्यास म्हणाला, “ आपली आता धडगत दिसत नाही. फक्त ईश्वरच आपणाला तारू शकेल. आपण सर्वजण मिळून देवाची मनोभावे प्रार्थना करू ” त्यावर नाखवा म्हणाला, “ प्रार्थना करून बोट बुडायची थांबणार नाही. वल्ही मारूनच आपणास मार्ग काढला पाहिजे. नावाडी दमले आहेत. तुम्ही चांगले सशक्त आहात. बसा फळीवर, व मारा वल्ही. प्रार्थनाच करायची असेल तर ते कोपऱ्यातले म्हातारे

वावा करू देत प्रत्येक जणाने सर्व शक्तीने वल्ही मारली तरच आपण पुढे जाऊ शकू " सर्वांना नाखव्याचे म्हणणे पटले. सर्वजणांनी पाळीपाळीने वल्ही मारली. वादळ कमी झाले. नाव सुखरूप बंदरास लागली. वल्ही न मारता सर्व प्रवासी नुसते प्रार्थनाच म्हणत राहिले असते तर बोट उलटून सर्वचजण देवापाशी पोचले असते.

मुंबईजवळच्या एका खाडीवरील पुलावरून गळ सोडून काही कोळी मासे पकडीत होते. प्रत्येकाने बरेच मासे पकडले होते. मासा गळाला लागला की तो काढून कोळी जवळच्या गोल टोपलीत टाकीत. इतक्यात तेथे एक तरुण येऊन मासेमारी बघत राहिला. तो बेकार दिसत होता, पण कष्ट करण्यास तो तयार नव्हता. नकळत त्याच्या तोंडातून उद्गार निघाले, " मला जर टोपलीभर मासे मिळाले तर काय छान होईल ! ते विकून मला चार पैसे मिळतील व रात्री जेवायला अन्न व रहायला आसरा मिळेल. " हे शब्द शेजारच्या मच्छीमाऱ्याने ऐकले. त्याने त्या तरुणाकडे दृष्टिक्षेप टाकला व त्याची परीक्षा केली. मच्छीमार त्यास म्हणाला, " तुला पाहिजेत तेवढे मासे मी तुला देतो पण माझे एक काम तू केले पाहिजेस. " तरुणाने उत्कंठेने विचारले, " काय काम आहे तुमचे ? " मच्छीमार म्हणाला, " मी येईपर्यंत तू गळ घेऊन येथे माझ्या जागी बस. मला थोडा वेळ कामाला जायचे आहे. " तरुणाने त्यास ताबडतोब कबुली दिली. मच्छिमाऱ्याने त्यास गळाला आमिष कसे लावायचे, गळ कसा टाकायचा हे दाखवून दिले व गळाची काठी तरुणाच्या हाती देऊन तो निघून गेला. बराच वेळ तो परत आला नाही. तरुण अधीर झाला, व मच्छीमार केव्हा परत येईल असे त्यास झाले. पण मध्यंतरी त्याच्या गळाला मासे लागू लागले. एकएक मासा काढून टोपलीत टाकून तो फिरून गळ पाण्यात टाकू लागला असे करता करता त्याचा आळस नाहीसा झाला. मासे गळाला लागण्याची

तो उत्कंठेने वाट पाहू लागला. भराभर मासे मिळू लागले. त्याला आता मच्छीमारीत रस वाटू लागला. त्याने बरेच मासे पकडल्यावर मच्छीमार परत आला. त्याने मूळ मासे पकडले होते तेवढे काढून त्या तरुणास दिले मग तो त्या तरुणास म्हणाला, " पाहा, माझे वचन मी पुरे केले. यापासून धडा शीक. नुसती इच्छा करून मासे मिळत नाहीत. त्याकरता गळ टाकावा लागतो, वाट पाहावी लागते, कष्ट करावे लागतात. यशरूपी मासा हवा असला तर कष्टरूपी गळाची आवश्यकता असते हे लक्षात ठेव."

स्वावलंबनानेच सर्व गोष्टी जगात साध्य होतात. भांडवल नाही, संधी नाही, म्हणून त्या गोष्टी मिळण्याची वाट पाहण्यातच हजारो तरुण आपला वेळ व्यर्थ दवडीत असतात. पण चिकाटी व कष्टाच्या पोटीच यश जन्मास येते मी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये असताना आम्हांस श्री देशपांडे नावाचे शिक्षक होते. ते कर्नाटकातून आले होते. घरची गरीबी, पण बुद्धीने कुशाग्र होते. मॅट्रिक पास होऊन ते पुण्यास आले व शाळेत शिक्षक झाले. शाळेत शिकवून ते उरलेल्या वेळी खाजगी शिकवण्या करीत. पगार शिल्कीत टाकून शिकवण्यांच्या पैशात ते खाणावळीत जेवून राहत. एक वर्ष शिक्षक म्हणून काम केले की एक वर्ष ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये स्वतः शिकत. शिल्कीत टाकलेल्या पैशांतून कॉलेजचे एक वर्ष पदरात पाडीत. प्रत्येक वेळी पहिल्या वर्गात पास होत. असे करीत ते बी. एस्. सी. झाले. पहिला वर्ग मिळाल्याने ते कॉलेजात डेमॉन्स्ट्रेटर–लेक्चरर झाले. एम. एस्सी. झाले. पुढे स्कॉलरशिप मिळवून फ्रान्समध्ये जाऊन बोर्डो युनिव्हर्सिटीचे पीएच्. डी. झाले. व शेवटी डॉ. बी. वी. देशपांडे मुंबईच्या रुइया कॉलेजचे प्रिन्सिपॉल झाले.

भारत आता स्वतंत्र आहे. आता आपणच आपल्या भवितव्याचे शिल्पकार आहोत. परकीय अमलात ज्या सवलती किंवा संधी मिळत

नव्हत्या त्या आता सर्वांस उपलब्ध आहेत. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तरुणांत आळस जास्त वाढलेला दिसतो. प्रत्येकास एकदम १०००— १५०० ची नोकरी हवी असते. त्याकरिता कष्ट करावयास आपण तयार नसतो. मग निराशा व विफलता पदरी पडते पुढे येण्यास वशिला लागतो, किंवा अलौकिक दैवी देणगी लागते,—अशी खोटी भावना निर्माण होते. पण जे असे म्हणतात त्यांना काम करावयास नको असते. आपल्या आळसाचा दोष ते अलौकिक दैवी देणगीच्या अभावाच्या माथी मारतात. इंग्रजीत Genius is an infinite capacity for laking pains असे म्हणतात. लोखंडाच्या ठोकळ्याला तापवून ठोकून हवा तो आकार देता येतो. कष्टाच्या ठोक्याने स्वतःच्या बुद्धीला योग्य वळण लावण्यास तरुणांनी शिकले पाहिजे. कै. प्रि. वामन शिवराम आपटे यांनी संस्कृत-इंग्लिश शब्दकोश लिहिला. तो आज मितीसही आधारभूत कोश समजला जातो. प्रि. आपटे बुद्धिमान होते म्हणून ते हा कोश रचू शकले नाहीत तर कष्टाच्या जोरावर ते तो लिहू शकले. इंग्रजी चौथीत ( हल्लीची आठवी ) संस्कृत अध्ययनास त्या वेळी सुरुवात होई. चौथीपासून पदवीधर होईपर्यंत नवा संस्कृत शब्द वाचनात आला की प्रि. आपटे लगेच त्याची व्युत्पत्ती, अर्थ, संदर्भ याविषयीची माहिती वहीत लिहून ठेवीत. याच वह्यांतून हा प्रचंड शब्दकोष बनला व सर्वांच्या कौतुकाचा विषय बनला.

प्राचीन ऋषी म्हणत, “ आत्मज्ञान करून घ्या ” आज असे म्हणावेसे वाटते, “ स्वावलंबी व्हा. ” स्वावलंबनात स्वतःला सुसंस्कृत बनविण्याचाही अंतर्भाव होतो. स्वावलंबनाने मानवाचा खऱ्या अर्थाने ‘ पुरुष ’ बनतो. स्वावलंबनाने आत्मविश्वास व स्वाभिमानही वाढतो. स्वतःचे काम स्वतः करण्यात लाज वाटण्याचे कारण नाही. अब्राहाम लिंकन मोठे झाल्यावर एके दिवशी एक गृहस्थ त्यांना भेटावयास गेले.

त्या वेळी लिंकन स्वतःच्या बुटाला स्वतःच पॉलिश करताना पाहून त्या गृहस्थास मोठे आश्चर्य वाटले; व तो त्यास म्हणाला, " काय लिंकन-साहेब, तुमचे बूट तुम्ही स्वतःच पॉलिश करता ? " लिंकनसाहेब हसून म्हणाले, " होय महाराज, मी माझे बूट स्वतःच साफ करतो, पण तुम्ही कोणाचे करता ? "

# साहसे श्री वसति

## ( हिम्मते मर्दा तो मदद ए खुदा )

४

इंग्रजीत Fortune favours the bold अशी म्हण आहे. वमर्दाला दैव अनुकूल असते असा त्याचा अर्थ आहे. दुर्बलाचे नशीब कधीच उघडत नाही. ' देवो दुर्बलघातकः ' असे संस्कृत सुभाषित आहे. जगात नाव कमवायचे असेल तर माणसाच्या अंगी साहस असले पाहिजे. तो बेडर असला पाहिजे. संकटांशी, अडचणींशी झुंजायची त्याची तयारी असली पाहिजे. जगात अनेक गुणी हुषार माणसे आपण पाहतो, पण त्यांच्या गुणांचे, हुषारीचे, कर्तबगारीचे चीज होत नाही. कारण त्यांच्यात साहस नसते. पहिले पाऊल पुढे टाकायलाच ते कचरतात. एकदा मनोधैर्य खचले की त्या माणसाच्या हातून काहीही मोठे कार्य होऊ शकत नाही. इंग्रजीत Cowards die many times before their death; the valiant taste of death but once. असे कवि-वचन आहे. मनोधैर्य खचले म्हणजे कर्तृत्व मरते.

एका लढाईत एका पलटणीतील एक तरुण अधिकारी पलटणीचे निशाण घेऊन पुढे घुसला. त्याच्याबरोबर सैनिकांची एक लहानशीच तुकडी होती. निशाणाच्या मागोमाग पलटण पुढे घुसणार होती. निशाण-तुकडी पुढे गेली पण शत्रूच्या मारगिरीमुळे व प्रखर विरोधामुळे पलटण मागेच राहिली. निशाण-तुकडी शत्रूच्या घेऱ्यात सापडेल अशी कर्नलला

भीती वाटू लागली. पलटणीचे निशाण हा पलटणीचा मानबिंदू असतो. निशाण गमावले की पलटणीची नाचक्की होते. म्हणून कर्नलने निशाण-अधिकाऱ्यास हुकूम फर्मावला, " निशाण घेऊन मागे फीर. " तरुण निशाणाधिकारी मर्दाचा बच्चा होता. निशाण मागे घेण्यात नामुष्की होती. त्याने उलट निरोप पाठविला, " निशाण मागे आणीत नाही. तुम्हीच पलटण पुढे आणा. " कर्नल लाजला. त्याने आगेकूचचा हुकूम दिला. विरोधास न जुमानता पलटण पुढे घुसली. लढाईचा रंग पालटला, साहसाने विजयश्री खेचून आणली !

अमेरिकेतील गोष्ट आहे. मोजणी खोत्याची तुकडी एका ओढ्याच्या काठावरील जमिनीची मोजणी करीत होती. मधली सुट्टी झाली. मोजणीदार खाण्यास बसण्याच्या तयारीत होते. इतक्यात एका स्त्रीच्या कंठातून निघालेली करुण किंकाळी त्यांना ऐकू आली. त्या दिशेने मोजणीदार धावले. काही लोक एका बे-भान झालेल्या स्त्रीस आवरून धरीत होते. मोजणीदारांना पाहताच ती स्त्री म्हणाली, " माझ्या बाळाला वाचवा हो वाचवा ! तो ओढ्यात वाहून जात आहे. हे लोक मला ओढ्यात जाऊ देत नाहीत. त्या स्त्रीचा मुलगा ओढ्यात आंघोळ करीत होता. अचानक ओढ्यास पूर आला व मुलगा त्याच्या धारेस लागला. ती स्त्री आपल्या मुलास वाचविण्याकरिता पाण्यात उडी मारावयास धावली. पण तीही ओढ्यात वाहून जाईल अशी भीती वाटून बरोबरच्या लोकांनी तिला धरून ठेवले. अपत्यस्नेहाने ती स्त्री बेभान झाली होती, ओढ्यास जबरदस्त ओढ होती. प्रवाहात प्रचंड खडक होते. काही अंतरावर एक छोटा धबधबा होता. त्यात मुलगा सापडला की त्याचे शरीर छिन्नविछिन्न झाले असते. आईचा जीव खाली-वर होत होता.

मोजणीदारांत एक युवक होता. त्याचे शरीर भरदार व चेहरा करारी होता. त्याने तत्काल अंगातील कोट काढून फेकून दिला.

ओढ्याकडे पाहिले. दूर मुलाचे डोके दिसताच कसलाही विचार न करता त्याने ओढ्यात उडी घेतली. मुलाच्या दिशेने जोरदार हात मारीत तो पाणी कापू लागला. वाहत जाणाऱ्या मुलाचे डोके पाण्यावर दिसत होते. मधेच ते दिसेनासे होई, व पाच सात क्षणांनंतर ते फिरून दिसू लागे. खडकावर आपटण्याची भीती होती. धबधब्यात मूल अडकले की ते वाचणे शक्य नव्हते. त्याच्या आत त्या मुलास बाहेर काढणे आवश्यक होते. बरोबरचे लोक व त्या मुलाची आई किनाऱ्याच्या काठाने धावत होती. सर्वांचे लक्ष त्या तरुणावर केन्द्रित झाले होते. तो मुलाच्या जवळ येत होता. अंगदी जवळ जाऊन तो पोचला. उजव्या हाताने त्याने मुलास धरले. मग डाव्या हाताच्या पायांच्या जोरावर तो किनाऱ्याकडे येऊ लागला. प्रवाह त्यास खाली खेचून नेत होता. धबधबा जवळ जवळ येत चालला. त्याच्या आधी तो किनाऱ्याला लागेल का नाही याची उत्कंठा किनाऱ्यावरील लोकांना लागली होती. नाही तर दोघेही मरण्याची भीती होती. तरुणाने शेवटचा जोर केला. तो उथळ पाण्यात येऊन पोचला. तो उभा राहिला. किनाऱ्यावरील लोकांनी दोघांनाही ओढून बाहेर काढले. मूल बेशुद्ध झाले असले तरी जिवंत होते. मुलाच्या आईने मुलास कवटाळले. अश्रुपूर्ण नयनांनी तिने मुलाच्या प्राणदात्याचे आभार मानले. हा तरुण मोजणीदार दुसरा तिसरा कोणी नसून पुढे प्रसिद्ध झालेला अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धातील सेनापती व संयुक्त संस्थानांचा ( U. S. A. ) पहिला अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन होता. भविष्य काळात तो ज्या साहसाबद्दल प्रसिद्ध झाला ते साहस त्याच्या अंगी जन्मतःच होते. या साहसी वृत्तीमुळेच स्वातंत्र्यसंग्रामात त्याने ब्रिटिश फौजांस धूळ चारली, व आपल्या देशास स्वतंत्र केले.

१७९६ च्या इटलीतील मोहिमेत नवोदित नेपोलियनने अपूर्व व नेत्रदीपक विजय मिळविले. त्याने युद्धतंत्रात क्रान्ती घडवून आणली.

पण नेपोलियन हा आघाडीच्या मागे स्वतः सुरक्षित जागी राहून दुसऱ्यास हुकूम सोडणारा सेनापती नव्हता, तर आघाडीवर लढाईच्या धुमश्चक्रीत सैनिकांचे वैयक्तिक मार्गदर्शन करणारा तो शूर सेनानी होता. वरील मोहिमेत लोदी गावाजवळ एक नदी ओलांडायची होती. नदीवर पूल होता. पुलाच्या पलीकडे ऑस्ट्रियन शत्रूच्या १४ तोफा होत्या. फ्रेंचांच्या बाजूच्या पुलाच्या टोकावर त्यांची लक्ष्यवेधी मारगिरी सुरू होती. पुलापलीकडे ऑस्ट्रियन फौज पूल ओलांडणाऱ्या फ्रेंच सैनिकांचा समाचार घेण्यास सिद्ध होती. पूल लवकर ओलांडणे आवश्यक होते. नदीच्या अलीकडे नेपोलियनने ४००० सैनिक व तीन बंदूकधारी पलटणी एकत्रित केल्या. नेपोलियनने त्यांना पूल ओलांडून शत्रूच्या तोफा बंद पाडण्याचा हुकूम दिला. पडघम वाजू लागले. तुताऱ्यांच्या निनादांनी आकाश दुमदुमले व फ्रेंच सैनिक पुलाच्या रोखाने पुढे घुसले. ऑस्ट्रियन तोफा धडधडू लागल्या. बंदुका तडतडू लागल्या. फ्रेंच सैनिक तोफांच्या टप्प्यात येताच ते तोफांच्या गोळ्यांस पटापट बळी पडू लागले. पुढचे मेले. मागल्यांची हिम्मत खचू लागली. फ्रेंच सैनिक मागे हटू लागले. नेपोलियन चटकन पुढे झाला. एका पलटणीचे निशाण त्याने स्वतःच्या हाती घेतले. त्याने सैनिक व अधिकाऱ्यांकडे एक दृष्टिक्षेप टाकला. दुसऱ्या क्षणी नेपोलियन निशाण घेऊन पुढे घुसला. त्याचे ते साहस पाहून सैनिक व अधिकारी लाजले, व त्याच्यामागे धावले. मागे, पुढे, बाजूस सैनिक पटापट पडत होते. पण नेपोलियन तसाच वेगाने पुढे जातच राहिला. पाव पूल, अर्धा पूल, पाऊण पूल त्याने ओलांडला. त्याचे अलोट साहस पाहून सैनिक विजयघोष करीत त्याच्यामागून दौडू लागले. विस्मयाने हे अपूर्व दृश्य ऑस्ट्रियन सैनिक पाहत राहिले. पूल ओलांडला गेला. फ्रेंच सैनिक तोफांवर तुटून पडले. तोफा बंद पडल्या. ऑस्ट्रियन सैन्य पळू लागले. नेपोलियनने हे अलौकिक साहस

केले नसते तर पूल सर झाला नसता. हिम्मते मर्दा तो मदद ए खुदा ” म्हणतात ते काही खोटे नाही.

जीवनाच्या संग्रामात प्रतिकूल परिस्थितीच्या मारागिरीत तुम्ही सापडलात तर तुम्ही नेपोलियनप्रमाणे वागा. परिस्थितीला न जुमानता आपला मार्ग आक्रमा. अडचणी दूर पळून जातील. पुष्कळ लोक वाघाच्या शिकारीस जातात. शिकारी, बंदुका, काडतुसे, सामान, अन्न यांचे लटांबर त्यांच्याबरोबर असते. एखाद्या झाडाला बकरे बांधून शेजारच्या झाडावर मचाण बांधून सुरक्षित जागेवरून हे साहेब शिकारी गोळी झाडतात. पण अनेक वेळा आपण निःशस्त्र तरुण शेतकरी, धनगर किंवा कातकऱ्याने कोयता किंवा काठीने वाघ मारल्याचे वर्तमानपत्रात वाचतो. हीच खरी शिकार. वाघाला न भिता त्याच्या तोंडात एक हात देऊन दुसऱ्या हाताने त्याच्यावर कोयता चालवून त्यास ठार करणारा तरुण खरा मर्द. मर्दाई दाखवायला जीवनाचे मैदान मोकळे आहे. साहस आणि मर्दपणा केवळ शारीरिकच असत नाही. दुसऱ्याची टीका, उपमर्द, अवहेलना सहन करूनही आपला रास्त मार्ग न सोडणाऱ्या माणसांतही मर्दपणा असावा लागतो. टीकेला, जगाला भिऊन आपले जीवितकार्य व ध्येय सोडणे हा भेकडपणाच होय. कै. डॉ. श्री. व्यं. केतकर अशा तऱ्हेचे मर्द होते. त्यांची अवहेलना झाली, विद्वत्तेची कदर झाली नाही. टीकेचा त्यांच्यावर भडिमार झाला. दारिद्र्याने ते ग्रासले गेले. छपाईस पैसा नाही, कागद नाही, बाजारात पत नाही, अशी स्थिती झाली तरी ते हिम्मत हरले नाहीत. घरोघर जाऊन त्यांनी ग्राहक मिळविले, विद्वानांचा संग्रह केला व मराठी भाषेचे लेणे ठरलेला अपूर्व ज्ञानकोश प्रसिद्ध केला. ते अडचणींना भ्याले असते, टीकेने भांबावले असते, दारिद्र्यास कंटाळले असते तर मराठी वाङ्मय समृद्ध–

श्रीमंत झाले नसते. एका कंगालाने महाराष्ट्र शारदेच्या गळ्यात पृथ्वीमोलाची ज्ञानमाला घातली. खरी मर्दाई होती यात त्यांची !

तुम्ही मनात योजिले असेल ते पार पाडा. मनातले विचार कृतीत उतरले पाहिजेत. अनेकांस चढाओढीची भीती वाटते. चढाओढ करणारा तुमच्यासारखाच दोन पायांचा माणूस आहे ना ? तुम्ही त्यास भिता तसे त्याने तुम्हांस का भिऊ नये ? तुमची धडक व हिम्मत पाहून त्याचा विरोध मावळून जाईल. जगात मानाचे स्थान मागून मिळत नसते. ते जिंकून घ्यावे लागते. धाडस, साहस संसर्गजन्य असते. तुमचे उदाहरण पाहून अनेक लोक स्फूर्ती घेतील. यशाची खात्री मागणारा कधींच यशस्वी होत नाही. विजयश्री स्त्रीसारखी असते तिला जिंकावी लागते. ती शूरावरच भाळते.

प्रचंड सेनासागर घेऊन इराणी सम्राटाने ग्रीसवर स्वारी केली. मार्ग डोंगरातून होता. थर्मापिलीच्या खिंडीत मूठभर स्पार्टन सैनिकांनी इराणी सेनेस अडविले. ग्रीकांचा सेनानायक लिओनिडास हा होता. इराणी फौज पाहून त्याचा एक अधिकारी म्हणाला, " आपला शत्रू समोर आला आहे." त्यावर लिओनिडास उत्तरला, " नव्हे. आपण त्यांच्यासमोर उभे आहोत." छोटेखानी ग्रीक सैन्य पाहून इराणी सेनानी हसू लागले. इराणी सम्राटांनी दूताकरवी निरोप धाडला, " तुमची शस्त्रे स्वाधीन करा." लिओनिडास उत्तरला, " हिम्मत असेल तर ती येऊन घ्या." दूत म्हणाला, " कोठल्या भ्रमात आहात तुम्ही ? आमची मारगिरी सुरू झाली की भाले, शूल व शरांनी आकाश भरून सूर्य दिसणार नाही." त्यावर लिओनिडास हसून म्हणाला, " मग तर फारच छान. आम्हांस सावलीत लढता येईल." अशा मर्द ग्रीकांपुढे इराण्यांना माघार घ्यावी लागली यात नवल ते काय ?

ज्याने साहस केले त्यानेच नाव कमावले याची साक्ष इतिहास देत आहे. साहसाच्या जोरावर अल्पवयातच अनेकांनी कीर्ती कमावली आहे. शिवाजी राजांच्या अंगी साहस होते म्हणूनच ते १६ व्या वर्षी स्वराज्याचे तोरण बांधू शकले. पहिला बाजीराव २० व्या वर्षी पंतप्रधान झाला. जनकोजी शिंदे १६ व्या वर्षी भीमपराक्रम करून पानिपतावर धारातीर्थी पडला. २० व्या वर्षी राज्यावर आलेल्या शिकंदराने ३२ व्या वर्षी मृत्यू पावण्यापूर्वी त्या वेळचे ज्ञात जग जिंकले.

अंगी साहस बाणवा. कार्यास सुरुवात करा. त्यात आपला सर्व जीव व शक्ती ओता. यश तुमच्या मागे आपोआप येईल.

# संपत्तीशिवाय श्रीमंती

५

आपल्याभोवती वावरणाऱ्या समाजाकडे पाहिले तर समाजातील बहुतेक स्त्री-पुरुष संपत्तीची आराधना करताना दिसतात. व्यापारी, कारखानदार, मजूर, कारकून, दलाल, दुकानदार, प्रत्येकजण आपणास अधिक फायदा कसा होईल, आपला पगार कसा वाढेल याच्या विवंचनेत असतो. सगळीकडे पैशाचे साम्राज्य दिसते. प्रत्येकजण आपणास जास्तीत जास्त पैसा कसा मिळेल, आपली मिळकत, घरे, जमीनजुमला यांत वाढ कशी करता येईल याचाच विचार करताना दिसतो. सामान्यतः संपत्ती पैशात मोजली जाते.

पण जगात संपत्तीशिवायही श्रीमंती असू शकते. पैसा म्हणजेच सर्वस्व नाही. सर्व सुखे व आनंद पैशांनीच विकत घेता येतात असे नाही. उलट काही सुखे अशी आहेत की, कितीही पैसा मोजला तरी ती प्राप्त होत नाहीत.

पैशाशिवाय अनेक माणसे सुखी असतात. खिशात फुटकी कवडी नसतानाही मनुष्य धनवान असू शकतो. ज्याची पचनक्रिया व्यवस्थित काम करीत आहे, ज्याचे हृदय सुदृढ आहे, ज्याचे अवयव रेखीव आहेत ज्याची बुद्धी तीव्र आहे असा मनुष्य श्रीमंत समजला पाहिजे. त्याच्याजवळ पैसा नसेल पण शारीरिक संपदा आहे. ही संपदा संपत्तीने विकत घेता येणार नाही. अनेक लक्षाधीश रोज पचनाकरता हजारो रुपयांची औषधे घेताना दिसतात. कैक कोट्यधीशांना रात्री झोप येत नाही.

कोणाला रक्तदाबाने तर कोणास दम्याने पछाडलेले असते; कोणी संधिवातास बळी पडलेला असतो, तर कोणाला हृदयविकार जडतो. या व्याधी दूर करण्याकरता ते हवा तितका पैसा खर्चावयास तयार असतात. आपल्याच घरच्या सुदृढ नोकराचा त्यांना हेवा वाटतो. धान्याची पोती उचलणारा हमाल मीठ-भाकर खाऊन तृप्तीचा ढेकर देतो. कोठेही आडवा झाला तरी त्यास तत्काल झोप लागते. त्याच्याजवळ श्रीमंती नाही असे कोण म्हणेल ?

पुण्याच्या उपनगरात, मुंबईस मलबार हिलवर, किंवा लोणावळा व महाबळेश्वरी सुंदर प्रासादतुल्य महालात किंवा सुंदर बागांनी वेष्टिलेल्या बंगल्यात राहणाऱ्या तथाकथित श्रीमंतांचा हेवा वाटण्याचे कारण नाही. या लोकांना सुंदर बागेत थयथय नाचणारे कारंजे बघून आनंद वाटतो काय ? उलट, शेकडो श्रमिक संध्याकाळी पुण्याच्या संभाजी पार्क, किंवा येरंडवणा उद्यानात तेथील हिरवळी, छायेदार वृक्ष, रंगीबेरंगी फुलांचे ताटवे, कारंजांचे हवेत उडणारे तुषार पाहून आपले श्रम विसरतात. ही सार्वजनिक उद्याने त्यांच्या मालकीची नाहीत. पण पैसे नसतानाही त्यांच्या सौंदर्याचा उपभोग ते घेऊ शकतात. हैद्राबादला सालारजंग म्युझियम आहे. त्यात हजारो सुंदर वस्तू आहेत. त्या जमविण्याकरता सालारजंगांच्या तीन पिढ्यांनी कोट्यवधी रुपये खर्च केले आहेत. पण आज प्रवेश-शुल्क देऊन आपण त्या कलात्मक वस्तूंचा मनमुराद उपभोग घेऊ शकतो, त्याची स्मृती आपण जतन करतो, व पुन:पुन्हा त्यांची आठवण करून दीर्घ काळपर्यंत आनंद उपभोगतो.

मनाची श्रीमंती पैशाच्या श्रीमंतीपेक्षा श्रेष्ठ असते. तुकाराममहाराज दरिद्री होते. त्यांच्या पत्नीस अनेक वेळा संध्याकाळची चूल कशी पेटेल याची विवंचना पडे. पण त्यांची हृदयाची श्रीमंती केवढी मोठी होती ? तुकाराममहाराजांचे अभंग वाचून लाखो लोकांना मन:शान्ती मिळाली

आहे, व अनेक शतकेपर्यंत—जोपर्यंत मराठी भाषा जिवंत आहे तोपर्यंत-त्यांचे गोड अभंग मराठी मनाला लुभावत राहतील यात शंका नाही. शिवाजी महाराजांनी त्यांना खूप पैसे भेट म्हणून पाठविले. पण तुकाराम महाराजांनी ते परत पाठवले. त्यांना पैशांची काय जरूर होती? हरिप्राप्तीपुढे संपत्तीची प्राप्ती त्यांना कःपदार्थ वाटत होती. त्यांची अभंगसंपदा त्यांनी महाराष्ट्राला अर्पण केली आहे. तिची किंमत कोण करू शकेल? ज्याचे मौलिक विचार जगाच्या वैचारिक संपत्तीत भर टाकतात तोच खरा श्रीमंत.

एका जहाजावरून सोन्या-चांदीच्या लगडी नेण्यात येत होत्या. दुर्दैवाने जहाज खडकावर आपटून फुटले. ते बुडू लागले. प्रत्येकजण जीव वाचविण्याच्या खटपटीस लागला. पण एका खलाशास पैशाचा लोभ संकटातही सुटेना. त्याने बेवारसी झालेल्या सोन्याच्या लगडी आपल्या खिशात घालण्यास सुरुवात केली. एका चादरीत लगडी घालून ती त्याने कमरे भोवती बांधली व मग जीव वाचविण्याकरता समुद्रात उडी मारली. पण सोन्याच्या लगडींच्या वजनामुळे पोहणे अशक्य झाले, व अंती तो सागरात बुडून मेला. साक्रेटीस म्हणे,—“ जो थोडक्यात समाधान मानतो तोच खरा श्रीमंत होय.” समाधानी वृत्ती म्हणजे देवाने दिलेली नैसर्गिक संपत्ती आहे. दारिद्र्यात आपणास अनेक गोष्टींची वाण भासते, पण लोभी माणसाला प्रत्येक गोष्टीचीच वाण भासते. कारण किती मिळाले तरी त्याचे समाधान नसते.

एक आनंदी वृत्तीचा चांभार होता. मिळणाऱ्या मीठ-भाकरीत तो समाधान मानी. तो नेहमी हसतमुख असे. काम करताना, वहाणा-बुटांना टाके मारताना तो गाणी गुणगुणत असे. त्याच्या दुकानावरून एक श्रीमंत मनुष्य नेहमी जाई. तो त्या चांभारास गाणी गुणगुणताना व हसताना ऐके. त्याला त्याच्या आनंदी वृत्तीचे कौतुक वाटे. तो त्याच्यावर

खूष झाला. त्याने चांभारास ५०० रुपये बक्षिस दिले. पण दुसऱ्या दिवसापासून त्याच्या जीवनात फरक पडला. त्याचे हसणे-गाणे बंद झाले. आयुष्यात त्याच्याजवळ प्रथमच एकदम ५०० रुपये आले होते. आता ते कसे सांभाळायचे याची विवंचना त्याला पडली. रात्री चोरांची भीती त्यास वाटू लागली. त्यामुळे त्यास नीट झोप येईना. तो बेचैन झाला. जीवनातील आनंद त्यास उपभोगता येईना. शेवटी तो स्वतःशीच विचार करू लागला, हे पैसे नव्हते तोपर्यंत मला कसलीही काळजी नव्हती. मी आनंदी होतो. या पैशाने माझे सुख हिरावून घेतले आहे. जळो तो पैसा ! दुसऱ्या दिवशी ५०० रुपये त्याने त्या श्रीमंत गृहस्थास साभार परत केले. फिरून तो आनंदी बनला. त्याचे गाणे फिरून सुरू झाले.

केवळ पैशाने मनुष्य कधीच सुखी होऊ शकत नाही. माणसाला कितीही पैसा मिळो, त्याचे समाधान कधीच होत नाही. जितका पैसा मिळेल तितकी त्याची हाव वाढतच जाते. ज्याचे मन दरिद्री तो कितीही धनवान असला तरी खरा दरिद्रीच असतो. मनुष्याची श्रीमंती पैशावर नसून त्याच्या गुणांवर, मनावर अवलंबून असते. काही जणांजवळ पैसा नसतो, पण शरीरसंपदा असते, आनंदी मनोवृत्ती असते, आशावादी दृष्टिकोण असतो. त्याच्या जोरावर ते अडचणींवर, दुःखावर मात करतात. अपयशामुळे नाउमेद होत नाहीत. काही जणांजवळ मित्र-संपदा असते. ते जगन्मित्र असतात. त्यांच्या प्रेमळ वृत्तीमुळे त्यांना सर्वत्र सुहृद मिळतात. हे लोकच खरे श्रीमंत होत.

जीवनात पदार्पण करणाऱ्या तरुणाने भोवतालच्या गोष्टींचे मूल्यमापन करण्यास शिकले पाहिजे. जगात कोणत्या वस्तूला किती महत्त्व द्यावयाचे हे त्यास कळले पाहिजे. जगात अनेक गोष्टी आकर्षक दिसतात. संपत्तीची हाक तरुणास आकृष्ट करते. तो सौंदर्याच्या, सुखाच्या मागे जातो.

अनेक योजना त्याच्यापुढे टेवण्यात येतात. निरनिराळ्या धंद्यांत किती वाव आहे यांची चित्रे त्याच्यापुढे उभी करण्यात येतात. काय करावे, कोणता धंदा किंवा व्यवसाय निवडावा ही समस्या त्याच्यापुढे उभी राहते. पण ज्याला यशस्वी व्हावयाचे आहे, जीवनात नाव कमवावयाचे आहे त्याने कोणत्याही बाह्य प्रलोभनास बळी न पडता त्याचे मन व सदसद्विवेक बुद्धी ज्या गोष्टीकडे वा उद्योगाकडे जा असे सांगेल तोच उद्योग निवडावा.

थोर मन, थोर विचार, शुद्ध आचरण व प्रेम या गोष्टी झोपडीचाही प्रासाद बनवू शकतात. असा मनुष्य चंद्रमौळी झोपडीचा दिवाण-इ-खास बनवतो. त्याच्या घरात सुख व समाधान ओसंडत असते. त्याला पैशाची जरूर नसते. प्रेमळ गृहिणीने बनविलेली भाकरी श्रीखंडापेक्षा गोड असते. त्याच्या घरच्या कोंड्याला मांड्याची चव येते. जो ज्ञानात भर घालतो, मानवतेचे दुःख दूर करतो, संस्कृतीत मौलिक भर घालतो, उच्च विचारांचा व शुद्ध आचारांचा प्रचार व प्रसार करतो, समाजाची नैतिक पातळी उंचावतो तोच खरा श्रीमंत.

ज्याच्याजवळ पैसा नाही तो गरीब खरा, पण ज्याच्याजवळ पैशाशिवाय दुसरे काहीच नाही तो खरा दरिद्री होय. स्वतःचे काही नसताना भोवतालच्या सौंदर्याचा उपभोग घेऊ शकतो तो खरा श्रीमंत असतो; तर लाखो रुपये जवळ असूनही ज्याचा लोभ सुटत नाही तो खरा निष्कांचन. बुद्धीची संपत्ती ज्याच्याजवळ आहे तो गरीब कसा असू शकेल ? जो दारिद्र्य आणि अडचणींना हसतमुखाने तोंड देतो तोच खरा श्रीमंत व शूर समजला पाहिजे.

एका प्रामाणिक व्यापाऱ्यास त्याच्या लुच्च्या सहकाऱ्यांनी फसविल्यामुळे त्याचे दिवाळे निघाले. घर, दार, दागदागिने रोख पैसे सर्व काही ऋणकोंना द्यावे लागणार होते. घरी आल्यावर आपल्या पत्नीस तो

म्हणाला, " माझे दिवाळे निघाले. आपल्या घरादाराचा, मालमत्तेचा लिलाव होणार आहे. आतापर्यंत मी तुला सुखात ठेवले, पण यापुढे आपणास दारिद्र्याशी झगडावे लागणार आहे. तुझे आता हाल होतील त्याचे मला वाईट वाटते."

पण पत्नी धीरोदात्त होती. तिने विचारले, " ऋणको तुम्हांस तर विकणार नाहीत ना ? "

पती म्हणाला, " नाही."

" मला ते विकणार नाहीत ना ? " तिने विचारले.

पुन्हा तो म्हणाला, " नाही."

त्यावर ती साध्वी म्हणाली, " मग तुम्ही चिंता कसली करता ? आपले काय गमावले आहे ? केवळ पैसा-घर-दारच ना ? पण तुमचे पौरुषत्व व माझे पातिव्रत्य शिल्लक आहे ना ? तीच आपली खरी दौलत आहे. आपल्या पुरुषार्थाने तुम्ही परत पैसे मिळवाल. आपले हात, पाय व बुद्धी तर आपल्यापाशीच आहे ना ? मग काळजी कशाची करता ! " अशा कुटुंबावर दारिद्र्यास कधीही विजय मिळणार नाही.

# अडचणी : अडसर का वरदान ?

६

साधारण मनुष्य नेहमी अडचणीचा बाऊ करीत असतो. अपयश आले की, मनुष्य सबबी शोधू लागतो. पण विचाराअंती अडचणी आपल्या मार्गातील अडसर नसून वरदान आहेत असे दिसून येईल. अनेक वेळा अडचणी व अपयशामुळे माणसातील सुप्त शक्ती जागृत होतात. अडचणींच्या आव्हानामुळे त्याची कर्तृत्वशक्ती जागी होते. मोत्याच्या शिंपल्यात वाळूचा बारीक कण गेला की, कालवाच्या मृदू अंतरंगास तो खुपू लागतो. तो खुपू नये म्हणून कालव त्याच्याभोवती चिकाचे आवरण घालतो. त्याचाच मौल्यवान मोती बनतो. वीरपुरुष अडचणीवर मात करतो.

गरुडाला हवेत वर चढायचे असेल तर तो वाऱ्याला अंगावर घेतो. ठलट्या वाऱ्यावर आरूढ होऊन तो आकाशात उंच चढतो. त्याप्रमाणे प्रतिकूल परिस्थितीच्या वाऱ्यावर आपण यशाचे आकाश गाठले पाहिजे. पतंगाला खाली ओढून धरणारा दोरा नसेल तर तो उंच चढणार नाही. ज्या माणसाला जखडून ठेवणाऱ्या अडचणी असतील तोच त्यांना तोडून जगात पुढे येतो. बालबच्चे, पत्नी यांची जबाबदारी असलेला मनुष्य जगात अधिक धडपड करतो. दारिद्र्य व अपंगतेने ग्रासून टाकलेला गोविंद दरेकर स्वातंत्र्यकवी बनला. जगातील दोन प्रसिद्ध महाकवी होमर व मिल्टन अंध होते. अंधत्वानें ते गांगरून गेले नाहीत. त्यांचा आत्मविश्वास ढळला नाही. त्यांच्या बाह्य डोळ्यांच्या खाचा झाल्या

होत्या, पण त्यांचे अंतश्चक्षू तीक्ष्ण व तेजस्वी होते. म्हणूनच आजही जग कृतज्ञतेने त्यांची महाकाव्ये वाचीत आहे.

नेपोलियन ज्या लष्करी शाळेत शिकत होता तेथील बहुसंख्य मुले श्रीमंतांची होती. नेपोलियनची घरची गरीबी होती. तो बांध्याने लहान होता. श्रीमंत वर्गबंधू त्याची, त्याच्या गरीबीची व बांध्याची चेष्टा करीत पण नेपोलियन नाउमेद झाला नाही. त्याने अविरत वाचन केले. लष्करी शास्त्राचा सूक्ष्म अभ्यास केला व शेवटी वरचा नंबर मिळवून तो आपल्या वर्गबंधूंच्या आदरास पात्र झाला.

अनेकांच्या अंगी गुण असूनही ते जगात चमकत नाहीत. कारण त्यांना परिस्थिती अनुकूल नसते. घरचे स्वास्थ्य असते. श्रम, कष्ट करण्याची जरूर नसते. परिस्थितीशी झगडावे न लागल्यामुळे त्यांचे कर्तृत्व वाया जाते. त्यांचे सुप्त गुण प्रकट होत नाहीत.

गरीबी व सामाजिक प्रतिष्ठेच्या अभावामुळे अनेकांना अडचणी सोसाव्या लागतात. पण अंगी गुण असले व मनात ईर्ष्या असली की या अडचणी— अडथळे दूर होतात. हिमालयात काही वेळा नद्यांच्या मार्गात बर्फ साठते. पाण्याचा प्रवाह रोखला जातो, बर्फाच्या भिंतीमागे जलाशय साचतो. तो जलाशय बर्फाची भिंत रोखून धरते पण त्या जलाशयाची शक्ती वाढली की प्रचंड जलाशयाचा बोजा असह्य होऊन बर्फाची भिंत शेवटी फुटते व साठलेले पाणी विजेच्या वेगाने घोघावत पात्रातून फिरून वाहू लागते !! खडकाळ जमिनीत किंवा दगडा-धोंड्याच्या राशीत झाडाचे बी पडले तर उगवून वर येणाऱ्या अंकुरास त्यांच्याशी, व नंतर वाऱ्याशी झुंजावे लागते. इवलेसे रोप वाढीस लागते. त्याचे खोड कणखर बनते. मुळे दूरवर जातात. शेवटी ते झाड प्रचंड दगडांना बाजूस सारून डौलाने आपले डोके वर काढते. त्याचा विस्तार वाढतो. त्याच्या छायेत प्रवासी विश्रान्ती घेतात. आपली

फळसंपत्ती ते झाड जगास देते. तीच स्थिती माणसाची आहे. गुणाचे बीज प्रतिकूल परिस्थितीच्या दगडाधोंड्यांना बाजूस सारून कर्तृत्ववृक्षाच्या रूपाने वर येते.

गुजराथमधील प्रत्येक व्यायामप्रेमी श्री. वसंतराव कप्तान यांना ओळखतो. घरची स्थिती साधारण. व्यायामाची दांडगी हौस. रात्रंदिवस व्यायामास त्यांनी स्वतःस वाहून घेतले. कुस्ती, मल्लखांब, लाठी, काठी, दांडपट्टा—यांत ते प्रवीण झाले. पैलवान म्हणून त्यांचे नाव झाले. पण व्यायामाच्या मागे लागून त्यांनी विद्या गमावली. बरोबरचे मित्र वकील, डॉक्टर, बॅरिस्टर, न्यायाधीश झाले. वसंत ‘ पैलवान ’च राहिला. लोक त्यांना नावे ठेवू लागले. बैलासारखा वाढला पण विद्येला मुकला—असे लोक म्हणू लागले. या उद्गारांमुळे वसंत पैलवानातील स्वाभिमान जागृत झाला. त्याने लंगोट-चड्डी गुरूच्या पायी अर्पण करून विद्येची आराधना करावयाचे ठरविले. अभ्यासात व्यत्यय नको म्हणून नर्मदा नदीच्या काठावरील एका ओसाड देवळात तो जाऊन राहिला. मन लावून अभ्यास करून मॅट्रिकची परीक्षा तो पास झाला. पण पुढे शिक्षण कसे घ्यायचे हा प्रश्न उभा राहिला. जवळ पैसा नव्हता. पण वसंत नाउमेद झाला नाही. त्याने ‘ कप्तान ’ नावाचे साप्ताहिक सुरू केले. वर्गणीदार मिळवले. कॉलेजचे शिक्षण पुरे केले. मग स्वावलंबनाचा अवलंब करून वसंतराव ऑलिंपिक गेम्स पाहण्यास जर्मनीत गेले. इंग्लंड-मध्ये श्रीसयाजीराव महाराजांची त्यांनी गाठ घेतल्यावर त्या गुणी राजपारख्याने त्यांना युरोप पाहण्यास आर्थिक मदत दिली. पण तेवढ्याने वसंतरावांचे समाधान झाले नाही. त्यांनी अमेरिकेत जाऊन स्वावलंबनाने द्रव्यार्जन करून स्प्रिंगफील्ड विश्वविद्यालयाची शारीरिक शिक्षणविषयाची एम. ए. पदवी संपादन केली. पुढे ते आनंद विद्यापीठाचे शारीरिक शिक्षणप्रमुख झाले.

अडचणींच्या आचीत कर्तृत्वाच्या लोखंडाचे पोलाद बनते. ज्याला जगात झगडावे लागत नाही, अडचणींना तोंड द्यावे लागत नाही त्यांचे गुण बाहेर येत नाहीत. महाराष्ट्रातील मागल्या दोन पिढ्यांतील सर्व कर्तृत्ववान माणसे गरीबीतून परिस्थितीशी झगडून वर आलेली आहेत असे आपणास आढळून येईल. टिळक, गोखले, रानडे, रँग्लर परांजपे, विठ्ठल रामजी शिंदे, ज्योतिबा फुले, राजवाडे, आगरकर, लक्ष्मणराव किर्लोस्कर, दादासाहेब शेंबेकर, नारायणराव बोरावके, ही सर्व मंडळी गरीबीतून किंवा मध्यम स्थितीतील कुटुंबांतून वर आली आहेत. त्यांना परिस्थितीशी झगडावे लागले. पण एकदा सुस्थिती प्राप्त झाली की, ती व्यक्ती आपणास त्रास झाला तो मुलांस होऊ नये, त्याला सर्व साधने उपलब्ध असावीत, त्यांचा मार्ग सोपा व्हावा या विचाराने आपल्या मुलांस सर्व सवलती देतात. पण त्याचा परिणाम मात्र उलटा होतो. ती मुले सुखलोलुप, आळशी बनतात. त्यांना रखडावे न लागल्यामुळे, झगडावे न लागल्यामुळे ती निष्क्रिय बनतात. श्रीमंत माणसांची मुले क्वचितच कर्तबगार निघतात त्याचे कारण हेच आहे.

एका श्रीमंत माणसाला आपला मुलगा चित्रकार होईल असे वाटत होते. त्याने त्याला युरोप-अमेरिकेत पाठविले. श्रीमंत पित्याचा एक प्रसिद्ध चित्रकार मित्र होता. त्यास त्याने विचारले, " माझा मुलगा नामांकित चित्रकार होईल ना ? " चित्रकार उत्तरला, " कधीच नाही." आश्चर्याने श्रीमंत मनुष्याने विचारले, " का ? " चित्रकाराने उत्तर दिले, " कारण त्याचा बाप लक्षाधीश आहे ! "

अडीअडचणींशी झगडतानाच माणसाचे चारित्र्य बनत, घडत असते. आगीत सोने जितके तापवाल तेवढे ते अधिक उजळून निघते. हिऱ्याला जेवढे घासाल तेवढे त्याचे तेज वाढते. लोखंडात ठिणगी असते, पण लोखंड गारगोटीवर आपटले म्हणजेच ठिणगी बाहेर येते. मोटर मऊ चिखलात रुतून

बसते. चिखलात चाके गरगरा फिरतात पण ती मऊ चिखलाची पकड घेऊ शकत नाहीत. गाडी तेथेच राहते. अनुभवी ड्रायव्हर मग चाकाखाली वाळू किंवा दगड टाकतो, तेव्हा गाडी पुढे सरकते. पक्ष्याला हवेतून उडताना वायूचा अडथळा वाटतो पण अवकाश निर्वात केले की पक्ष्यास उडताच येणार नाही. अडचणी आपत्तीतूनच मानवातील कर्तृत्व-शक्तीचा राक्षस प्रकट होतो. दोन महायुद्धे झाली नसती तर चर्चिल इतका चमकला नसता. सर्व बाजूंनी चर्चिलच्या देशाला घेरले तेव्हाच त्याला पुढे येता आले, व त्याची असामान्य कर्तृत्वशक्ती जागृत होऊन ती इंग्लंडला तारू शकली. वॉल्टेर रॅलेने ' जगाचा इतिहास ', टिळकांनी ' गीता-रहस्य ', नेहरूंनी ' इतिहासाचे दर्शन ' तुरुंगात असताना लिहिले.

अडचणींवर मात करण्याकरिता करावयास लागणाऱ्या धडपडीतूनच यशाचा जन्म होतो. प्राणान्तिक प्रसववेदना सहन केल्यावरच मातेला पुत्रदर्शनाचा आनंद प्राप्त होतो. अडचणींशिवाय यश नसते. अडचणींशी झगडण्यातूनच माणसे आणि राष्ट्रे घडत असतात. आपल्या पत्नीस शिवणकाम करताना होणारे कष्ट पाहून ते कसे टाळता येतील याचा विचार करतानाच एलियस हो ला शिवण यंत्राची कल्पना सुचली. औरंगजेबाने दक्षिण व्यापल्यावरच मराठ्यांचे स्वातंत्र्यप्रेम जागृत होऊन त्यांनी दिल्लीपतीशी अपूर्व लढा दिला.

पैसा गेल्यास दुःख मानू नका. पैसा हा लंगड्याच्या कुबडीसारखा असतो. आपण सारखा त्याचा आधार घेतो. पैसा गेला, दारिद्र्य दिसू लागले, गरजा कशा भागवावयाच्या ही चिंता उत्पन्न झाली म्हणजेच तुम्ही हातपाय हालवता, स्वावलंबन शिकता, व अडचणींवर मात करता. अडचणी व अडथळे छिन्नी-हातोड्यासारखे असतात. छिन्नी-हातोड्यांनीच वेड्यावाकड्या पाषाणातून सुंदर देवमूर्ती बनतात.

एका प्रसिद्ध लेखकाने म्हटले आहे, "प्रतिकूल परिस्थिती ही उत्कृष्ट शिक्षकासारखी असते. दैवच आपली परीक्षा घेण्याकरता प्रतिकूल परिस्थिती निर्माण करते. जोर काढून, वजने उचलून रोज आपण आपल्या स्नायूंवर ताण पाडला म्हणजेच स्नायू वाढू लागतात व शरीराला सुंदर आकार येतो. मुष्टियोद्धा मार खाऊन खाऊन टणक बनतो. परिस्थितीशी झगडतानाच आपल्या कर्तृत्वाला बाळसे येते."

ज्याच्यामध्ये गुण आहेत, धैर्य आहे, चिवटपणा आहे तोच आपले व्यक्तिमत्त्व प्रभावी बनवू शकतो. अडचणी त्याला दडपू शकत नाहीत. उलट अडचणीने त्याची शक्ती वृद्धिंगतच होते. अडचणीने मूर्ख कावतात, भित्रे घाबरतात, पण त्याच अडचणी शहाण्या व उद्योगी माणसास कार्यप्रवृत्त करतात. अडचणीतच माणसाच्या कल्पकतेची, चिकाटीची, धैर्याची परीक्षा होते.

आजच्या महाराष्ट्रीय समाजाकडे पाहिले की, आज महाराष्ट्रात निष्क्रियतेचे युग आले आहे असे वाटते. कोणालाही स्वतःच्या पायावर उभे रहावयास नको. कोणालाही त्रास नको, कष्ट नकोत. सर्व गोष्टी सहजसाध्य, विनासायास पाहिजे असतात. गृहिणी तयार चटण्या, तयार लोणची आणताना दिसतात. सगळीकडे 'मदतगार' दिसू लागले आहेत. शाळा-कॉलेजांतील मुले 'गाइडे', 'मार्गदर्शक' वाचताना दिसतात. शेकडो विद्यार्थी परीक्षेस नेमलेली मूळ पुस्तकेही घेत नाहीत किंवा वाचीत नाहीत. कोणत्याही विषयावरील स्वतःची मते न बनविता 'सकाळ', 'केसरी', 'टाइम्स' यांनी दिलेलीच मते आपण ग्रहण करतो. सर्वांना 'पी हळद अन् हो गोरी' या म्हणीप्रमाणे झटपट ज्ञान, सुख, संपत्ती पाहिजे. पण अशा वातावरणातून पहिल्या प्रतीची माणसे कधीही निर्माण होणार नाहीत. 'होयबा' व बौद्धिक 'गुलाम'च निर्माण होतील. या कुबड्या फेकून द्या. स्वतःच्या

पायावर उभे रहा. दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिऊ नका. स्वतःचीच विहीर खणा. ' दुसऱ्यावर विसंबला तो पस्तावला ' ही म्हण ध्यानात ठेवा. आपल्या घामाने, उपयोगाने, प्रयत्नांनी ज्ञान मिळवा, तरच तुम्ही पुढे याल व जगाच्या धकाधकीत टिकाल, पाण्यात पडल्यावर दुसऱ्याच्या मदतीची वाट पाहणारा बुडून मरतो. स्वतः हातपाय मारणाराच या जीवनसमुद्रात तरतो हे लक्षात ठेवा.

# निर्णय

७

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात केव्हा तरी एखादी गोष्ट करावी का नाही, हा मार्ग अनुसरावा का तो अनुसरावा, हा धंदा हाती घ्यावा का तो घ्यावा, धंद्यात पडावे का नोकरी करावी, इंजिनीयर व्हावे का डॉक्टर व्हावे, शिक्षण चालू ठेवावे का सोडावे,—अशा पर्यायांपैकी एक पर्याय निवडण्याची, निर्णय घेण्याची वेळ येते. अशा वेळी अंतिम निर्णय घेण्यात चूक झाली तर त्याचे परिणाम जन्मभर भोगावे लागतात, व नंतर पस्तवावे लागते; म्हणून असा निर्णय घेताना तरुणांनी फार काळजी घेतली पाहिजे. कारण त्या निर्णयावर त्यांचे भावी जीवन, यशापयश, सुखदुःख अवलंबून असते.

निर्णय म्हणजे एखादी गोष्ट करण्याचा केलेला निश्चय होय. ' निश्चयाचे बळ, तुका म्हणे तेची फळ ' ही तुकोबारायाची उक्ती अत्यंत सार्थ आहे. एकदा निश्चय केल्यावर, निर्णय घेतल्यावर त्यास चिकटून राहिले पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत तो बदलता कामा नये. तरच तुम्ही यशस्वी व्हाल, मानाचे मानकरी व्हाल.

लहान मूल निर्णय घेऊ शकत नाही. आईबाप त्यास बाजारात घेऊन खेळण्याच्या दुकानात घेऊन गेले की, त्या मुलास कोणते खेळणे घेऊ आणि कोणते नको हे कळत नाही. शेवटी मूल एखादे खेळणे घेते, पण घरी आल्यावर घेतलेल्या खेळण्यापेक्षा दुसरे खेळणे घेतले असते तर बरे झाले असते असे त्यास वाटू लागते; व घेतलेल्या खेळण्याबद्दल त्यास

गोडी वाटेनाशी होते. युवकावस्थेतून जेव्हा तुम्ही तारुण्यात पदार्पण करता त्यावेळी जीवनाची वेगळाली क्षेत्रे तुमच्यापुढे असतात. त्या वेळी घाईने निर्णय घेऊ नका. कारण एकदा एक क्षेत्र निवडल्यावर काही दिवसांनी किंवा वर्षांनी ते बदलून दुसऱ्या क्षेत्रात पदार्पण करणे कठीण जाते. पहिल्यात घालविलेला काळ, श्रम, पैसा व मिळवलेला अनुभव वाया जातो. आणि नव्या क्षेत्रात श्रीगणेशापासून सुरुवात करावी लागते व वर सांगितलेल्या लहान मुलाप्रमाणे स्थिती होते. म्हणून जीवनक्षेत्राची निवड उघड्या डोळ्यांनी, त्यांतील अडचणी लक्षात घेऊन आपणात त्या क्षेत्रात कार्य करण्याची कुवत आहे का नाही, व ते क्षेत्र आपल्या आवडीचे आहे का नाही याचा पूर्ण विचार करून मग निवड करा. हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा असतो. एकदा निर्णय घेतल्यावर त्यास चिकटून राहा; तरच तुम्हांस यश मिळेल.

प्राचीन रोमन प्रजासत्ताकाच्या काळात एकदा फ्रान्समधील गॉल लोकांनी रोमवर स्वारी केली. रोमला वेढा पडला. बाहेरून कुमक येणे बंद झाले. रोमन राज्यकर्त्यांचे हातपाय गळाले. गॉल लोकांनी सोन्याच्या रूपाने खंडणी घेऊन वेढा उठवण्याचे कबूल केले. सोने तोलून घ्यावयाचे ठरले. एका पारड्यात वजने ठेवण्यात आली. दुसऱ्या पारड्यात सोन्याच्या लगडी टाकण्यात यावयाच्या होत्या. ही शरणागती प्रसिद्ध रोमन योद्धा कॅमिलस यास मानहानिकारक वाटली. रोमन लोकांपुढे दोनच पर्याय होते; खंडणी देणे किंवा रोमचा विध्वंस. विध्वंस टाळायला लढणे व शत्रूचा पराभव करणे आवश्यक होते कोणता निर्णय घ्यायचा? भित्र्या राज्यकर्त्यांनी पहिला निर्णय घेतला. पण कॅमिलसच्या मानी मनाला तो पसंत नव्हता. तो गर्दीतून पुढे घुसला. त्याने आपली तलवार उपसली व ती मोकळ्या पारड्यात टाकली तो गरजला " शूर रोमन लोक हो, सोन्याऐवजी तलवार हेच उत्तर शत्रूला दिले पाहिजे."

विद्युल्लतेच्या धक्क्यासारखा जनसमूह हादरला. हजारो कंठांतून शब्द उमटला ' सोन्याऐवजी समशेर ! ' एका क्षणात निर्णय बदलला. जनताजनार्दनाच्या निर्णयापुढे मान तुकविणे राज्यकर्त्यांना भाग पडले. कॅमिलसच्या नेतृत्वाखाली रोमन लोकांनी गॉल आक्रमकांना हाकून दिले !

ज्या वेळी आणीबाणीचा प्रसंग येतो, ज्या वेळी मने डळमळू लागतात, काय निर्णय घ्यावा हे कळेनासे होते त्या वेळी एखादा निश्चयी पोलादी पुरुष पुढे येतो, व आपल्या निग्रही निर्णयाने, निश्चयाने तो सर्वांची मने भारावून टाकून देशाचे नेतृत्व करतो. हे करू का ते करू याचा नुसता निष्क्रियतेने विचार करणाऱ्या हॅम्लेटाच्या हातून कोणतेच मोठे कार्य होत नाही. सप्तवार्षिक युद्धात सुरुवातीस तयारी नसल्यामुळे इंग्लंडचा व इंग्लंडच्या दोस्तांचा सर्वत्र पराभव होत होता. एकामागून एक पराभवाच्या बातम्या येत होत्या. पार्लमेंट गोंधळून गेले होते मंत्रिमंडळात झटपट निर्णय घेऊन काम करण्याचा वकूब नव्हता. पराभूत मनोवृत्ती उचल खात होत्या. अशा वेळी पार्लमेंटमध्ये विल्यम पिट ( पुढे अर्ल ऑफ चॅथम ) ठासून म्हणाला, " हे मंत्रिमंडळ निष्क्रिय आहे. त्याच्यात आत्मविश्वास नाही. इंग्लंड चोहो बाजूंनी संकटांनी घेरले आहे. अशा वेळी इंग्लंडला वाचवू शकेल अशी एकच व्यक्ती आहे, ती म्हणजे मी स्वतःच होय. " आत्मविश्वास प्रतीत होणाऱ्या त्याच्या या उद्गारांनी पार्लमेंटमध्ये नवचैतन्य निर्माण केले. पिटला मंत्रिमंडळात घेण्यात आले. तो युद्धमंत्री झाला त्याने झटपट निर्णय घेतले व विजयाचे पारडे फिरवले. इंग्लंड विजयी झाले. या विजयामुळेच इंग्लंड जागतिक साम्राज्य बनले.

जगाच्या इतिहासात कोणाची नावे नमूद राहतात ? जे कृतिशील असतात, निर्णय घेण्याची ज्यांच्यामध्ये कुवत असते, एकदा निर्णय घेतल्यावर त्यास चिकटून राहण्याचा करारीपणा ज्यांच्यात असतो

त्यांचेच गुणगान इतिहास करतो. ज्या माणसाला त्वरित निर्णय घेता येत नाही त्याच्यात आत्मविश्वास नसतो. तो दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहत राहतो. तो उपग्रहाप्रमाणे दुसऱ्या तेज शक्तीभोवती फिरत राहतो. निश्चयी मनुष्य संधीची वाट पाहत नाही. तो आपल्या निर्णयाने, निश्चयाने संधी निर्माण करतो. तो परिस्थितीपुढे मान तुकवीत नाही, तो परिस्थितीवर मात करतो.

ज्याला निर्णय घेता येत नाही अशी व्यक्ती हवेतून उडणाऱ्या म्हातारीप्रमाणे असते. वाऱ्याबरोबर ती वाहवत जाते. वारा फिरला की तिची दिशाही बदलते. दुसऱ्याचे विचार ऐकून ती आपली मते बदलीत राहते. जरी अशा व्यक्तीने योग्य मार्ग सुरुवातीस निवडला तरी प्रतिकूल परिस्थितीचा विरोध होताच ती व्यक्ती आपला मार्ग सोडून दुसऱ्याच मार्गास लागते.

निर्णय घेण्याची क्षमता ही यशाची गुरुकिल्ली असते. प्रत्येकाला अनेक वेळा महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतात. परिस्थितीचे आकलन व स्वत:ची कुवत या गोष्टी लक्षांत घेऊन तत्काल निर्णय घेण्याची पात्रता ज्याच्या अंगी असेल तोच यशस्वी होतो व जगात नाव कमावतो. निर्णय घेताना मनुष्य हिचकला की तो संधी गमावतो. गेलेली संधी परत येत नाही. जो निश्चयी मनुष्य असेल तो आपल्या निश्चयाने दुसऱ्याच्या मनात आपल्याविषयी, आपल्या कार्याविषयी विश्वास उत्पन्न करतो. लोकांना त्याचा भरवसा वाटू लागतो. कमकुवत मनाचा मनुष्य विचार करण्यातच व्यर्थ वेळ दवडतो. निश्चयी मनुष्य हा वेळ वाचवतो. निष्क्रियतेत त्याची शक्ती कुजत नाही.

निर्णय घेण्याची क्षमता अंगी बाणवता येते. प्रथम प्रत्येक व्यक्तीने आपली बौद्धिक व शारीरिक पात्रता किती आहे हे समजावून घेतले पाहिजे. त्याच्या शक्तीच्या व कुवतीच्या बाहेरचे काम त्यास पेलणार

नाही. निर्णय घेणे याचा अर्थ मूर्खासारखे काही तरी करणे असा नाही. श्रीकृष्ण श्रीकृष्ण होता म्हणूनच गोवर्धन पर्वत आपल्या बोटावर पेलू शकला. त्याच्यात तेवढी शक्ती, तेवढे दैवी सामर्थ्य होते म्हणून तो तसे करू शकला. पण कृष्णाने गोवर्धन उचलला म्हणून गवळ्याचे प्रत्येक शेंबडे पोर गोवर्धन उचलू शकेल काय? कोणी एक मण वजन उचलू शकेल तर कोणी चार मण उचलू शकेल. आपणास किती वजन उचलता येईल हे प्रत्येकाने जाणले पाहिजे. मॅट्रिकच्या परीक्षेत गणितात १०० पैकी ३० गुण मिळविणारा विद्यार्थी रॅंग्लर होऊ शकणार नाही. आपली शक्ती किती आहे हे ओळखूनच त्या शक्तीस पेलेल असेच काम करण्याचा निर्णय घेतला पाहिजे.

ज्याच्यात निर्णय नाही, निश्चय नाही तो मनुष्य कोणतेच काम सिद्धीस नेऊ शकत नाही. आपली जी शक्ती असेल ती केन्द्रित करण्यास आपण शिकले पाहिजे. सूर्यप्रकाशात विलक्षण शक्ती आहे. दुर्बिणीतून सूर्याचे किरण गवतावर किंवा कागदावर केन्द्रित केले की, काही क्षणांत ते गवत किंवा कागद पेट घेतो. पण ते केन्द्रित केले नाहीत तर गवत पेटणार नाही. ज्याला निर्णय घेता येत नाही, व एकदा निर्णय घेतल्यावर तो निश्चयाने पार पाडण्याचे मानसिक बळ नाही तो अंगिकारलेले कार्य थोड्याशा अडचणी आल्या की सोडून देतो व दुसरे अधिक सोपे वाटणारे काम हाती घेतो. पण त्याच्या हातून कोणतेच कार्य तडीस जात नाही. "एक ना धड अन् भाराभर चिंध्या" अशी त्याची स्थिती होते. त्यांना स्वतःचे मत नसते. त्यांना तत्त्वे नसतात. निश्चित ध्येय नसते. म्हणून ते काहीच कार्य करू शकत नाहीत.

एक तरुण सुंदर मुलगी होती. ती ऐका जोंधळ्याच्या शेताच्या कडेने चालली होती. जोंधळ्याची कणसे पोटरीवर आली होती. तिला वाटले, "कणसात दाण्याऐवजी मोती असते तर किती बहार झाली

असती. त्या मोत्यांचा हार आपण केला असता." याच वेळी एक परी तेथून चालली होती. तिने हे शब्द ऐकले. ती प्रकट झाली व त्या मुलीस म्हणाली, " बाळ, मी तुझी इच्छा पुरी करीन, पण माझ्या अटी तू पुऱ्या केल्या पाहिजेस. या शेतामधून न रेंगाळता, उजवी-डावीकडे न वळता, मागे न फिरता, तू दुसऱ्या टोकापर्यंत जा. वाटेत जे कणीस तुला सर्वांत मोठे व भरदार वाटेल ते तू तोड. त्याच्यात जितके दाणे असतील त्यांचे मोती बनतील." मुलगी आनंदून गेली. तिने परीच्या अटी मान्य केल्या. ती शेतातून जाऊ लागली. चारी बाजूंस कणसे होती. काही मोठी, काही मध्यम, व काही लहान होती. कोणते कणीस घ्यावे याचा तिला विचार पडला. एखादे मोठे कणीस दिसे. ते घ्यावेसे वाटे. इतक्यात मनात विचार येई, " कदाचित पुढे याच्याहूनही मोठे कणीस असेल." ती तशीच पुढे जात राहिली. शेताचे दुसरे टोक जवळ येऊ लागले. कणसाची दाटे पातळ होऊ लागली. टोकाची कणसे लहान लहान होती. मागल्यापैकी मोठे कणीस न तोडल्या-बद्दल वाईट वाटत होते. कदाचित चुकून फिरून मोठे कणीस आढळेल अशी आशा होती. ती तशीच पुढे जात राहिली. आता अगदीं खुरटलेली कणसे दिसू लागली. मोठी कणसे न निवडल्याबद्दल तिला आता लाज वाटू लागली. शेवटी कोणतेच कणीस न तोडताच ती दुसऱ्या टोकास पोचली. शेवटी ती रिक्तहस्तच राहिली. जीवनात अनेकांची अशीच स्थिती होते. निवड व निर्णय नसल्यामुळे अनेकजण यशाचा मौक्तिकहार गमावून बसतात.

बहुतेक तरुण-तरुणींना सुखमय जीवन हवे असते. त्यांना कष्ट करायची इच्छा नसते. त्यांना सोपा मार्ग हवा असतो. अडचणी, विरोध, टीका याला ते भितात. ते सुलभ आकर्षणाला बळी पडतात. ' नाही ' म्हणून निश्चयाने ते सुखापासून दूर जाण्याचा प्रयत्न करीत

नाहीत. त्यांना लांबचा रस्ता नको असतो. हाल-अपेष्टांना ते घाबरतात. पुणे-मुंबई सोडायला नको म्हणून शेकडो तरुण कमी पगारावर खालच्या जागेवर काम करण्यात सुख मानतात. १९४७–४८ ची गोष्ट आहे. त्या वेळी हल्लीइतके साखर कारखाने नव्हते, अनेक शेतकी पदवीधर बेकार होते. नोकऱ्यांसाठी ते वणवण फिरत होते. मध्य भारतांतील एका मोठ्या जहागिरदारांचे चिरंजीव माझे विद्यार्थी होते. त्यांनी स्वतः शेती करण्यास सुरुवात केली होती. आपल्या जहागिरींत एक नमुनेदार शेतीकेन्द्र त्यांना काढायचे होते, ते पुण्यास माझ्याकडे आले व तीन महाराष्ट्रीय शेतकी पदवीधर आपणास मिळवून द्यावेत अशी त्यांनी मला विनंती केली. शेतकी खात्यातील बरेच वरिष्ठ अधिकारी माझ्या माहितीचे होते. मी त्यांना मला तीन कृषि-पदवीधर देण्यास सांगितले. त्यांनी तीन बेकार पदवीधरांना निरोप देऊन बोलावून घेतले. जहागीरदार साहेबांनी त्यांना जंगलात काम करावे लागेल असे बजावले. मध्य भारत सरकारचे वेतनमान, राहण्यास जागा (अर्थात सुरुवातीस जंगलात पत्र्याच्या शेडसच होत्या) देण्याचे त्यांनी कबूल केले. जागा उज्जैन जवळ काही मैलांवर होती. हे तिन्ही पदवीधर तेथे पोचले. पण तेथे सिनेमा नाही, हॉटेल नाही, छपरी पलंग नाही, दुसरी सोबत नाही, हे पाहताच नोकरी पाहिजे म्हणून ओरडणारे पदवीधर दोन दिवसांत पुण्यास परत आले. अशांच्या हातून काय होणार ? विलायतेतून तीन हजार मैल समुद्र ओलांडून इंग्रज लोक उत्तर अमेरिकेत वसाहती करण्यास गेले. त्यामुळेच आज अमेरिका निर्माण झाली. पण महाराष्ट्राच्या सरहद्दीपासून तीनशे मैलही दूर जाण्यास आमचे तरुण तयार नाहीत.

आजच्या चढाओढीच्या जगात ज्याच्यात निश्चय असेल, आत्मविश्वास असेल तोच मनुष्य पुढे येईल.

# यश आणि संपत्ती – आहे तुमच्या हाती

माणसाच्या मनाची ठेवणच पुष्कळ अंशी त्याच्या दुःखास किंवा सुखास कारणीभूत असते. दारिद्र्याचा तुम्ही सारखा विचार करीत बसलात तर तुमच्या नशिबी दारिद्र्यच येते. कद्रू, चिरचिऱ्या व संशयग्रस्त माणसाकडे समृद्धीची सरिता कधीच वाहत नाही. दरिद्री विचार मनात आले की, भोवतालची परिस्थिती प्रतिकूल बनते, व तुमच्याभोवती दारिद्र्याचे वातावरण निर्माण होते.

ज्या माणसात गुण आहेत अशा माणसास दारिद्र्याला चिकटून बसण्याचा, महत्त्वाकांक्षेस खुरटून टाकणाऱ्या वातावरणात राहण्याचा, किंवा स्वतःच्या गुणांचा विकास होण्याची संधी नसलेल्या परिस्थितीत नशिबाला हात लावून बसण्याचा नैतिक अधिकार नाही. निसर्ग-दत्त देणग्याचा विकास करून घेण्याची धडपड त्याने केलीच पाहिजे. त्याच्यात जर स्वाभिमान असेल तर तो या कुंद वातावरणातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केल्याशिवाय राहणार राही. स्वतःची स्थिती सुधारून आपण दुसऱ्यास भारभूत होणार नाही व आपल्यामुळे आपल्या वायकामुलांस हालात राहावे लागणार नाही याची काळजी त्याने घेतली पाहिजे.

कोणत्याही देशातील स्वकष्टाने पुढे आलेल्या माणसास तुझ्या जीवना-तील सर्वांत सुखाचा व समाधानाचा काळ कोणता असे विचारलेत तर तो बहुधा हमखास म्हणेल की, ज्या वेळी मी दारिद्र्यातून सुस्थितीत

पदार्पण करीत होतो, श्रम व घामाने वाढविलेल्या माझ्या धंद्यास यशाची फळे येऊ लागली, आता माझ्या मागले दारिद्र्य संपले असे ज्या वेळी मला वाटले तो माझ्या आयुष्यातील सर्वांत सुखाचा व समाधानाचा काळ होता.

ईश्वराने आपणास मानवजन्म दिला आहे तो किड्या-मुंग्यांचे जीवन जगण्याकरिता खचितच दिला नाही. ईश्वराची सर्वोत्कृष्ट कृती म्हणजे मानव होय. मनुष्य नराचा नारायण होऊ शकतो. आपणात सुप्त दैवी अंश आहे यात शंका नाही. आपल्या हातून मोठी उपयुक्त कामे व्हावीत हीच देवाची इच्छा असणार. दारिद्र्यात, अज्ञानात, अंध रूढीत आपण खितपत पिचत पडावे अशी त्या जगन्नियंत्याची इच्छा खचितच नसणार. पण आपल्या दैवात आपण कष्ट व श्रम केल्यास भाग्योदय आहे हीच गोष्ट आपल्या लक्षात येत नाही. आपल्या सुप्त शक्तींना चालना देऊन आपण आपल्या ध्येयाच्या दिशेने घोडदौड करीत नाही, म्हणून आपण प्रगती करू शकत नाही. आहोत तेथेच आपण राहतो. परिस्थितीच्या दाव्याने आपण दुर्दैवाच्या खुंट्यास जखडले जातो. हे दावे तोडून वेळ पडल्यास खुंटाही उपटून आपण परिस्थितीच्या गुलामगिरीतून स्वत:ची सुटका करून घेण्याचा प्रयत्न करीत नाही. देव आपणास दोन्ही हाताने देतो. 'अनंत हस्ते कमलावर आपणावर देणग्यांची खैरात करतो' देव चिक्कू माणसासारखा हात आखडीत नाही. त्याचे भांडार अपार आहे, ते अक्षय्य आहे.

उमलत्या फुलाला सूर्यप्रकाश लागतो. फूल सूर्याकडे एखादद्दुसऱ्या किरणाची मागणी करीत नाही. सूर्य आपला प्रकाश कद्रूपणाने देत नाही. त्याच्या जीवनदायी प्रकाशात सारी धरती न्हाऊन निघते. देणारा उभा आहे, घेणारा पाहिजे. देण्याने दारिद्र्य येत नाही. एका मेणबत्तीने दुसरी मेणबत्ती पेटविली म्हणून काही पहिल्या मेणबत्तीचा

प्रकाश कमी होत नाही. उलट प्रकाशात भरच पडते. प्रेमाने प्रेम वाढते. मैत्रीने मैत्री वाढते.

सर्व गोष्टी दयासागर ईश्वराकडूनच आपणास मिळतात. त्या मिळालेल्या गोष्टींचा विनियोग कसा करावयाचा हा प्रश्न असतो. जे आपणास मिळाले ते दुसऱ्यास दान केले पाहिजे. तरच आपण ईश्वराशी, त्याच्या उद्देशाशी एकरूप होऊ शकतो. व आपल्यातील पशुत्वास जिंकून स्वतःस सुसंस्कृत करून आपल्यातील स्वार्थ, अप्रामाणिकपणा यांचा त्याग करून आपण त्या चित् स्वरूपाशीं तादात्म्य पावू शकतो. आणि ईश्वराशी एकरूप झालेल्यास कमी काय असणार ? प्रत्येक चुकीचे पाऊल, प्रत्येक दुष्कृत्य आपल्या डोळ्यावर पडदा टाकते व त्यामुळे आपणास ईश्वराचे शुद्ध स्वरूप दिसेनासे होते.

ह्या गोष्टीची आपणास उणीव आहे, ती गोष्ट आपणाजवळ नाही, या गोष्टीची खंत बाळगू नका. एखाद्या समारंभास जाण्यास योग्य असे कपडे आपणाजवळ नाहीत. दुसरे लोक करतात ते आपणास करता येत नाही म्हणून वाईट वाटून घेऊ नका. त्यामुळे तुमचा दृष्टिकोन विकृत बनेल. काळा चष्मा लावलेल्या माणसांस सारी दुनिया काळीच दिसते. ‘ पैशाकडे पैसा जातो ’ अशी म्हण आहे. ती सर्वच बाबतीत खरी आहे. आनंदाकडे आनंद, सुखाकडे सुख, दुःखाकडे दुःख धाव घेते; म्हणून मनात चिंतेस, दुःखास स्थानच देऊ नका. तुमची वृत्ती आनंदी बनविलीत की आपोआप आनंद तुमच्याकडे धावत येईल.

सॉक्रेटिस शान्ततेचा मेरू होता. मनात रागाला थारा देणे म्हणजे पशुवृत्तीकडे झुकणे होय असे तो मानी. आपले मन काबूत ठेवण्याचा तो प्रयत्न करी. त्याची पत्नी झांटिपी ही कजाग होती. ती सारखी रागावलेलीच असे. ती रागावली म्हणजे आपल्या पतीस टाकून बोले, त्याच्यावर शिव्यांचा वर्षाव करी. सॉक्रेटिस शान्त राही. त्यामुळे ती

आणखीच चिडे. एके दिवशी ती अतिशय चिडली. तिचा संयम सुटला. शब्दाने शब्द वाढतो म्हणून सॉक्रेटिस शान्त राहिला व शेवटी रस्त्यावरील दाराच्या पायरीवर येऊन बसला. नवरा आपण कितीही बोलतो तरी रागावला नाही म्हणून झांटिपीचा पारा आणखीच चढला. शेवटी घरातून घाणेरड्या पाण्याचे पातेले आणून तिने दारात बसलेल्या पतीच्या डोक्यावर ते पाणी ओतले ! हे दृश्य पाहून रस्त्यातील लोक हसू लागले. तेव्हा सॉक्रेटिसही हसून म्हणाला, "मला वाटलेच होते असे काही तरी होईल म्हणून. मेघगर्जनेनंतर पाऊस हा पडतोच."

ऐहिक समृद्धीचे मूळ आपल्या मनातच असते. पराभवी मनोवृत्ती असलेल्या मनुष्यास कधीच यश मिळत नाही. दरिद्री विचार मनात आले की लक्ष्मी दूर पळते. जीवनाची घडण कापडासारखी असते. जसे धागे तसे कापड निघते. मनात समृद्धीचे, यशाचे, आनंदाचे, सुखाचे विचार आणा.

समाजात आपणास शेकडो—हजारो लोक असे आढळतात की ज्यांना वाटते, की जगातील सुखे, आनंद, संपत्ती, समृद्धी ही आपणाकरता नाहीत, दुसऱ्या अधिक दैववान माणसांनाच त्यांचा उपभोग मिळणार. आपल्या नशिबी या गोष्टी नाहीत. पण त्यांना असे का वाटते ? कारण ते नशीबवानांच्या यादीत स्वतःचा समावेशच करीत नाहीत. ते आपल्या क्षितिजाला स्वतःच मर्यादित करतात. स्वतःच्या व समृद्धीच्यामध्ये ते निराशेची भिंत उभी करतात. जे आपणास मिळणार नाही असे तुम्ही गृहीत धरता ते तुम्हांस मिळेलच कसे ? मर्यादा नशीब निर्माण करीत नाही; आपणच ती निर्माण करतो. आपलीच लेकरे दारिद्र्यात, दुःखात, निराशेत खितपत पडावी अशी ईश्वराची इच्छा असू शकेल काय ? आपल्या मानवापत्यांनी सुखात, आनंदात, समृद्धीत राहावे अशीच त्या दयाघनाची इच्छा असणार यात शंका नाही.

जगात दारिद्र्य असणारच असे आपण गृहीतच का धरावे ? या समजुतीनेच दारिद्र्य जिवंत ठेवले आहे. आपल्या भोवतालच्या निसर्गाकडे पाहा. सगळीकडे समृद्धता व समृद्धतेची साधने ठासून भरली आहेत. आपण त्यांचा उपयोग न करता, हालचाल वा प्रयत्न न करता केवळ नशिबाला दोष देऊन दारिद्र्य आणि दु:खापुढे मान टाकतो. मानसशास्त्र सांगते की आपल्या सर्व सुख वा दु:खाचे मूळ आपल्या मनावर अवलंबून असते. आपल्या विचाराचा आपल्या कृतीवर, आचरणावर, चारित्र्यावर ठसा उमटलेला असतो. जसे तुमचे विचार तसे तुमचे जीवन असते. लोहचुंबक इतर धातूंना आपल्याकडे आकर्षित करून घेतो. त्याप्रमाणे तुमच्या मनात दारिद्र्य व दु:खाचे विचार आले की लोहचुंबकाप्रमाणे दारिद्र्य व दु:ख तुमच्याकडे आकर्षिले जाईल. जीवनाचा उपभोग घेण्याऐवजी तुम्हांस जीवनाकरता धडपड करीत बसावे लागेल.

म्हणून दारिद्र्याकडे पाठ फिरविण्याचा तुम्ही निर्धार करा, व समृद्धीची अपेक्षा मनात बाळगा. समृद्धीकरता धडपड करण्यास शिका. चिरचिरी प्रवृत्ती टाकून द्या. आत्मविश्वास वाढवा. यश तुमच्याकडे वाटचाल करू लागेल. आपल्याभोवती आनंदी वातावरण निर्माण करा.

भीक मागून राज्ये मिळत नसतात. शिवाजीच्या समकालीन पिढीतील लोकांना विजापूर व मोगल सम्राटांच्या दास्यातच गोडी वाटत होती. परक्यांच्यापुढे लोटांगण घातल्याशिवाय आपणास गत्यंतर नाही; स्वराज्य आपल्या नशिबी नाही. स्वधर्माची विटंबना उघड्या डोळ्यांनी पाहणे आपणास भाग आहे; ईश्वरानेच मुसलमानांना भारतावर राज्य करण्याचा ताम्रपट दिला आहे अशी भावना दृढ झाली होती. जगन्नाथ पंडितासारखा विद्वन्मणीही हिंदू राजांचा आश्रय धिक्कारून त्यास हिणाविण्याकरता ‘ दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा ’ असे म्हणाला. शहाजी, लखुजी जाधवरावांसारख्या बाहुबलींनासुद्धा मोगल व विजापूर-

करांची नोकरी करण्यात धन्यता वाटली. राम व कृष्णाचे वंशज म्हणविणारे राजपूत राजेही मोगलांचे दास बनण्यात धन्यता मानू लागले होते.

पण बाल शिवाजीने या पराभूत मनोवृत्तीस आपल्या मनात स्थान दिले नाही. स्वतंत्र हिंदू राज्य स्थापणे अशक्य आहे हे मानण्यास तो तयार नव्हता. रामायण-महाभारताच्या परिशीलनाने शिवाजीच्या मनात स्वातंत्र्याच्या, स्वधर्मरक्षणाच्या विचारांनी घर केले. प्रचंड आत्मविश्वासाच्या जीवावर केवळ १६ वर्षांच्या बाल शिवाजीने तोरणा किल्ला घेऊन स्वराज्याचे तोरण बांधले. विजापूर, गोवळकोंडा, पोर्तुगीज, शिद्दी, मोगल व घरभेदे स्वराज्य-शत्रू यांनी चारी बाजूंनी घेरलेले असतानाही, असीम आत्मविश्वास, अमोघ वाणी, असामान्य कर्तृत्व, अलौकिक सेनापतित्व, अढळ ध्येयवाद, असाधारण शासनक्षमता, अचल धैर्य, अमूल्य चारित्र्यसंपदा यांच्या जोरावर शिवाजीने शून्यातून स्वराज्याची सृष्टी निर्माण केली.

समृद्धीच्या भांडाराची किल्ली तुमच्या जवळच असते. रामशास्त्री प्रभुणे यांचा जन्म एका दरिद्री ब्राह्मण कुलात झाला. दारिद्र्यामुळे त्यांना लहानपणी एका श्रीमंताच्या घरी शागीर्दाची नोकरी करावी लागली. यजमानाच्या पायावर पाणी घालताना मालकाच्या कानातील टपोऱ्या भिगबाळीकडे रामचे लक्ष गेल्याने पाण्याची धार पायावर पडण्याऐवजी बाजूस पडू लागली. मालकाने " काय रे राम्या, तुझे लक्ष कुठे आहे? " असे विचारताच सत्यवक्त्या रामाने " मी भिगबाळीकडे पाहत होतो " असे उत्तर दिले. तेव्हा मालक म्हणाला, " भिगबाळीकरता पराक्रम तरी करावा लागतो किंवा विद्वत्ता तरी असावी लागते. हे पाणक्याचे काम नाही." हे शब्द ऐकताच रामातला स्वाभिमानाचा ' राम ' जागा झाला. तपेलीं टाकून तो विद्या हस्तगत करण्यास निघाला.

शिक्षण नाही, पैसा नाही, कुणाचा पाठिंबा नाही—अशा परिस्थितीत राम निराश झाला नाही. आपल्या नशिबी विद्या नाही, आपण दरिद्री, आपल्याला दुसऱ्याच्या दास्याशिवाय तरणोपाय नाही या विचारांना रामाने मनात थारा दिला नाही. तो काशीस गेला. बारा वर्षे अध्ययन करून दशग्रंथी वेदविद्यानिपुण बनून तो परत आला. रामाचा रामशास्त्री झाला. रामशास्त्री मराठा साम्राज्याचे सरन्यायाधीश बनले. त्यांच्या दारात हत्ती झुलू लागला !

✠ ✠ ✠

# कृतीशिवाय गती नाही

१

कुस्ती खेळताना कुस्तीगिरास पवित्रा घ्यावा लागतो. लाठी चालविताना पवित्रा घ्यावा लागतो. क्रिकेट खेळताना फलंदाजाला पवित्रा घ्यावा लागतो. प्रतिस्पर्ध्यास तोंड देताना आपणास अनुकूल व प्रतिस्पर्ध्यास प्रतिकूल पवित्रा घ्यावा लागतो. पण जीवन संग्रामात, जीवनास तोंड देताना बहुतेक लोक चुकीचा पवित्रा घेतात, व त्यामुळे जीवनात अयशस्वी ठरतात. जीवनास तोंड देताना ते आपल्या शक्तीस, प्रकृतीस व बुद्धीस पेलेल असा पवित्रा घेत नाहीत. ते नेहमी बचावाकडे दृष्टी ठेवतात. दुसऱ्यावर डाव करण्याचा पवित्रा घेत नाहीत. बचावाची वृत्ती ही आत्मविश्वासाच्या अभावाची द्योतक असते. विजयाचा आत्मविश्वास बाळगून निश्चय व धैर्याने जो पाऊल पुढे टाकतो तो विजयी झाल्याशिवाय राहत नाही. पराभवाची धास्ती घेऊनच जो पुढे पाऊल टाकतो त्यास कधीच यश मिळत नाही.

ज्या दिशेला तुमचे तोंड असेल त्याच दिशेने तुम्ही पुढे जाता. तुम्ही जर कायमच दुःखाकडे तोंड करून बसलात तर तुमची पावले त्याच दिशेने पुढे पडतील. यश मिळवायचे असेल तर यशाकडे तोंड करा, यशाचा विचार करा व विधायक प्रगतिशील कृती आत्मविश्वासाने करा. नाटकातला नट ज्या वेळी आपल्या भूमिकेशी एकरूप व समरस होतो तेव्हाच तो यशस्वी होतो. आपल्या जीवनकार्याशी, ध्येयाशी एकरूप व्हावयास जो शिकतो तोच जगात यशस्वी होतो.

आशावाद हा विधायक कृतीचा पाया असतो. मला यश मिळणारच, व मीं ते मिळविणारच अशी वृत्ती ठेवली पाहिजे. सर्व गोष्टी प्रतिकूल असताना सरकारच्या दडपशाहीच्या वरवंट्याखाली सर्व जनता भरडून निघत असताना, सगळीकडे निराशेचा अंधःकार पसरलेला असताना लोकमान्य टिळकांना भविष्यकाळातील स्वराज्याचा अरुणोदय दिसत होता. कैदेत खितपत पडावे लागले म्हणून ते नाउमेद झाले नाहीत. कैदेतून मुक्त होताच त्यांच्या केसरीच्या पहिल्या अग्रलेखाचे शीर्षक होते "पुनश्च हरि ॐ"! ध्येयाकडे नजर ठेवून ते आगेकूच करीत होते. त्यांचा आशावाद दुर्दम्य होता म्हणूनच ते आत्मविश्वासाने गर्जू शकले : 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच !' त्यांनी लावलेल्या रोपट्यालाच पुढे स्वराज्याचे सुंदर फळ आले.

निष्क्रियतेने काहीच मिळत नाही. थोडीशी अडचण आली, थोडासा विरोध झाला, विपत्तीची पहिलीच झुळूक आली की अनेकांचा निर्धार डळमळू लागतो, धैर्य ढळू लागते, व ते आपले अंगीकृत कार्य सोडून देऊन दैवाला दोष देत स्वस्थ बसतात. अशांच्या हातून मोठे कार्य कधीच होत नाही.

जगात कृतीशिवाय गती नसते. बोलणारा नुसता तोंडांची वाफ वाया घालवतो. 'गर्जेल ते पडेल काय' ही म्हण अनुभवावर आधारलेली आहे. कृतिशील मनुष्य आपल्या भावी कार्याची जाहिरात करीत नाही. तो प्रत्यक्ष कृती करतो. आज आपल्या देशातील पुढारी पण देशाचे मार्गदर्शन करण्यास असमर्थ ठरले आहेत. कारण आजचे बहुतेक पुढारी केवळ भाषणबाजी करणारे वाचाळवीर आहेत. स्वराज्यपूर्व काळात स्वराज्यप्राप्तीनंतर काय करावयास पाहिजे याचा आराखडा कोणी तयारच केला नाही. विधायक कार्य म्हणजे काय ह्याचीच कोणास कल्पना नव्हती. केवळ ब्रिटिशांना 'चले जाव' म्हटल्याने

कारभाराची पात्रता अंगी येत नाही हे कोणालाच कळत नव्हते. तोडणे, पाडणे, जाळणे सोपे असते, बांधणे कठीण असते. विधायक कार्यक्रम आखून त्याची अमलबजावणी करण्याची पात्रता आजच्या आमच्या पुढाऱ्यांच्या अंगी नाही हे स्पष्ट दिसू लागले आहे. निश्चय, निष्ठा, ध्येयवाद, चारित्र्य, ज्ञानसाधना व कार्यप्रवीणता यांची आज जरूर आहे. हवेतल्या वावड्या आता नको आहेत. आता कृती, भरीव कार्यक्रम, विधायक कार्यक्रम, कठोर निश्चय यांची आवश्यकता आहे. कृतीशिवाय आम्हास गती नाही.

जपान व जर्मनी हे दोन्ही देश गेल्या महायुद्धात उद्ध्वस्त झाले होते. कारखाने नष्ट झाले होते. ७० लाख जर्मन रणांगणात व बॉंब हल्ल्यात मारले गेले होते. जपानचे साम्राज्य छिनावून घेण्यात आले. जर्मनीचे दोन तुकडे पाडण्यात आले. पण जपान व जर्मनीमधील लोक कपाळास हात लावून नशिबास दोष देत बसले नाहीत. सुदैवाने त्यांना बाष्कळ बडबडणारे पुढारी लाभले नाहीत. कृतिशील निष्ठावान पुढारी त्यांना लाभले. त्यांनी विधायक कार्यक्रम आखले. लोकांनी कमरा कसल्या. घड्याळाकडे बघून कोणी काम केले नाही. त्यांनी राखेतून नवी सृष्टी निर्माण केली. १५ वर्षांत त्यांनी आपल्या देशाचा कायापालट केला. पराभूत झालेला, उद्ध्वस्त झालेला जर्मनी भारताला कोट्यवधी रुपयांचे कर्ज देऊ शकला, पण आपण मात्र स्वतःच्या डोक्यावर फक्त कर्जाचे ओझे घेतले आहे. अन्नान्न होऊन आपण दुसऱ्याकडे याचक वृत्तीने हात पुढे करीत आहोत. याचे कारण एकच—आपण कृती करण्यास शिकलो नाही. कृतीशिवाय गती नाही हे आपण ओळखले नाही.

भारताचे भावी पुढारी आजच्या युवकांतून, आजच्या विद्यार्थ्यांतून निर्माण व्हायचे आहेत. त्यांनी जुन्या पुढाऱ्यांचे पुढारीपण झुगारून दिले पाहिजे. नवे विधायक कृतिशील नेतृत्व त्यांनी निर्माण केले पाहिजे.

देशाच्या हिताची पोटतिडीक सामान्य जनतेत व पुढाऱ्यांत असल्याशिवाय देशाचा उद्धार होत नाही.

थॉमस एडिसनचे नाव सर्वांस माहीतच आहे. त्याचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला होता. पण थॉमस चलाख पोऱ्या होता. त्याने एका रेलवे फाट्यावर वर्तमानपत्रे विकण्याची परवानगी मिळविली. एकच गाडी त्या फाट्यावर खेपा करी. गार्डशेजारच्या मोकळ्या ब्रेकव्हॅनमधून तो प्रवास करी. वर्तमानपत्रे विकल्यावर वेळ मोकळा राही म्हणून छोट्या थॉमसने ब्रेकव्हॅनमध्येच एक बाक टाकून तेथे आपली रसायन-प्रयोगशाळा सुरू केली. एकदा प्रयोग करताना दोन रसायनांच्या संयोगाने स्फोट होऊन डब्यास आग लागली, तेव्हा गार्डाने कानशिलात मारून थॉमसला हाकून दिले! आता पुढे काय? तेथून दुसरे गाव काही अंतरावर होते. थॉमसने लगेच तेथून तार टाकून दोन गावात तारायंत्र सुरू केले. एका प्रयोगातून दुसरा प्रयोग सुरू होत होत त्याने प्रचंड प्रयोगशाळा उभारली, व सुमारे १००० शोध लावले. संपत्ती, प्रतिष्ठा, मान त्याच्या दारी चालून आले. कृतीमुळेच त्याच्याकडे संपत्ती धावत आली.

अनेक वेळा आपल्याला अशी काही माणसे भेटतात की, त्यांना पाहिल्यावर, त्यांच्याशी चार शब्द बोलल्यावर ही माणसे विधायक कृतिशील माणसे आहेत याची आपणास खात्री पटते. त्यांच्या बोलण्यात आत्मविश्वास प्रतीत होतो. ही माणसे वेगळी आहेत असे वाटते. त्यांच्याकडे समाजाचे, धंद्याचे, देशाचे पुढारीपण आपोआप येते. ते ज्यास हात घालतील ते काम यशस्वी होईल असे आपणास वाटते. बहुसंख्य माणसे अनिश्चित असतात. ती दुसऱ्याची अनुयायी बनतात. त्यांच्यात स्वत्व नसते. आत्मविश्वास, धमक, धडक, धैर्य नसते म्हणून ते अनुयायीच राहतात.

पदवीधर शेकड्यांनी बाहेर पडत असतात. पण त्यांपैकी पुढे कितीजण चमकतात? कलेक्टर एकच असतो. त्याच्या हाताखाली ५०० कारकून असतात. योजना आखणारा द्रष्टा एंजिनीयर एकच असतो. बाकीचे मिस्त्री असतात. एम्. बी. बी. एस्. झालेले अनेक डॉक्टर तालुक्यांतील सरकारी दवाखान्यांत बाटल्या भरीत असतात. शेकड्यांनी मोजता येणारे शिक्षक असतात, पण न्यू इंग्लिश स्कूल स्थापणारे चिपळूणकर, आगरकर हाताच्या बोटांवर मोजण्यासारखे असतात. याचे कारण कृतीचा, आत्मविश्वासाचा, धैर्याचा अभाव होय.

आयुष्याच्या उंबरठ्यात पाऊल टाकणाऱ्या तरुणाने "मला यशस्वी व्हावेसे वाटते खरे, पण मला यशाची खात्री वाटत नाही. मी जे कार्यक्षेत्र निवडले आहे त्यात फार गर्दी आहे. पुढे येण्यास मला वाव मिळेल का नाही याची खात्री नाही. मी हे कार्यक्षेत्र निवडण्यात चूक तर नाही ना केली असे मला वाटते." अशा तऱ्हेचे विचार मनात आणू नयेत. अशा तऱ्हेचे विचार त्या कर्तृत्वशक्तीस सुरुंग लावीत असतात. उलट, मी या कार्यक्षेत्रात नवीन काही तरी करून दाखवीन अशी ईर्षा बाळगली पाहिजे. आपल्या विषयाचा अभ्यास करून त्याचे चिंतन करून, दुसरे कोठे चुकतात, त्या चुका कशा टाळता येतील याचा विचार करून कार्यपद्धतीत नावीन्य आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नव्या योजना, नवे विचार, नव्या सुधारणा वरिष्ठापुढे ठेवल्या पाहिजेत, तरच त्याच्याकडे वरिष्ठांचे लक्ष जाईल. हा तरुण कर्तबगार आहे. हा उत्पादन वाढवील, कार्यक्षमता आणील, नव्या कल्पना कार्यवाहीत आणील अशी त्यांची खात्री पटेल, व बढतीचा जिना तो चढू लागेल.

कांही वर्षांमागे प्रस्तुत लेखकाचे पुणे-लष्कर हद्दीत मॅट्रिक व सीनिअर केंब्रिजचे खाजगी वर्ग होते. एके दिवशी एक २७–२८ वर्षांचा तरुण माझ्याकडे आला. त्याचे लग्न झाले होते, व तो केन्द्र

सरकारच्या नोकरीत स्टेनो टायपिस्ट होता. तो मद्रासी होता. त्याचे नाव भूपाल असे होते. त्याला आपल्या खात्यात बढती मिळविण्या-करता सीनियर केंब्रिजच्या परीक्षेला बसावयाचे होते. मी त्यास म्हटले, " मि. भूपाल, तुमचे वय झालेले आहे. तुमचे लग्नही झालेले आहे. तुमची अभ्यासाची सवय सुटलेली आहे. तुम्हांस हा अभ्यास झेपेल का नाही याची मला शंका आहे.". श्री. भूपाल म्हणाले, " सर, त्याची काळजी नको. मी अभ्यासाची पराकाष्ठा करीन. तुम्ही मला मार्गदर्शन करा. " वर्गातील इतर युरोपियन, अँग्लो इंडियन व हिंदी विद्यार्थ्यांना हा वयातीत मनुष्य कसली परीक्षा पास होतो असे वाटे. पण भूपालांचा खाक्या वेगळा होता. गणिताखेरीज, इंग्रजी, इतिहास, भूगोल हे विषय मी व माझे बंधू समजावून सांगत असताना भूपाल ही सगळी व्याख्याने शार्ट हँडमध्ये लिहून घेई. घरी जाऊन ती टाईप करून दुसऱ्या दिवशी व्याख्यानांची एक एक प्रत मला व माझे बंधूंना देई. कानाने ऐकून, हाताने लिहून व फिरून टाइपिंग केल्यामुळे ती व्याख्याने त्याच्या मनावर ठसत. तो पहिल्याच खेपेस पास झाला. पुढे २२–२५ वर्षे त्याचा पत्ता नव्हता. १९५५–५६ साली एके दिवशी अचानक मि. भूपाल माझ्या घरी आला. " सर, मला ओळखले ? " त्याने विचारले. मी म्हटले, " हो, तुम्ही मिस्टर भूपाल ना ? हल्ली काय करता तुम्ही ? " मिस्टर भूपाल म्हणाले, " सर, मी आता रिटायर होणार आहे. पण जुन्या सर्व्हिस नियमाखाली मला इंग्लंडला जाऊन रिटायर होऊन भारतात परत फुकट यायला मिळणार आहे. आपले बंधू पूर्वी विलायतेस होते. मला त्यांचा पत्ता हवा आहे." मी आश्चर्याने थक्क झालो. पूर्वी वरिष्ठ दर्जाच्या ( Class I ) अधिकाऱ्यांनाच ही सवलत मिळे. हा भूपाल वरिष्ठाधिकारी झाला केव्हा ? तेव्हा त्याने मला सर्व हकीगत सांगितली, " सर, तुम्ही व तुमच्या बंधूंनी

माझ्यावर फार उपकार केले आहेत. तुमच्यामुळे मी सीनियर केंब्रिज परीक्षा पास झालो. त्यामुळे मला एकदम मोठी बढती मिळाली. लढाईच्या वेळी मी सिव्हिल सप्लाइज खात्यात नोकरी धरली. माझी हवे तेथे जाण्याची तयारी होती. शेवटी मी अंदमान-निकोबार बेटांचा फूड-कमिशनर म्हणून रिटायर होत आहे. " मला आनंद झाला. त्याचे अभिनंदन करून मी म्हटले, " Mr. Bhoopal, you have really proved that man is the maker of his fate and the Captain of his sould. You are the architect of your good fortune. " भूपाल जर खालच्या नोकरीतच समाधान मानीत, पोरवडा सांभाळीत, धडपड न करता बसले असते तर हेड क्लार्कच्या हुद्द्यापलीकडे गेले नसते. त्यांनी कृती केली म्हणूनच त्यांना गती मिळाली.

✠ ✠ ✠

# लक्ष्मी असता उभी दारी - का भटकता दारोदारी ?

१०

'काखेत कळसा नि गावाला वळसा' अशी मराठीत म्हण आहे. अनेक वेळा संधी जवळ असताना तिला शोधण्याकरता आपण रानोमाळ हिंडतो. ईश्वराला हुडकायला लोक यात्रेला जातात. हजारो मैलांची पायपीट करतात. चारी धामांच्या यात्रा करतात. तरी ईश्वर सापडत नाही. ईश्वराला शोधायला काशी-रामेश्वराची यात्रा करण्याची जरूर नाही. तो तुमच्या हृदयातच असतो. थोडे अंतर्मुख व्हा, की तो तुम्हांस सापडेल.

ज्या मनुष्यात गुण असतील, कर्तृत्व असेल, कामाची, कार्याची पोटतिडीक असेल, चिकाटी असेल, त्याला आपल्या कर्तबगारीला वाव मिळण्याकरता क्षेत्र निवडण्यासाठी दूर जाण्याची जरूर नाही तो असेल त्या जागीच आपल्या कर्तृत्वाने यशाचे मंदिर उभारू शकतो. पण बहुतेक माणसे नेहमी 'आमच्या कर्तबगारीला वावच नाही, क्षेत्रच नाही, संधी नाही' अशी ओरड करताना आढळतात. जो खरा कर्तबगार असतो तो लाथ मारील तेथे पाणी काढतो. त्याच्याकडे संधी चालत येते.

कॉलेजात असताना जर्मन भाषेत एक कविता वाचल्याचे मला आठवते. त्यात कवी म्हणतो, "प्रेम ! प्रेम ! प्रेम ! या प्रेमाने मी वेडा झालो. हे प्रेम प्राप्त करून घेण्याकरिता मी पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र हिंडलो. श्रीमंताच्या प्रासादाच्या दारात व गरीबाच्या झोपडीपुढे मी प्रेमाकरता झोळी पसरली, पण मला प्रेमाची भीक कुणीच घातली नाही. शिणून,

थकून, निराश होऊन मी घरी परतलो. फाटक उघडून घराच्या पायऱ्यांकडे निघालो. पायरीवर माझी माता उभी होती. मला पाहताच तिच्या डोळ्यांत मला प्रेमाचे पाणी दिसले. प्रेमाकरता मी वणवण हिंडलो; पण शेवटी खरे प्रेम मला माझ्या दारातच, माझ्या मातेच्या डोळ्यांत दिसले !"

संधीकरता, कर्तबगारी दाखविण्याकरिता दूर जाण्याची कशाला धडपड करता ? तुम्ही असाल तेथे तुम्हांस वाव मिळेल. तुमच्यात गुण मात्र असले पाहिजेत.

भारतात कर्तबगारीला वाव नाही, येथे संधी मिळत नाही, गुणांचे चीज होत नाही, अशी ओरड आपण नेहमी ऐकतो. पण सायकल-दुरुस्तीचे दुकान चालविणारे कै. लक्ष्मणराव किर्लोस्कर दैवाला दोष देत स्वस्थ बसले नाहीत. त्यांच्याजवळ कर्तबगारी होती, चिकाटी होती व दुर्दम्य आशावाद होता. म्हणूनच ते कुंडल रेल्वे स्टेशनजवळच्या रानात किर्लोस्करवाडी उभी करू शकले. त्यांनी लावलेले रोपटे फोफावून आता त्याचा प्रचंड वृक्ष बनला आहे. आजचा किर्लोस्कर उद्योगसमूह त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देत आहे.

कोण म्हणतो भारतात संधी नाही ? संधीची वाट पाहत बसणाऱ्यास ती कधीच सापडत नाही. संधी निर्माण करावी लागते. श्रीमंत विष्णुपंत वेलणकर हे कापडाच्या गिरणीत ६ आणे रोजावर काम करणारे मजूर होत. ते नशिबाला दोष देत बसले असते, संधी नाही म्हणून रडत बसले असते तर मजूर एके मजूरच राहिले असते. फार तर ६ आण्यां-ऐवजी त्यांना बढती मिळून रोजी २—३ रुपये मिळाले असते. पण विष्णुपंतांत ईर्ष्या होती, धाडस होते, कर्तृत्व होते. आहे त्यात समाधान मानण्याची त्यांची वृत्ती नव्हती. त्यांच्यांत रग होती, स्वतःचा भाग्योदय करून घण्याची पोटतिडीक होती. लक्ष्मी पौरुषावर, कर्तृत्वावर भाळते. ती नेभळ्याच्या गळ्यात माळ घालीत नाही. तिला जिंकावी लागते.

विष्णुपंतांनी कष्टाचे डोंगर उचलले. कल्पकतेने नवी डिझाइन्स त्यांनी बनविली. अल्प भांडवलावर धंदा सुरू केला. मिळालेला पैसा चैनीत घालविण्याऐवजी त्यांनी गजानन मिल काढली. गांधीवधानंतरच्या जाळपोळीत गिरणी जळली, पण विष्णुपंतांनी हातपाय गाळले नाहीत. उलट त्यांनी एकाऐवजी दोन गिरण्या उभारल्या. १०००—१५०० लोकांचे ते अन्नदाते बनले. स्वतःच्या एकसष्टीच्या प्रसंगी सुवर्णतुला करून ५ लाख रुपये त्यांनी दानधर्मात खर्च केले. शिक्षणसंस्थांना सढळ हस्ते मदत केली. आज ते ' धनी ' वेलणकर बनले आहेत.

आपण महाराष्ट्रीय धडपडे नाही. आमच्या सुशिक्षितास कष्टाचे काम नको. तो घड्याळाकडे बघून काम करतो. ठरलेल्या पाट्या टाकल्या की, आपले काम संपले असे म्हणतो. घरी येऊन किंवा क्लबात जाऊन वरिष्ठांना व इतर प्रान्तीयांना शिव्या देत बसतो. पण इतर प्रान्तीय पुढे का जातात याचा विचार करीत नाही. मुंबई महाराष्ट्रात आहे. तेथे हजारो उद्योग-धंदे आहेत. हजारो ऑफिसे आहेत. पण त्यांतील सेक्रेटरी, स्टेनोटायपिस्ट, मॅनेजर या हुद्द्यांवर किती महाराष्ट्रीय आहेत? किती उद्योगधंदे महाराष्ट्रीयांच्या मालकीचे आहेत? आपण केवळ कारखान्यातील मजूर व ऑफिसातील कारकून आहोत.

फाळणीनंतर सिंधमधून सुमारे १०—१२ लाख सिंधी व ४—५ लाख पंजाबी निर्वासित महाराष्ट्रात आले. त्यांचे सर्वस्व गेले होते. पण भीक मागणारा एक तरी सिंधी किंवा पंजाबी आपणास दिसतो काय? त्यांनी फेरीवाल्याचा, कापडाचा, सुतारीचा, गवळ्याचा, भाजी विकण्याचा असे नाना धंदे सुरू केले. आज ते स्वतःची घरे बांधून राहत आहेत. याचा अर्थ महाराष्ट्रात १०—१५ लाख लोकांना लहान—मोठ्या धंद्यांत वाव होता, पण महाराष्ट्रीयांनी आपली संधी दवडली. ते बेकारच राहिले.

त्यांच्या दारी लक्ष्मी उभी होती. तिला त्यांनी दूर लोटले. दुसऱ्यांनी तिला जिंकले.

ब्राझील देशातील डोंगराळ भागात काही धनगर राहत होते. त्यांना जेमतेम उदरनिर्वाहापुरते उत्पन्न मिळे. त्यांनी कॅलिफोर्नियात सोने सापडते असे ऐकले. त्यांनी घरेदारे, डोंगर, मेंढ्या विकल्या व कॅलिफोर्नियात सोन्याची खाण शोधून काढण्याकरता ते निघाले. प्रवासात करमणुकीकरता सारीपाट खेळावयास डोंगरात सांपडलेल्या काही चकचकीत गारगोट्या त्यांनी घेतल्या. ते कॅलिफोर्नियात पोचले. बहुतेक गारगोट्या त्यांनी फेकून दिल्या. एके दिवशी एका जवाहिऱ्याने एका धनगराजवळ एक गारगोटी पाहिली. त्याने तत्काल ती गारगोटी नसून हिरा आहे हे ओळखले. त्याने धनगरास ते सांगताच त्यास व त्याच्या मित्रास ब्राझील सोडून आल्याचा पश्चात्ताप झाला. ते घाईघाईने परत ब्राझीलला आले. पण मध्यंतरी अनेक महिने लोटले होते. त्यांच्या जुन्या जमिनी व डोंगर दुसऱ्याने विकत घेतल्या होत्या. त्यांना हात चोळीत बसावे लागले. परक्या देशात सोने हुडकावयास जाणाऱ्या धनगरांनी स्वतःच्या पायाखाली खणले असते तर त्यांना कुबेराची संपत्ती मिळाली असती.

जगात प्रत्येक माणसाला वाव असतो. त्याला, त्याच्या कर्तबगारीस अनुरूप असे स्थान असते. मात्र त्याने स्वतःचे कर्तृत्व, आलेली संधी ओळखली पाहिजे. चार गोष्टी कधीही परत येत नाहीत. ईश्वर सुद्धा त्यांना परत आणू शकत नाही. या चार गोष्टी म्हणजे—बोललेला शब्द, दोरीपासून सुटलेला तीर, गेलेला क्षण व चुकलेली संधी—या होत. यशाकरिता संधीची शिकार साधावी लागते. या नव्या बदलत्या जगात, रोज नवे शोध लागणाऱ्या या जगात हव्या तेवढ्या संधी मिळू शकतात. आज भारतात औद्योगिक क्रान्ती घडून येत आहे. ज्याच्या

जवळ कल्पकता, कर्तृत्व, चिकाटी, धैर्य व कष्टाची हौस आहे त्याला पुढे येण्यास हवा तितका वाव आहे.

अनेक वेळा ज्याच्याकडे आपण दुर्लक्ष करतो, ज्या क्षुद्र आहेत असे समजतो अशा रद्दी, चिंध्या, फुटक्या काचा, लोखंडाचे तुकडे, इत्यादी वस्तूंचा व्यापार करून कैक लोकांनी लाखो रुपये कमावले आहेत. मुंबईत चिंधीवाला नावाच्याच व्यापाऱ्याने कागदाच्या गिरण्यांस चिंध्या विकून लाखो रुपये मिळविले. पुण्यास नुसती रद्दी आणण्याकरता एका रद्दीच्या व्यापाऱ्याने ४ ट्रक्स ठेवल्या आहेत. तीन वर्षांपूर्वी मी काल्र्याच्या सरकारी हेल्थ कॅम्पमध्ये काही दिवस राहिलो होतो. एके दिवशी आडवाटेने शेतातून स्टेशनकडे येत असताना ८–१० दाक्षिणात्य तामीळ तेलगू स्त्रिया शेतातून तरतऱ्हेचे गारगोट्यांसारखे निरनिराळ्या रंगांचे साधारणपणे आंब्याच्या आकाराचे दगड गोळा करताना दिसल्या. दगडांनी भरलेली ५–७ पोती त्यांच्याजवळ दिसत होती. माझे कुतूहल जागृत होऊन मी त्यांच्याजवळ त्या दगड कशाकरिता गोळा करीत आहेत याची चौकशी केली. एक मुंबईचा व्यापारी त्यांच्याकडून ७ ते १० रुपयांस एक पोते दगड घेतो असे कळले. तो व्यापारी ते दगड कापून व त्यांना पॉलिश करून किंवा चमत्कारिक आकार देऊन अमेरिकेत व मुंबई, दिल्ली, कलकत्यास पेपरवेटस म्हणून विकतो असे कळले. तो व्यापारी दगडातून सोने मिळवीत होता. त्याच्याजवळ कल्पकता होती म्हणूनच तो हे करू शकला.

बुटास लेस ओवण्याकरता बारीक भोके किंवा डोळे असतात. पूर्वी लेस ओढून ताणताना ती फाटत. अमेरिकेतील एका गरीब माणसाच्या बुटाच्या लेसची भोके फाटली होती. नवा जोड घेण्यास त्याच्या जवळ पैसे नव्हते. फाटलेल्या भोकाकडे पाहत असताना त्याला चटकन एक कल्पना सुचली. तांबे, पितळ किंवा लोखंडाच्या पातळ पत्र्याची

गोल भोके करून ती बुटाच्या डोळ्यांत घट्ट बसविल्यास बुटाचे डोळे फाटणार नाहीत, व बूट अधिक काळ टिकतील असे त्यास वाटले. मजूरी करून त्याने चार पैसे जमविले, व बुटांकरिता पितळी डोळे बनवून लाखो रुपये मिळविले.

धुलाईच्या यंत्राचा शोधही अशाच अकल्पित रीतीने लागला. एका माणसाची पत्नी आजारी पडली. म्हणून घरचे सर्व धुणे त्यालाच धुणे भाग पडले. आतापर्यंत धुणे धुण्यात किती कष्ट असतात हे त्यास माहीत नव्हते. कपडे धुताना त्याची कंबर दुखू लागली. हा त्रास कसा वाचविता येईल याचा तो विचार करू लागला. त्यातूनच धुलाईचे यत्र निर्माण झाले.

मायकेल फॅराडे हा आधुनिक विद्युत् शास्त्राचा जनक समजला जातो. त्याचे वडील घिसाडी होते. ते लवकरच वारल्यामुळे शाळेस रामराम ठोकून फॅराडे एका पुस्तकबांधणीच्या दुकानात नोकरीस राहिला. पण फॅराडेत ज्ञानलालसा होती. आलेल्या पुस्तकांची बांधणी करता करता तो ती वाची. विज्ञानावरील पुस्तकांत अनेक प्रयोगांची वर्णने येत आपणही प्रयोग करावेत व वैज्ञानिक व्हावे असे त्यास वाटू लागले. लंडनमध्ये एक वैज्ञानिक व्याख्यान-माला चालू होती. तो प्रत्येक व्याख्यान काळजीपूर्वक ऐकून त्याची टिपणे तयार करी. शेवटी सर्व टिपणांचे एक पुस्तक करून त्याने त्यास सुंदर बाइंडिंग करून ते मुख्य व्याख्यात्यास म्हणजे सर हम्फ्रे डेव्ही यास नजर केले. त्यामुळे त्याची सर डेव्हीशी ओळख झाली. डेव्हीच्या प्रयोगशाळेत तो नोकरी मागण्यास गेला. डेव्हीने आपल्या सहकाऱ्याचा सल्ला विचारला. सहकारी म्हणाला, ‘ त्यास बाटल्या धुण्याचे काम सांगा. त्याला खरीच ज्ञानलालसा असेल तर तो हेही काम पत्करील. नसेल तर तो नोकरी पत्करणार नाही.’

फॅराडे बाटल्या धुऊ लागला. पण तो डोळस होता. तो प्रयोग-शाळेतील गोष्टींचा अभ्यास करू लागला. पुढे तो डेव्हीचा सहाय्यक बनला; विद्युत् शास्त्राचा पाया त्याने घातला.

ज्याच्या जवळ निरीक्षणशक्ती आहे, त्यास संधी शोधणे कठीण नसते. आपल्या आजूबाजूस नजर टाका. समाजाला काय पाहिजे, कशाची गरज आहे ह्याचा अभ्यास करा. मुंबईस दोन खोल्यांच्या बिऱ्हाडात राहणाऱ्या कुटुंबाला वर्षाची लोणची, पापड, मसाले, हे पदार्थ करण्यास व साठविण्यास जागा नसते. हे ओळखून बेडेकरांनी लोणची, मसाले तयार करण्यास सुरुवात करून त्या धंद्यात यश मिळविले.

# विचार हाच उपचार

## ११

पृथ्वीपासून लाखो मैल दूर असलेल्या ताऱ्यांच्या प्रकाशाचे पृथक्करण करून आधुनिक वैज्ञानिक त्या ताऱ्यांच्या वातावरणात कोणते धातू जळत आहेत हे सांगू शकतात. त्याप्रमाणेच मानसशास्त्रज्ञ अनोळखी माणसाच्या मनातील विचार ओळखू शकतात. माणसाच्या मनातील विचारांत अमृत आणि विष दोन्ही असतात. सद्‌विचार केवळ त्याच्या मनालाच नव्हे तर शरीरालाही शान्तता व आरोग्य प्राप्त करून देतात. त्याच्या चेहऱ्यावर हृदयातल्या प्रेमाची स्निग्धता दिसून येते.

परिस्थितीचा आपणावर परिणाम होतो यात शंका नाही. पण त्या परिणामाचे प्रमाण तुमच्या मनावर अवलंबून असते. धांदरट, भित्र्या माणसावर छोट्याशा गोष्टीचाही मोठा परिणाम होतो. त्याचा संयम, मनावरचा ताबा सुटतो. पण विचारी, संयमी माणसावर त्याच गोष्टीचा काहीही परिणाम होत नाही. पुष्कळ वेळा आपण एखाद्या माणसाचे सर्वस्व गेले असतानाही तो शान्त, धीमा असलेला पाहतो; त्याच्या तोंडून निराशेचा, रागाचा, उद्वेगाचा उच्चारही ऐकू येत नाही. अनर्थ, हानी, दुःख त्याच्या मनाचा समतोलपणा ढळवू शकत नाहीत. बदक पाण्यात राहते, पण ते ओले होत नाही, पाणी त्याच्या अंगावरून ओघळून जाते. कारण निसर्गाने त्याच्या पंखांना तेलकटपणा दिला आहे. तशीच काही माणसे आढळतात. चारी बाजूंनी परिस्थितीने कुचलून निघत असतानाही त्यांचा संयम, तोल सुटत नाही. ते आपले दैनंदिन

काम जणू काय काही घडलेच नाही अशा वृत्तीने करीत असतात. ते आपल्या विचारशक्तीने परिस्थितीवर, दु:खावर मात करतात. दु:खाच्या व निराशेच्या विषावर ते आनंदी वृत्तीच्या औषधाचा उतारा देतात.

जेव्हा तुमच्या मनावर भीती व चिंतेचा पगडा बसतो तेव्हा तुमची प्रतिकारशक्ती कमी झाली आहे, तुमच्यात मानसिक दौर्बल्य आले आहे असा त्याचा अर्थ होतो. म्हणजे भीतीच्या विचारांना तुम्ही तुमच्या मनावर मात करून दिलेली असते. यावर उपाय म्हणजे आपले मानसिक सामर्थ्य वाढविणे हा होय. निराशेच्या आहारी जायचे नाही असा तुम्ही निश्चय केला पाहिजे. पहिल्या महायुद्धात सुरुवातीस जर्मनांची सरशी होती. ब्रिटिश व फ्रेंच फौजांना एकसारखी माघार घ्यावी लागत होती. कोणीही साधारण सेनापती नाउमेद व्हावा अशी परिस्थिती होती. पण दोस्तांचा सरसेनापती मार्शल फॉश हा हिम्मत हरला नाही. एके दिवशी सगळीकडून पराभवाच्या बातम्या येत होत्या. सर्वजण हवालदिल झाले. पण फॉशचा उत्साह उतू जात होता. तो म्हणाला, " उजवी फळी फुटली आहे. डावी बगल माघार घेत आहे. मधल्या फळीला दुष्मन मागे रेटत आहे. झकास, हीच प्रतिहल्ला करण्याची वेळ आहे. चला, प्रतिहल्ल्याच्या तयारीस लागा ! ! " काय मन असेल या नर-व्याघ्राचे ! त्याने आपल्या मनात पराभूत विचारांना स्थानच दिले नाही. शेवटी विजयश्रीने त्याला माळ घातली त्यात नवल ते काय ! स्त्रीप्रमाणेच विजयश्रीही मर्दालाच माळ घालते.

मनात सुविचार आले की, कुविचार बाहेर पळून जातात. शत्रूबद्दल-ही वाईट विचार आणू नका. त्याचे अनहित चिंतू नका. प्रेमाच्या राज्यात द्वेषाला स्थान नसते. पाण्याने आग विझते त्याप्रमाणेच प्रेमाच्या पर्जन्याने द्वेषाचा अग्नी शमतो. प्रेम असते तेथे शत्रुत्व येईलच कसे ?

तुम्ही म्हणाल, ही पुराणातली वांगी नेहमी पुराणातच राहतात. पण हे खरे नाही. दुसरे तुमचा द्वेष करतात असे तुम्हांस वाटते त्या वेळी काय होते ? तुम्ही दुसऱ्याबद्दल वाईट विचार मनात आणलेत, त्याचा द्वेष केलात की तोही तुमचा द्वेष करतो. द्वेष ही एक तऱ्हेची परतफेड असते. दुसऱ्याच्या कृतीत, वाणीत तुम्ही वाईट तेवढेच का शोधता ? तुम्ही वाइटाच्या शोधास लागलात की तुम्हाला वाईटपणाच सर्वत्र भेटेल. दुसऱ्यातले चांगले का शोधीत नाही ? तुम्ही दुसऱ्यातले सद्‌गुण, चांगलेपणा, उदारता—शोधा, तुम्हांला त्यांचीही भेट होईल.

बीज प्रथम लहान असते. ते अंकुरते, वाढीस लागते, व पुढे त्याचा मोठा वृक्ष होतो, आणि तो सहज उपटून टाकता येत नाही. द्वेषाच्या बीजाला वृक्षाचे स्वरूप आले की तो तोडणे कठिण जाते. टणटणीच्या झाडाला गुलाबाची फुले कशी येतील ? उलट धोतऱ्याच्या बनात उगवली तरी तुळस ती तुळसच राहते.

तुम्ही दुसऱ्यास प्रेम दिलेत तर त्याच्यापासून तुम्हांस प्रेमाची परतफेड मिळते. सर्व माणसे ईश्वरानेच निर्मिली आहेत. प्रत्येकात देवपणाचा काही अंश असतोच. तो परिस्थितीने, वाईट शिक्षणाने, दुसऱ्याच्या अनुकरणाने काही वेळा झाकून जातो, दडपून जातो, ही गोष्ट खरी आहे. पण त्याच्या सुप्त देवपणास तुम्ही प्रेमाने आवाहन केले तर ते देवपण वर उफाळून आल्याशिवाय राहणार नाहीं.

सिंह हा रानटी पशू आहे. तो क्रूर असतो. दुसऱ्या जनावरांना मारूनच तो जगत असतो. पण क्रूर सिंहही प्रेमाला साद देतो. आन्ड्रोक्लिस हा एक ग्रीक गुलाम होता. त्याच्या मालकाने त्याचा अतोनात छळ केला. शेवटी छळास कंटाळून तो जंगलात पळून गेला. घनदाट जंगलात एका वृक्षाखाली तो बसला असताना त्यास अचानक सिंहगर्जना ऐकू आली. तो गर्भगळित झाला. पळणार तरी कोठे ?

इतक्यात समोरून त्यास एक सिंह येताना दिसला. आता आपली शंभर वर्षे भरली असे त्यास वाटले. पण येवढ्यात त्याने पाहिले की सिंह किंचित लंगडत आहे. त्याचा पुढला एक पंजा जमिनीवर टेकताच तो दु:खाचा सुस्कारा टाकी. त्याने निरखून पाहिले तो त्याचा पंजा सुजला होता. त्यात बहुधा काटा घुसला असावा असे त्यास वाटले. त्याला सिंहाची दया आली. त्याची भीति पळाली. तो सिंहाच्या जवळ गेला. सिंहाने त्यास काहीही केले नाही. त्याने त्याचा पंजा उचलून पाहिला. पंजात काटा घुसून त्यात पू होऊन त्यास ठणका लागला होता. त्याने शेजारच्या एका काटेरी झुडपाचा काटा तोडून घेतला व काट्याने सिंहाच्या पंजातील काटा काढला. पू पिळून टाकला. सिंहाचा ठणका दूर झाला. सिंहाने कृतज्ञतेने, प्रेमाने आपल्या उपकार-कर्त्याचे हात चाटले व तो जंगलात निघून गेला !

दुर्दैवाने आन्द्रोक्लिसच्या मागावर त्याच्या मालकाचे नोकर होते. त्यांना आन्द्रोक्लिस सापडला. ग्रीसमधील तत्कालीन कायद्याप्रमाणे गुलामाने मालकापासून पळून जाणे हा गुन्हा असून त्यास देहान्ताची शिक्षा असे आन्द्रोक्लिसची चौकशी होऊन त्यास देहान्ताची शिक्षा फर्मावण्यात आली. त्या काळी बंदिस्त जागेत गुन्हेगारास सोडून त्याच्या अंगावर मुद्दाम उपाशी ठेवलेला एखादा सिंह सोडण्यात येई. राजा, सरदार, अधिकारी व सामान्य लोक हा क्रूर तमाशा पाहण्यास जमत. आन्द्रोक्लिसला बंदिस्त जागेत सोडण्यात आले. भिंतीपाशी असलेल्या गजाचे दार असलेल्या खोलीत उपाशी सिंह गर्जना करीत होते. खोलीचे दार उघडण्यात आले. बुभुक्षित सिंह विक्राळ जबडा उघडून बाहेर पडला. त्याने भयानक गर्जना केली. आन्द्रोक्लिस थरथर कापत मृत्यूची वाट पाहत उभा होता सिंह आता चार हातांवर आला. आता पुढली झेप तो आन्द्रोक्लिसवर घेणार, एवढ्यात काय चमत्कार झाला पाहा ! सिंह

आन्द्रोक्लिसवर तुटून पडण्याऐवजी शेपटी खाली करून हळूहळू त्याच्याजवळ आला. त्याने आन्द्रोक्लिसला हुंगले व दुसऱ्या क्षणी तो त्याचे पाय चाटू लागला. आन्द्रोक्लिस त्यास प्रेमाने थोपटू लागला. राजा व प्रेक्षक हे दृश्य पाहून थक्क झाले. सिंह आपला क्रूरपणा विसरला कसा हे जाणून घेण्याची त्यांस उत्कंठा लागली. सिंह परत खोलीत गेला. दार बंद झाले. राजाने आन्द्रोक्लिसला सिंहाच्या वागणुकीचा उलगडा करण्यास सांगितले. आन्द्रोक्लिसने सर्व हकीगत सांगितली. ज्याचे दुःख त्याने दूर केले होते तोच तो सिंह होता. आन्द्रोक्लिसचे उपकार तो हिंस्र पशू विसरला नव्हता. राजाने संतुष्ट होऊन आन्द्रोक्लिसला माफी देऊन त्याची गुलामगिरीतून मुक्तता केली.

# निरुद्योग हा महारोग

१२

महारोगी पाहिला की त्याचे व्याधिग्रस्त शरीर पाहून साधारण माणसास किळस येते. पण निरुद्योगीपणा हा महारोगापेक्षाही महा भयंकर सामाजिक रोग आहे. ज्या कुटुंबात वा समाजात हा रोग मूळ धरतो त्या कुटुंबाचा किंवा समाजाचा समूळ नाश झाल्याशिवाय राहत नाही. आपल्या देशात या रोगाचे प्राबल्य फारच आहे. भारतात, समाजाच्या श्रमावर बांडगुळाप्रमाणे पोसणारे तथाकथित ४० लाख साधू–बैरागी आहेत. त्याशिवाय प्रत्येक गावात भीक मागणारे शेकडो भिकारी आहेत. अनेक कुटुंबांत काडीचेही काम न करता दोन वेळा ढेकरा देत जेवणारे मानवरूपी किडे जगत असतात. आपण खुळ्या धार्मिक भावनांच्या आहारी जाऊन व कुटुंबाच्या प्रतिष्ठेस बळी पडून या ऐतखाऊंस पोशीत असतो. इंग्रजीत ‘ An idle brain is the devils’ workshop ’ अशी म्हण आहे. ( रिकामे मन सैतानाचा कारखाना असतो. ) सैतान इतर लोकांना भुरळ पाडतो, पण निरुद्योगी माणूस सैतानाला भुरळ पाडतो. निरुद्योगीपणा गुन्हेगारीचे मूळ आहे. तुरुंग निरुद्योगी माणसांनी भरलेले असतात. ज्यांना कष्ट करावयास नको तेच गुन्हेगारीकडे अधिक लवकर वळतात. अमेरिकेतील एका तुरुंगात एका आकडेशास्त्रज्ञाने चौकशी करून असा निष्कर्ष काढला की, ‘ निरुद्योगामुळे शेकडा नव्वद कैदी गुन्हेगार बनले होते. ’

एका बागेतील बाकावर सायंकाळी एक निरुद्योगी मनुष्य व कष्ट

करणारा मजूर बसला होता. निरुद्योगी मनुष्य बोलता बोलता म्हणाला, " काय करावे बुवा ! घरच्या माणसांना काही दोन वेळा जेवायला घालता येत नाही." मजूर म्हणाला, " मलाही घरच्या लोकांना फुकट जेवायला घालता येत नाही. मला त्याकरता दिवसभर कष्ट करावे लागतात."

झाडाचे रोप लहान असतानाच त्यास वाकडे वाढू दिले तर पुढे ते झाड सरळ कधीच होत नाही. आळशी मुलास वेळेवर धडे देऊन, प्रसंगी शिक्षा करून काम करावयास लावले नाही तर तो जन्मभर आळशीच राहतो. आळस तिळातिळाने वाढतो. सुरुवातीस तो कोळिष्टकासारखा वाटतो, पण पुढे त्याची पोलादी साखळी बनून ती माणसास जखडून टाकते. आळशी माणसाची प्रगती मंद असते व दारिद्र्य त्यास गाठते. आळशी राहणे म्हणजे दारिद्र्याला आमंत्रणच देणे होय. काबाडकष्ट केल्यावर विश्रान्ती घेणे वेगळे व जन्मभर विश्रान्ती घेणे वेगळे.

तरुण माणसा, जागा हो ! तू काही श्रम केले नाहीस, इकडची काडी तिकडे केली नाहीस तर तुला पोसण्याची जिम्मेदारी कोण घेईल ? आईबाप जिवंत असेपर्यंत कदाचित त्यांच्या श्रमावर तू निर्लज्जपणे जगशील पण नंतर तुला कोण जेवू घालील ? व कोणी तुला कशाकरिता जेवू घालावे ? जगात सगळीकडे प्रत्येकजण कामात गुंतलेला असतो. नदीचे पाणी एकाच ठिकाणी स्थिर राहत नाही. चंद्रसूर्यसुद्धा रात्रंदिवस आकाशातील आपला मार्ग आक्रमीत असतात. वारा वाहत असतो. गवत वाढत असते. ' न्हावी उठे व खुंट फुटे ' ही म्हण सर्वांस माहीतच आहे. मेंढीचे केस रोज वाढतात म्हणूनच आपणास लोकर मिळते. मग मानवानेच आळशी का राहावे ?

इंग्लंडमध्ये ४०० वर्षांपूर्वीच भीक मागणे हा गुन्हा ठरविण्यात आला. पहिल्या खेपेस फटके मारीत, दुसऱ्या खेपेस त्याच्या कानावरचा

अर्ध कापीत, तिसऱ्या खेपेस तुरुंग दाखवीत. व जर तो फिरून निरुद्योगी राहून भीक मागत भटके जीवन जगू लागला तर त्यास देहान्ताची शिक्षा देत. प्राचीन अथेन्स नगरातही निरुद्योगी माणूस शिक्षेस पात्र असे.

एका तरुण जर्मन सरदाराची एक गोष्ट सांगतात. त्याचा जमीन-जुमला विपुल होता. तो कॉलेजातील शिक्षण संपल्यावर युरोपभर दौरा करण्यास निघाला. वर्ष-सहा महिने प्रवास करून तो आपल्या जहागिरीच्या गावी परत आला. पण त्यास उद्योग नव्हता. आळसात राहून तो कंटाळला. त्याला कशातही गोडी वाटेना. तो जीवनास विटला, व आत्महत्येचा विचार करू लागला. त्याचा एक कारखानदार मित्र होता. त्याच्याजवळ त्याने आपला आत्महत्येचा विचार प्रकट केला. तो कारखानदार शहाणा होता. त्याला आत्महत्येपासून परावृत्त करण्याचा त्याने प्रयत्नही केला नाही. तो सरदारास म्हणाला, "उद्या माझ्या कारखान्यात तू ये. आम्ही काही नवा माल बनविण्यास सुरुवात करणार आहोत. त्याची कृती बघण्यास तू ये." सरदाराने ते कबूल केले. तो दुसऱ्या दिवशी कारखान्यात गेला. सगळीकडे लोक काम करीत होते; मालकाच्या इशाऱ्याबरोबर कामगारांनी सरदारास घेरले. त्याचा उंची कोट त्यांनी काढून टाकला व त्यास सक्तीने कामास जुंपले. घण मारून, ओझी उचलून, कानस मारून तो थकून गेला. इतके श्रम त्याने जन्मात कधी केले नव्हते. तो भुकेने व्याकुळ झाला होता. कामगारांनी भाकर काढली व सरदारास आपल्याबरोबर खाण्यास बसविले. सपाटून भूक लागल्यामुळे त्याने त्यांची जाडीभरडी भाकरही आवडीने खाल्ली. मधली सुट्टी त्यास गोड वाटली. भाकर खाल्ल्यावर एक मजूर त्यास म्हणाला, "सरदारसाहेब, मी पाच मुलांचा बाप आहे. गेल्या वर्षी माझी तीन मुले एकाएकी साथीत मेली. मी दुःखाने वेडा झालो. आपणही

आत्महत्या करावी असे विचार मनात आले. पण आपण मेलो तर धाकटी दोन मुले व बायको कशी जगेल हा विचार मनात येताच आत्महत्येचा हा विचार निघून गेला. त्यांच्याकरिता जगलेच पाहिजे, कष्ट केलेच पाहिजेत. हे कष्ट करताना मी माझे दु:ख विसरून जातो. साहेब, ईश्वराने जीवन जगण्यासाठी दिले आहे. मरण्याचा विचार नामर्द करतो, तर मर्द जिवंत राहून कर्तबगारी करून दाखविण्याची ईर्ष्या बाळगतो.'' सरदाराचे डोळे उघडले. त्याने आपल्या मित्राचे आभार मानले. त्याने आत्महत्येचा विचार सोडून दिला. तो उद्योगी बनला.

समाजातील तथाकथित वरिष्ठ वर्गात अशी निरुद्योगी माणसे फार सापडतात. त्यातील स्त्री-पुरुषांना उद्योग नसतो. त्यांचा वेळ जात नाही. मग वेळ जाण्याकरिता व करमणुकीकरिता व्यसनास सुरुवात होते व अधोगतीचा पाया घातला जातो.

एक लक्षाधीश परगावी गेला. त्याच्या पत्नीने त्यास पत्र लिहिले, "प्रिय पतिराज, वेळ घालवायचे दुसरे साधन नसल्यामुळे तुम्हांस हे पत्र लिहावयास घेतले आहे पण काय लिहावे ते आता सुचत नसल्यामुळे आता ते संपविते.''

आपली,

× × ×

मोत्याची माळ तुटली की, तुटलेल्या दोन्ही टोकांतून मोती ओघळून खाली पडू लागतात. एका बाजूने पडणारे मोती धरावयास जावे तर दुसऱ्या बाजूचे ओघळतात. ईश्वराने मोतीमोलाचे दिवस आपणास दिले आहेत. पण आपला आळस ही काळाची माळ तोडतो व त्यातून दिवस, आठवडे, महिने, वर्षे ओघळून पडून नष्ट होतात.

तुमचे भवितव्य तुमच्या लौकिकावर अवलंबून असते. जर तरुण-

पणीच तुम्ही आळशी, स्वच्छंदी, लहरी आहा असा तुमचा लौकिक झाला तर तुमच्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही, तुम्हांला कोणी काम देणार नाही. आळशाच्या मदतीला कोणी येत नाही; कारण त्याला मदत करून काही उपयोग होणार नाही हे लोकांस माहीत असते. टिवल्या-बावल्या करण्याची सवय ही आळसाची बहीणच होय.

आळस हा चोरासारखा असतो. तो वेळेची, समयाची चोरी करतो. आळसात घालवलेल्या मिनिटांची, तासांची, दिवसांची बेरीज केली तर कित्येक वर्षे भरतील. हाच वेळ उद्योगात घालविला, वाचनात घालविला तर तुमचा किती फायदा होईल याचा विचार करा. जर तुम्ही रोज अर्धा तास आळसात घालवीत असाल तर त्या वेळात तुमचे वाचन किती होईल ? अर्ध्या तासात पाच पाने वाचून होतात. महिन्यात १५० पाने, वर्षात १८०० पाने, व दहा वर्षांत १८००० पाने वाचून होतील ! व तुमच्या ज्ञानात, विद्वत्तेत किती भर पडेल याचा विचार करा.

जर एखादा माणूस कसा आहे याची माहिती पाहिजे असेल तर तो आपला मोकळा वेळ, फुरसतीचा वेळ कसा घालवितो याची माहिती मिळवा म्हणजे त्याच्या स्वभावाचे, चारित्र्याचे ज्ञान तुम्हांस आपोआप होईल.

मनाला नेहमी काही तरी उद्योगात गुंतवून ठेवले पाहिजे. जर तसे केले नाही तर तेथे दुष्ट विचारांचे चक्र सुरू होते. त्याचे मन विकृत बनते. तो स्वतःचे दुःख उगाळीत बसतो. भरपूर कष्ट करा म्हणजे निसर्ग तुम्हांस भरपूर मोबदला देईल. सायकलचे पेडल तुम्ही मारत राहता तोपर्यंत ती चालते, पण ती चालण्याची बंद झाली की खाली पडते. म्हणून कोणताही क्षण वाया घालवू नका. तो कारणीं लावा.

# छोट्या गोष्टींतील मोठी शक्ती

## १३

छोट्या, लहान गोष्टींकडे, घटनांकडे साधारण मनुष्य उपेक्षेने पाहतो. क्षुल्लक गोष्टींकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती सर्वत्र आढळते. पण अनेक वेळा छोट्या, क्षुल्लक, लहान गोष्टींतूनच महान घटना निर्माण होतात. A thousand forests are hidden in a tiny acorn, असे इंग्रजीत सुभाषित आहे. शान्ताराम आठवले यांनी हेच तत्त्व निराळ्या शब्दांत ' तुकाराम ' बोलपटातील ' एका बीजापोटी ' या अभंगात व्यक्त केले आहे. ' एका बीजापोटी, तरु कोटी कोटी जन्म घेती, सुमने फळे ' अशी त्या अभंगात काव्यपंक्ती आहे. पुण्यातील बियांचे प्रसिद्ध व्यापारी श्री. पोचा यांची बाग लहान आहे. पण त्या बागेतील बियाण्यापासून हजारो बंगल्यांतील बगीचे फुलत आहेत. नदीचे मूळ लहान असते, पण त्याचाच पुढे महानद बनतो. ' थेंबे थेंबे तळे साचे ' ही मराठीतील म्हण सर्वांच्या परिचयाची आहे. आल्प्स पर्वतावर चढताना मार्गदर्शक वाटाड्या बरोबरच्या लोकांना काही भागातून जाताना एकही शब्द न बोलण्याची ताकीद देतो कारण मानवी आवाजाच्या कंपानेही अनेक वेळा उभ्या उतारावरील बर्फ-कण घसरू लागून त्यातून झंझावाती तुफानासारखा बर्फाचा प्रचंड संग्रह प्रतिक्षणी वाढत वाटेत येणाऱ्या सर्वांना चिरडून टाकतो.

कॉनन डॉइलने अमर केलेला डिटेक्टिव्ह शेरलॉक होम्स हा छोट्या गोष्टीवरून गुन्हेगार शोधून काढीत असे. आपल्या सह्याद्री पर्वतावर

पाऊस पडतो. डोंगरमाथ्याच्या पश्चिम ढाळावर पडलेले पाणी झटकन खाली ओघळून अरुंद कोकणपट्टीतील नद्यांतून वाहून अरबी समुद्रास मिळते. पण काही फूट अंतरावर पूर्व ढाळावर पडलेले पाणी देशावरच्या पठारावरून छोट्या ओढ्यांतून छोट्या नदीत व छोट्या नदीतून कृष्णा किंवा गोदावरीच्या पाण्यात मिसळून शेकडो मैल अंतर तोडून वाटेतील हजारो एकर जमीन सुजलां सुफलां करून बंगालच्या उपसागरात जाऊन मिसळते.

किशोरावस्थेत एका मुलाने एक पैसा चोरला. तो त्यास पचला. त्यास चोरीची सवय लागली. पैशावरून तो वडिलांच्या खिशातील २–४ आणे चोरू लागला. तेही पचल्यावर तो प्रथम घरातूनच १–२ रुपये चोरू लागला. मग मित्रांचे पैसे चोरू लागला. पुढे तो खिसेकापू बनला ! इतर चोरांची संगत लागल्यामुळे तो धंदेवाईक चोर व चोराचा दरोडे-खोर बनला. एका दरोड्यात घरमालकाने प्रतिकार करताच त्यास त्याने ठार मारले. पुढे तो सापडला. गुन्हा सिद्ध झाला व शेवटी तो फासावर लटकला ! एक पैसा त्यास असा प्राणघातक ठरला !

इंग्लंडमध्ये आपल्याकडील रातकिड्यांप्रमाणे क्रिकेट नावाचा कीटक असतो. एकदा एका जहाजावरून एक पलटण दूरदेशी जात होती. जहाजावर चढलेल्या सैनिकांपैकी एकाने गमतीने असा एक कीटक आपल्या बरोबर आणला होता. एके दिवशी समुद्रावर भयंकर वादळ झाले आकाश ढगांनी व्याप्त झाले. रात्र पडली, दिशा दिसेनात, मुसळधार पाऊस पडत होता. सुकाणूवाल्याच्या चुकीमुळे अंधारातून जहाज खडकाळ किनाऱ्याच्या रोखाने चालले होते. ते खडकावर आपटून त्याचे तुकडे झाले असते, व बहुसंख्य उतारू बुडून मेले असते. पण किनारा जवळ येताच आतापर्यंत काहीएक आवाज न करणारा तो कीटक त्यांच्या निसर्गदत्त तीक्ष्ण घ्राणेन्द्रियास जमिनीचा वास येताच ‘ किर्र,

किर्र ' असा कर्कश आवाज करू लागला. त्यामुळे धोका लक्षात येऊन जहाज वेळेवरच वळविण्यात आले व मोठा अपघात टळला.

१५०० वर्षांपूर्वी डेन टोळ्यांनी ( डेन्मार्कमधील लोक ) स्कॉटलंडवर स्वारी केली. डेन टोळीवाले रात्री किनाऱ्यावर उतरले. स्कॉटिश सेना निद्रिस्त होती. गस्तवाले तेवढे जागे होते. येवढ्यात एका डेन टोळी-वाल्याच्या पायात थिसल झाडाचा काटा घुसला. त्याच्या दुःखाने तो कळवळून त्याच्या तोंडून डॅनिश भाषेत काही उद्गार बाहेर पडला. तो गस्तवाल्याने ऐकला. त्याने तत्काळ स्कॉटिश सेनेस जागृत केले. स्कॉटिश सैन्याने किनाऱ्यावर उतरणाऱ्या शत्रूवर हल्ला करून त्यास पिटाळून लावले.

पिसा येथील चर्चमधील दिवाबत्ती करणाऱ्या नोकराने साखळीस बांधून लोंबणाऱ्या दिव्याची वात नेहमीप्रमाणे लांब काठीस बांधलेल्या मशालीने पेटविली. तसे करताना काठीचा धक्का लोंबणाऱ्या दिव्यास लागून दिवा मागे-पुढे झोके घेऊ लागला. किती क्षुल्लक गोष्ट होती ही ! रोज दिवा पेटवताना तो असाच झोके घेई पण त्या दिवशी चर्चमध्ये आलेल्या छोट्या गॅलिलियोने तो दिवा संथपणे मागे पुढे झोके घेताना पाहताच त्या नियमितपणे मागे-पुढे होणाऱ्या दिव्यावरून त्यास घड्याळाच्या लंबकाची कल्पना सुचली, व घड्याळाचा जन्म झाला.

प्रचंड झुलत्या पुलाची कल्पना कॅप्टन ब्राऊनला साध्या कोळ्याचे जाळे पाहून सुचली. एका चष्मेवाल्याची मुले चष्म्याच्या काचांशी खेळत होती. खेळता खेळता त्यांनी दोन तीन काचा एकावर एक ठेवून त्यांतून पाहताच त्यांना दूरच्या वस्तू जवळ व मोठ्या आणि स्पष्ट दिसू लागल्या. ही गोष्ट त्या मुलांनी आपल्या वडिलांस सांगितली; त्यावरूनच दुर्बिणीचा शोध लागला.

दिसावयास क्षुद्र दिसणारा एखादा मानसिक कमकुवतपणा, चटकन

येणारा राग, निर्णयाचा अभाव, विचार न करता केलेली एखादी क्षुल्लक गोष्ट, याचा परिणाम अनेक वेळा भयंकर होत असतो. चोवीस तास म्हणजे एक दिवस होतो. एक दिवस आळसात गेला तर काय बिघडेल? असा विचार अनेक वेळा मनात येतो. पण दिवस हा जीवनाचा प्रतिनिधी आहे. दिवसांचेच जीवन बनते. १ पैसा ! १ रुपयात किती क्षुल्लक रक्कम वाटते ही ! पण असे अनेक पैसे ! अनेक रुपये एकत्र केले म्हणजे त्यांची बेरीज लाखांनी होते. तीच गोष्ट दिवसांची, काळाची आहे. जीवनात सुख कशाने मिळते ? बोललेला गोड शब्द, ऐकलेली तान, वाऱ्याबरोबर आलेला मंद सुगंध, प्रेमाचे गोड हास्य, चार बोटांची सुहृदाची आलेली चिठ्ठी—किती छोट्या गोष्टी आहेत ह्या ! पण याच छोट्या गोष्टी आपले जीवन सुखी करतात.

नेपोलियन असामान्य सेनानी होता. पण त्याच्या यशाचे रहस्य त्याच्या चिकित्सक बुद्धीत व विशेषतः तो अगदी बारीक तपशिलाकडे जे लक्ष देत असे त्यात आढळते. त्याने आपल्या सेनापतींना बारीकसारीक गोष्टींबद्दल दिलेल्या सूचना पाहून आश्चर्य वाटते. कूच केव्हा करावे, किती मैलांवर मुक्काम करावा, कोणत्या दिवशी कोणत्या गावी किती वाजता पोचावे, किती मैल चालल्यावर सैनिकांस नवे बूट देण्यात यावेत याची तपशीलवार माहिती तो देत असे. त्याची प्रत्येक मोहीम, प्रत्येक हालचाल योजनाबद्ध असे. म्हणूनच त्यास यश मिळत असे. शिवाजी महाराजही असेच बारीकसारीक गोष्टींकडे लक्ष देत. त्यांनी सैन्यास दिलेल्या आदेशात त्यांचे तपशिलाकडे किती लक्ष होते ते दिसून येते. वेलिंग्टनही तपशिलाकडे असेच लक्ष देई. अमेरिकन काँग्रेसने पास केलेल्या एका विधेयकात चुकीच्या जागी स्वल्पविराम दिला गेल्याने सरकारचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. आई वडिलांच्या लग्नाचे सर्टिफिकेट हरवल्यामुळे ह्यू मिलर नावाच्या माणसाला ऑक्सफर्डच्या

सरदारकीवर आपला हक्क शाबित करता आला नाही. तुम्ही मित्राशी बोलताना एखादाच वायफळ शब्द बोलून जाता; पण तो शब्द तुमची मैत्री तोडतो ! डार्विनचा उत्क्रान्तिवादाचा सिद्धान्त सर्वांस ठाऊक आहे. पण त्याने वर्षानुवर्षे वनस्पति-प्राण्यांविषयी सकृद्दर्शनी क्षुल्लक वाटणाऱ्या फरकांची व बदलांची माहिती गोळा केल्यामुळेच त्याला आपला सिद्धान्त सिद्ध करता आला. सर वॉल्टर रॅलेने अमेरिकेतून परत येताना एकदोन बटाटे गम्मत म्हणून इंग्लंडला परत आणले. पण त्या दोन बटाट्यांतून युरोपमध्ये बटाट्यांचा प्रसार झाला व आयर्लंडमध्ये लाखो लोकांचे ते प्रमुख अन्न बनले. खिळा किती क्षुल्लक वाटतो. एका सैनिकाच्या घोड्याच्या नालाचा एक खिळा पडला. तिकडे त्याने दुर्लक्ष केले. पण एक खिळा गेल्यामुळे दुसरे खिळे सैल होऊन पडून गेले. त्यामुळे नाल पडला. घोडा लंगडू लागला व लढाईतून माघार घेताना घोडा जलद पळू न शकल्यामुळे शत्रुसैनिकांनी त्यास गाठून ठार केले ! पाहिलात क्षुल्लक गोष्टीचा परिणाम ! आपणास शब्दांची किंमत वाटत नाही, पण थोडक्या शब्दांत शाईच्या ऐका थेंबाने साकार केलेला विचार जगात क्रान्तिकारक बदल घडवून आणू शकतो. इंग्लंडमधील लोकांना ऑक्सफर्ड व केंब्रिज विश्वविद्यालयाबद्दल जसा सार्थ अभिमान वाटतो तसाच अमेरिकन लोकांना येल व हार्वर्ड विद्यापीठांबद्दल वाटतो. १६२० सालापासून ब्रिटिशांनी उत्तर अमेरिकेत वसाहती करण्यास सुरुवात केली. पण अनेक दशके उलटून गेली, वस्ती वाढली तरी उच्च शिक्षणाची सोय अमेरिकेत नव्हती. १७०० साली ब्रॅनफर्ड नावाच्या खेड्यात दहा धर्मगुरू जमले. त्यांनी कॉलेज काढण्याचे ठरविले पण पुस्तके कोठून आणायची ? तेव्हा एक धर्मगुरू म्हणाला, " माझ्याजवळ जी पुस्तके आहेत ती सर्व मी या कॉलेजला देणगी म्हणून देतो. " एकाचे उदाहरण पाहून इतरही नऊ धर्मगुरूंनी आपापल्या जवळची पुस्तके

कॉलेजला दिली. या क्षुल्लक वाटणाऱ्या मूठभर पुस्तकांच्या देणगीमुळे येलचे कॉलेज सुरू झाले व त्यातून भव्य व अमेरिकेला भूषणभूत ठरलेले येल विद्यापीठ जन्मास आले.

मोठी माणसे क्षुल्लक गोष्टीकडेही दुर्लक्ष करीत नाहीत. क्षुल्लक वाटणाऱ्या घटनांतून निरीक्षणशक्ती असलेली चिकित्सक बुद्धीची माणसे क्रान्तिकारक शोध लावतात. किटलीच्या नळातून जोराने बाहेर पडणारी वाफ पाहून जेम्स वॅटला वाष्प एंजिनाची कल्पना सुचली. एडिसन एकदा टेलिफोनमधून जोराने बोलत होता. टेलिफोनच्या तोंडा-मागे असलेली एक टाचणी शब्दलहरींच्या कंपाने हालून ती एडिसनच्या बोटास टोचली त्यावरून त्यास ग्रामोफोनची कल्पना सुचली. सूक्ष्म अणूमध्ये प्रचंड शक्ती सामावलेली असते. काही रोगांचे जंतू सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिल्याशिवाय दिसतही नाहीत. पण हे सूक्ष्म जंतू लाखो लोकांच्या मृत्यूस कारणीभूत होतात. भात सडण्याच्या यंत्राचा शोध अचानकपणे लागला. अमेरिकन यादवी युद्धांत एका सैनिकाने एक पक्षी पाहिला. तो भाताचा दाणा तोंडात धरून चोच मागेपुढे करून फोलकट काढून टाकून आतला दाणा खाई. त्याचे कुतूहल जागृत झाले. त्या सैनिकाने बंदुकीने तो पक्षी मारला व त्याच्या चोचीच्या ठेवणीचा अभ्यास करून भातसडीचे यंत्र बनविले.

आपले नेत्र कॅमेऱ्यासारखे आहेत. कॅमेऱ्यातून मागील प्लेट किंवा फिल्मवर पुढील छिद्रातून दिसणारे दृश्य चित्रित केले जाते. आपल्या डोळ्यांना शेकडो-हजारो गोष्टी दिसतात. त्या मेंदूत, स्मृतीत संचित केल्या जातात, व त्यातूनच जगास थक्क करणारे शोध व मानवजातीला हेलावून टाकणारे विचार जन्मास येत असतात. म्हणून कोणत्याही गोष्टीची, ती क्षुल्लक आहे म्हणून उपेक्षा करू नका.

卐 卐 卐

# चारित्र्य ( Character )

१४

इंग्रजीतील Character या शब्दाला यथार्थ मराठी शब्द सापडत नाही. त्यातल्या त्यात 'चारित्र्य' हा शब्द त्या शब्दातील बहुतेक अर्थ व्यक्त करतो असे मला वाटते. म्हणून या ठिकाणी चारित्र्य हा शब्द इंग्रजीतील कॅरेक्टर, शब्दाऐवजी वापरला आहे. सॅम्युएल स्माइल्सचा 'कॅरेक्टर' हा ग्रंथ मागल्या पिढीतील बहुतेक सुशिक्षित लोकांनी वाचला असेलच. त्या ग्रंथाचा माझ्या मनावर झालेला परिणाम अजूनही कायम आहे.

संस्कृतमध्ये 'शीलं परं भूषणम्' असे वचन आहे. पण या शील शब्दात कॅरेक्टर ऊर्फ चारित्र्याचा संपूर्ण अर्थ येत नाही. इंग्रजीत, 'The Crown and glory of life is Character' असे सुभाषित आहे. चारित्र्य हेच व्यक्तीचे भूषण व वैभव आहे.

'चारित्र्य' या एका शब्दात अनेक गुणांचा समुच्चय अभिप्रेत आहे. भाषा, आचारविचार यांची शुद्धता तर त्यात आहेच पण त्या-शिवाय शौर्य, धैर्य, संयम, सहनशीलता, सहकार्य, उदारता, तत्त्वनिष्ठा, नेतृत्व, ध्येयवाद, सत्यप्रेम, वचननिष्ठा, न्यायप्रियता आदी अनेक गुण त्यात सामावलेले आहेत.

धनवान मनुष्याचे लोक कौतुक करतात, पण चारित्र्यवान माणसाचे लोक अनुकरण करतात. A man of wealth is admired but a man of character is followed. व्यक्तीच्या चारित्र्याचा ठसा त्याच्या

प्रत्येक कृतीत दिसून येतो. जगातील बहुतेक देशांतील संरक्षक दलांच्या अधिकाऱ्यांची निवड करताना उमेदवारांच्या चारित्र्याकडे लक्ष दिले जाते, व त्यांच्या निवडीकरिता ज्या कसोट्या ठेवण्यात येतात त्या त्यांचे चारित्र्य कसे असेल ते शोधून काढण्याकरिता असतात. चारित्र्याशिवाय नेतृत्व टिकू शकत नाही. कारण नेतृत्वावर जनतेचा विश्वास असावा लागतो, व जनता चारित्र्यवान माणसावरच निष्ठा ठेवते.

अठराव्या शतकाच्या अखेरीस इंग्लिश राजकारण अस्थिर होते. पंतप्रधानकीच्या जागेकरता फॉक्स व धाकटा पिट हे दोन उमेद्वार होते फॉक्स हा उत्कृष्ट वक्ता होता, विद्वान होता, कर्तबगार होता. पण तो चंचल असून त्याचे चारित्र्य हीन दर्जाचे होते. उलट पिट हा तरुण होता, विद्वत्तेने कमी होता. फॉक्सपुढे वादविवादात तो फिका पडे. पण तो चारित्र्यसंपन्न होता. देशाचे भवितव्य कोणाच्या हातीं जाते याकडे सर्वांचे लक्ष होते. पण शेवटी चारित्र्याचा विद्वत्तेवर, कर्तबगारीवर विजय झाला. पिटलाच त्याच्या पक्षाने नेता निवडले. उधळ्या, व्यसनी, जुगाऱ्याच्या हाती देशाची सूत्रे देणे धोक्याचे वाटून पक्षाने धाकट्या पिटची निवड केली.

शिवाजीच्या काळात शिवाजीसारखे अनेक शूर लोक होते. त्याचे समकालीन राजे शिवाजीपेक्षाही अनेकपट श्रीमंत होते. सर्व परिस्थिती प्रतिकूल होती. स्वबांधवच शिवाजीच्या विरुद्ध होते. शिवाजीला स्वराज्यस्थापनेच्या कामात मदत करण्याऐवजी शिवाजीविरुद्ध मोगल व विजापूरच्या बादशहांकडून लढण्यातच त्यांना धन्यता वाटत होती. द्रव्य नाही, मनुष्यबळ तोकडे, अशी शिवाजीची स्थिती होती. पण बुद्धिमत्ता, सेनापतित्व, संघटनकुशलता, आकर्षक व्यक्तिमत्त्व, अमोघ वाणी आणि आत्मविश्वास या गुणांच्या शिदोरीवर त्याने स्वराज्याची मुहूर्तमेढ

रोविली, पण शिवाजीचे खरे बळ त्याच्या चारित्र्यात होते. तरुणपणी कल्याणच्या सुभेदाराची रूपवती सून हाती पडल्यावर तिला बहीण मानून चोळी-बांगडी देऊन तिला तिच्या पतीकडे सन्मानाने परत पाठवणारा शिवाजी हाच खरा शिवाजी होता. त्यातच त्याचे चारित्र्य दिसून येते.

नारायणराव पेशव्यांच्या वधानंतर राघोबाने पेशवापद बळकावले. त्याचे पेशव्याच्या वधात अंग होते हे माहीत असूनही इतर सरदार व मुत्सद्दी त्याच्यापुढे मान तुकवीत होते. पण भर दरबारात राघोबा पेशव्यास "तुम्ही पेशवे असलात तरी गुन्हेगार आहात; व या गुन्हेगारीला एकच प्रायश्चित्त व ते म्हणजे—देहान्त शासन होय!" असे ठणकावून सांगणारे रामशास्त्री प्रभुणे यांच्यातच खरे चारित्र्य होते!

मुंबईस अयशस्वी ठरलेल्या अखिल भारतीय सरकारी नोकर वर्गाच्या संपाच्या वेळी खवळलेल्या जनसमुदायाने एका छोट्या पोलिस तुकडीस घेरले पोलिसांवर लोक दगडफेक करीत होते. त्यांचे जीवन धोक्यात होते अशा वेळी त्या बाजूने जाणाऱ्या साथी एस्. एम्. जोशी यांनी हे पाहताच ते पुढे घुसले. पोलिस तुकडीस पाठीशी घालून ते खवळलेल्या जनसमुदायास म्हणाले, "तुमचे हे करणे चूक आहे. हा अत्याचार आहे. माझ्या मृत देहावरूनच तुम्हांस या असहाय पोलिसांवर हल्ला करता येईल!" यासच म्हणतात चारित्र्य. जनसंमर्द मागे हटला. चारित्र्याच्या तेजापुढे पाशवी वृत्ती नष्ट झाल्या.

व्यायाम करून ढासळलेली प्रकृती सुधारता येते. गेलेली संपत्ती उद्योगाने परत मिळवता येते. पडलेले घर फिरून उभारता येते. पण एकदा चारित्र्य भंगले की, ते कशानेही परत सांधता येत नाही. हजारो वर्षे उग्र तप करून मिळविलेले पुण्य ऋषी एका क्षणात मोहाला बळी पडून

घालवून बसलेले आपणास माहीत आहे. गेल्या शतकाच्या उत्तरार्धात पार्नेल या आयरिश देशभक्ताने उभ्या देशास आपल्या कर्तृत्वाने, वक्तृत्वाने भारावून टाकले. ब्रिटिश पार्लमेंटात १०० आयरिश सदस्यांचा गट त्यांच्या मागे उभा होता. इंग्लंडमधील उदार व हुजूर पक्षांचे संख्याबल इतके तुल्य असे की, ज्याच्या बाजूस पार्नेल त्याचे मंत्रिमंडळ–अशी स्थिती होती. तो मंत्रिमंडळे बनवीत व उलथून टाकीत होता. पण–पार्नेलचे चारित्र्य स्वच्छ नव्हते. त्याच्या खाजगी भानगडी जाहीर होताच त्याचे नेतृत्व ढासळून पडले ! लोकांचा त्याच्यावरील विश्वास उडाला. आयर्लंड गेल्या शतकाच्या अखेरीसच स्वतंत्र झाले असते; पण पार्नेलच्या कलंकित चारित्र्यामुळे त्याच्या देशास आणखी २५–३० वर्षे पारतंत्र्याच्या वनवासात काढावी लागली.

गेल्या शतकातील अमेरिकेमधील सर्वांत श्रेष्ठ विभूती म्हणजे अब्राहम लिंकन होय. लिंकन याचा जन्म गरीब कुळात झाला. त्याचे वडील सुतार होते. काम मिळेल तेथे सारखी भटकंती त्यांना करावी लागे. त्यामुळे अब्राहमला लौकिकी शिक्षण मिळालेच नाही. निरनिराळ्या शाळांत मिळून जेमतेम एक वर्ष शालेय शिक्षण त्यास मिळाले. पण त्यास वाचनाची विलक्षण गोडी लागली. आसपासच्या दहावीस मैलांच्या परिसरात एखाद्या माणसाजवळ पुस्तक आहे असे त्यास कळले की छोटा अब्राहम दहावीस मैल अंतर पायी तुडवून पुस्तक वाचावयास आणी व वाचून झाल्यावर तेवढीच पायपीट करून ते परत करी. एकदा त्याने आणलेले पुस्तक टेबलावर ठेवले होते. घर चंद्रमौळी असल्याने जोराचा पाऊस आल्यावर घरातून गळालेल्या पावसात ते भिजून खराब झाले. तेव्हा अब्राहमने त्या माणसाच्या शेतावर पुस्तकाच्या किम्मतीयेवढे मजुरीचे काम फुकट केले व त्याची भरपाई करून दिली. पुढे घरीच वकिलीचा अभ्यास करून लिंकन वकील बनला. पण

लिंकन सत्यनिष्ठ होता. त्याने खोट्या पक्षाचे वकीलपत्र कधीही घेतले नाही. कुठलाही दावा घेतला की, त्यातील एक बाजू खोटीच असते; पण वकील खोट्या पक्षाची बाजू घेऊन खोट्याचे खरे करण्याचा खटाटोप करीत असतात. वकिलाचे खरे काम न्यायदेवतेस मदत करण्याचे असते, फसविण्याचे नसते. पण असे करणारे वकील जगात किती आढळतील? पैशाचा, यशाचा मोह सुटत नाही. पण लिंकनने कधीही खोट्या पक्षाची बाजू घेतली नाही. इतर वकिलांच्या दृष्टीने तो बावळट, वेडा, अव्यवहारी होता. पण लिंकनने आपल्या सदसद्विवेक बुद्धीशी कधी प्रतारणा केली नाही. हेच चारित्र्य होय. त्याचा चरितार्थ चालणे कठीण पडे, पण लोकांचा त्याच्या चारित्र्यावर, प्रामाणिकपणावर अपूर्व विश्वास बसला. तो अध्यक्षपदाकरता उभा राहिला त्या वेळी त्याच्या जवळ व्यवस्थित कपडेही नव्हते. त्याचा, त्याच्या गरीबीचा, सरळपणाचा प्रतिपक्षी उपहास करीत होते. पण ज्या वेळी अध्यक्षपदाकरता मते देण्याची पाळी आली तेव्हा अमेरिकन जनतेने या दरिद्री पण निष्ठावंत चारित्र्यसंपन्न व्यक्तीसच मते दिली.

तो अध्यक्षपदी येताच अमेरिकेत गुलामगिरीच्या प्रश्नावरून यादवी युद्ध सुरू झाले. सुरुवातीस सरकारपक्षाचा पराभव झाला. अपयश येणार असे वाटू लागले, पण लिंकन कधीही विचलित, गलितधैर्य झाला नाही. काही झाले तरी देशाचे विभाजन होऊ देणार नाही, गुलामगिरीचा डाग राहू देणार नाही असा निश्चय त्याने केला. त्याचे चारित्र्य हाच त्याचा आधार व शक्ती होती. त्याच्या धीरगंभीर निश्चयी चेहऱ्याकडे पाहून लोकांचा आत्मविश्वास वाढे. शेवटी त्याच्या सरकारचा जय झाला. गुलामगिरी नष्ट झाली. देशाची एकता कायम राहिली. चारित्र्याने सर्वांवर मात केली.

आपल्याकडे अनेक संत होऊन गेले. त्यांना तत्कालीन राजांनी द्रव्य, जमिनी, गावे दिली. त्याचा बहुतेकांनी स्वीकारही केला. पण शिवाजीने वारंवार विनवूनही नकार देणारे एक तुकाराम महाराजच होऊन गेले. त्यांना दुपारची भ्रान्त होती. पैसा गेला, धंदा बसला, कर्ज झाले. अशा वेळीही शिवाजीने पाठविलेल्या धनराशी त्यांनी साभार परत केल्या. केवढी निरिच्छा ! केवढा संयम ! केवढा दृढ निश्चय हा ! यातच तुकोबांचे चारित्र्य होते तीनशे वर्षे होऊन गेली तरी तुकारामाचे अभंग खरोखरच अभंग राहिले आहेत.

वरिष्ठ सरकारी नोकरीतील अधिकाऱ्यांना पैसा खाण्याची संधी अनेक वेळा मिळते. काहीजण आपल्या पदाचा उपयोग स्वतःचा वा नातेवाइकांचा फायदा करून घेण्याकरता करतात हे खरे, पण काही उच्चपदस्थ अधिकारीही निःस्पृहतेने काम करताना आढळतात. भारत सरकारचे एक उच्च पदाधिकारी माझ्या चांगल्या माहितीचे आहेत. कोट्यवधी रुपयांची उलाढाल त्यांच्या तर्फे होत असे. एकदा एक वडे व्यापारी त्यांच्याकडे आले. कोणत्याही अधिकाऱ्याला पैशाने विकत घेता येते अशी त्यांची अनुभवावर आधारलेली समजूत होती. पण या ठिकाणी नियमास अपवाद आहे ही गोष्ट ते विसरले. त्यांनी आपल्या बरोबर तीन हिरे आणले होते. त्यांचीच किंमत १५–२० हजार रुपये होती. त्याशिवाय त्यांनी त्यांना रोख २५ हजार रुपये देतो असे सांगून परवान्याची मागणी केली. व्यापाऱ्याचे हे धारिष्ट पाहून माझ्या मित्राच्या तळपायाची आग मस्तकास पोचली. त्यांनी आपल्या गरुड दृष्टीने त्या व्यापाऱ्याकडे पाहून म्हटले, " तो दरवाजा तुम्हांस दिसत आहे ना ? पांच सेकंदांच्या आत जर तुम्ही त्यातून बाहेर गेला नाहीत तर तुमच्या कमरेत लाथच बसेल. तुम्ही काय मला पैशाने विकत घेता

येण्यासारखी बाजारबसवी समजलात काय? गेट आऊट!" याला म्हणतात चारित्र्य. एखादा मनुष्य व्यसनी असला म्हणजे चारित्र्यहीन झाला असे समजणे चूक आहे. कोणी दारूबाज असेल, रेस खेळणारा असेल, म्हणून तो चारित्र्यहीन होत नाही. डिकन्सच्या टेल ऑफ टू सिटीजमधील सिडने कार्टन व्यसनाधीन होता. पण आणीबाणीचा प्रसंग येऊन, आपल्या जिवाचे मोल देऊन त्याच्यावर प्रेम न करणाऱ्या प्रेयसीला सुखी करण्याचा प्रसंग येताच त्याने तिच्या प्रियकराच्या जागी स्वत:वर गुन्ह्याची जबाबदारी घेऊन फासाला—प्रेमाला कवटाळले! याचे नाव चारित्र्य!

म्युनिसिपालिट्यांत अध्यक्षाच्या निवडणुकीच्या प्रसंगी काय प्रकार होतात हे सर्वांस माहीतच आहे. मागे पुणे म्युनिसिपालिटीत के. श्री. गोपाळराव महाजन हे १९२७ पासून सदस्य होते. त्यांची घरची गरीबी होती. १९०६—७ सालच्या स्वदेशीच्या चळवळीत त्यांनी शिक्षण सोडले. पुढे उपजीविकेकरिता शिंपीकामाचे दुकान उघडले. शरीरात लंगडेपणाचे वैगुण्य होते. पण गोपाळराव इंग्रजांतील Honest as the day या म्हणीप्रमाणे प्रामाणिक होते. भट-भिक्षुक, कारकून, मजूर, मोलकरणी त्यांना दर खेपेस निवडून आणीत. एक पैसा न खाता गरीबांचा कैवार घेऊन ते म्युनिसिपालिटीत भांडत. एकदा अध्यक्ष-पदाच्या निवडणुकीच्या वेळी एक श्रीमंत उमेदवार त्यांच्याकडे गेले. गोपाळराव राष्ट्रीय पक्षाचे अभिमानी होते. या श्रीमंत उमेदवारांनी गोपाळरावांना म्हटले, "गोपाळराव, तुमचे मत मला हवे आहे. तुमच्या पक्षाचा उमेदवारही उभा आहे. पण तुम्ही जर मला मत दिलेत तर मी तुम्हांस ३००० रु. देईन तुमच्या अडचणी दूर होतील. पुढेही मी तुम्हांस मदत करीन." हे शब्द ऐकताच सज्जन गोपाळराव भडकले. ते गरजले, "तुम्हांस काय वाटले? गरीबास विकत घेता

येते अशी तुमची समजूत दिसते ! पण हा गोपाळराव तुम्हांस विकत घेता येणार नाही. माझ्या पक्षाचा उमेदवार उभा असताना पैशाकरता मी पक्ष, निष्ठा आणि चारित्र्य सोडीन असे तुम्हांस वाटले तरी कसे ? झक मारला तुमचा पैसा ! तुमच्या पैशावर मी लघुशंका करतो. चालते व्हा येथून !" याला म्हणतात चारित्र्य !

# १५ जिद्द

जीवनात यशस्वी होण्याकरता ध्येयवाद, आशावाद व धैर्य लागते. पण केवळ येवढ्यावर भागत नाही. ध्येयवाद व आशावाद असूनही जर माणसात जिद्द वा हट्टाने काम तडीस नेण्याची पोटतिडीक नसेल तर त्यास आपले ध्येय गाठणे कठीण जाईल. ही जिद्दच माणसाला पुढे येण्यास, संकटावर मात करण्यास उपयोगी पडते. अनपेक्षित अडचणी आल्यामुळे जो गांगरून जात नाही, जो शान्तपणे धैर्याने परिस्थितीशी झुंजतो व वेळ पडल्यास मृत्यूलाही भीक घालीत नाही त्याचे जगात कौतुक होते. ज्या माणसात ही जिद्द असेल त्याच्याबद्दल लोकांस आदर वाटतो. जगात जिद्दच कर्तबगार माणसास पुढे आणते. क्रान्तिकाळात, राजकीय आन्दोलनात, तत्त्वप्रणालींच्या झगड्यात ज्याच्यात जिद्द असेल तोच टिकाव धरतो.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात अनेक बुद्धिमान मागे पडले, कारण त्यांच्यांत जिद्द नव्हती. एक शिक्षा झाली, एकदा हद्दपारी झाली, एकदा जनमत थोडे उलटे गेले की त्यांची हिम्मत खचून जाई, व राजकारणातून ते माघार घेत. मग कोणी प्रोफेसर झाले, लेखक झाले, वृत्तपत्रकार झाले तर कोणी अध्यात्मवादी बनले. पण ते राजकारणातून उठले. पण परक्या सत्तेशी नजरेला नजर भिडवून, डावाशी डाव लढवून, पडेल तो त्याग व देहदंड भोगण्याची ज्यांची तयारी होती तेच टिकले; तेच 'महात्मा' झाले, 'लोकमान्य' झाले, 'देशबंधू' बनले, 'देशगौरव'

व ‘ नेताजी ’ ठरले. १९०८ साली एखाद्या वनराजाप्रमाणे निर्भयतेने हायकोर्टाने दिलेल्या शिक्षेच्या वेळी “ याही न्यायालयापेक्षा वरिष्ठ असे ईश्वरी न्यायालय आहे. त्या न्यायालयाच्या दृष्टीने व माझ्या सदसद्विवेक बुद्धीस स्मरून मी दोषी आहे असे मला वाटत नाही. ” असे म्हणणारे टिळक जिद्दीने लढणारे नेते होते. कारावास झाला, दंड झाले, जप्त्या आल्या तरी टिळक डगमगले नाहीत. कैदेतून १९१४ साली सुटका होताच ‘ त्रस्स झाले राजकारण ’ असे न म्हणता त्यांनी उलट दुप्पट जोराने चळवळीस सुरुवात केली व स्वराज्याचा महामंत्र या देशास दिला. म्हणूनच ते लोकांच्या गळ्यातले ताईत बनले.

नेताजी सुभाष बोस यांनी आय्. सी. एस्. ची श्रृंखला तोडून एकदा राष्ट्रीय आन्दोलनात उडी घेतल्यावर त्यातून शेवटपर्यंत माघार घेतली नाही. त्यांना ब्रिटिशांनी अनेक वेळा तुरुंगात घातले. तुरुंगातील जीवनामुळे त्यांना क्षयाची भावना झाली. पण त्यांनी देशकार्य सोडले नाही. इंग्लंडची अडचण ती भारताची सुवर्णसंधी हे लोकमान्यांचे समीकरण फक्त नेताजींनाच कळले. १९३९ साली युरोपात महायुद्ध सुरू होताच, पोलिसांच्या डोळ्यांत धूळ फेकून वेषान्तर करून अफगाणिस्तान–रशियामार्गे ते जर्मनीत पोचले. तेथे त्यांनी स्थानिक भारतीयांची स्वातंत्र्यसेना उभारली.

जपानने अतिपूर्वेत युद्ध सुरू करताच जर्मन पाणबुडीतून ते जपानला येऊन पोचले व १९४३ साली त्यांनी सिंगापूरला आझाद फौज उभी करून व स्वतंत्र भारताचे तात्पुरते सरकार बनवून आसामच्या सीमेवर ब्रिटिशांशी दोन हात केले. रणाच्या जुगारात फासा उलटा पडला, व नेताजी विमान-अपघातात दिवंगत झाले ! केवढी जिद्द होती त्यांच्यात ! मोडेन, पण वाकणार नाही, मरेन पण हटणार नाही—–अशी त्यांची मनोवृत्ती होती ! या जिद्दीनेच भारताचे स्वातंत्र्य जवळ आणले.

चारित्र्यसंपन्न व जिद्दीची माणसे सामान्य जनांस डोंगरासारखी वाटतात. त्यांच्यापुढे क्षुद्र वृत्तीची माणसे माना टाकतात. त्यांच्या चारित्र्याने आणि जिद्दीने भोवतालची माणसे भारावून जातात. त्यांच्या आत्मविश्वासाने दुसऱ्यात आत्मविश्वास उत्पन्न होतो. गांधींना विरोध करणारी माणसे खुद्द कॉंग्रेसमध्ये कमी नव्हती. पण गांधींच्यापुढे ती गेली की, त्यांच्या चारित्र्याने, जिद्दीने ती भारावून जात, व त्या महात्म्यास विरोध करावयास गेलेली माणसे महात्माजींच्या कार्यक्रमास पाठिंबा देऊन परत येत.

डिझरेली जन्माने ज्यू होता. त्याचा राजकारणात उदय होऊ नये असे वाटणारे पार्लमेंटात पुष्कळ विरोधक होते. तो पहिले भाषण करण्यास उभा राहिला तेव्हा सभासदांनी उपरोधिक टाळ्या व हशाने त्याचे भाषण बंद पाडले. पण बसण्यापूर्वी तो म्हणाला, " आज तुम्ही मला खाली बसवीत आहात, हसत आहात, पण लक्षात ठेवा, एक दिवस असा येईल की त्या दिवशी तुम्ही माझे भाषण ऐकून घ्यालच घ्याल. " आणि खरोखरच एक दिवस असा आला की तो उपेक्षित ज्यू इंग्लंडचा पंतप्रधान बनला. त्याचे विरोधक त्याचे अनुयायी बनले. त्याने आपली जिद्द सोडली नाही. राजकारणात नाव कमावण्याची त्याची पोटतिडिक कायम राहिली म्हणूनच तो डिझरेलीचा अर्ल ऑफ बीकन्सफील्ड बनला.

विद्यावाचस्पती सदाशिवशास्त्री भिडे अंध होते. पण विद्या प्राप्त करून घेण्याची त्यांना जिद्द होती. दुसऱ्याकडून वाचून घेऊन त्यांनी शेकडो धर्मग्रंथ मुखोद्गत केले व शेवटी गीतेवरील एक अधिकारी व्यक्ती असा लौकिक त्यांनी मिळवला.

जिद्द ही चारित्र्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. जिद्दीमुळेच मनुष्य आपल्या ध्येयाची पकड घेतो, व ध्येय गाठीपर्यंत ती परिस्थिती अनुकूल असो वा प्रतिकूल असो, जिद्दीचा कप्तान वादळांना तोंड देत, लाटांशी

झुंजत, मृत्यूशीही सामना करून आपले खिळखिळे झालेले तारू इच्छित बंदरी घेऊन जातो. जिद्दीमुळे माणसात आत्मविश्वास उत्पन्न होतो तो दुसऱ्यावर सहजगत्या अधिकार गाजवितो. त्याची जबर जिद्द व आत्मविश्वास पाहून कमी जिद्दीची माणसे त्याचे आपोआप ऐकू लागतात. त्याचा वरिष्ठपणा, श्रेष्ठता मान्य करतात. परिस्थिती त्याच्या पुढे वाकते. परिस्थितीचा दास होण्याऐवजी तो तिचा पती बनतो. जिद्दीमुळे तो नकळतच धैर्यवान बनतो, व अशक्य वाटणारी कामे लीलेने पार पाडतो. अनेक माणसे गुण असूनही जिद्दीच्या अभावामुळे जीवनात अयशस्वी ठरतात. जो तरुण जीवनात पदार्पण करताना अंगीकृत कार्याबद्दल जिद्द बाळगत नाही, दुसऱ्यापुढे नमतो, परिस्थितीपुढे मान टाकतो, जो ध्येयाला चिकटून राहत नाही तो यशस्वी कसा बरे होईल ? पुष्कळ लोक बोटचेपे असतात. त्यांच्याने ' नाही ' म्हणवत नाही, मित्राची चिठ्ठी आली की मित्रप्रेमामुळे आपली तत्त्वे गुंडाळून ठेवतात. वशिल्याला बळी पडतात. त्यांच्या हातून काय होणार ?

नेपोलियनच्या अत्यंत यशस्वी मोहिमांत ' मारेंगो 'च्या संग्रामाची गणना होते. पण नेपोलियनने तो संग्राम केवळ आपल्या जिद्दीच्या जोरावर जिंकला. फ्रेंच विरुद्ध ऑस्ट्रिया असा लढा होता. उत्तर इटलीच्या मैदानांत हा निर्णायक संग्राम लढला गेला. फ्रेंच सैन्यसंख्या ऑस्ट्रियन सैन्यापेक्षा पुष्कळच कमी होती. पहिल्या धडकीनंतर फ्रेंच फौज मागे हटू लागली. दोन्ही फ्रेंच बगलांवर ऑस्ट्रियन तुटून पडले. फ्रेंचांची उजवी व डावी फळी माघार घेऊ लागली. ऑस्ट्रियन सेनानीने फ्रेंच बगला गुंडाळण्याकरता आपल्या मध्य विभागातील काही हिस्से बगलांवर पाठविले. दिवस कठीण होता. खुद्द फ्रेंच सेनानी व फौजेला आपला पराजय होत आहे हे दिसत होते. पण नेपोलियन शान्तपणे एका उंचवट्यावर उभा होता.

९६७६०

तो जिद्दीने पाय रोवून उभा होता. बगलफळ्या माघार घेऊ लागलेल्या पाहून जवळचे सेनानी नेपोलियनला माघार घेण्याचा सल्ला देऊ लागले. पण नेपोलियन दुर्बिणीतून शत्रूच्या व्यूहाकडे पाहत होता. इतक्यात त्याच्या गरुड दृष्टीस शत्रूच्या मध्य फळीतील पथके बगलेवर पाठविली गेल्यामुळे मधली फळी कमकुवत झालेली दिसली. हाच मोक्याचा क्षण होता. नेपोलियनने दुर्बिण खाली केली व भोवतालच्या लोकांस म्हणाला, "कोण म्हणतो आपला पराभव झाला? हाच विजयाचा क्षण आहे. पाहा आता माझी करामत." नेपोलियनचे प्रसिद्ध गार्ड पथक राखीव होते. नेपोलियनने तत्काळ सर्व तोफा शत्रूच्या मध्य-फळीवर रोखल्या व त्यावर धुवाँधार गोळ्यांचा वर्षाव केला! तोफांच्या जबरदस्त मारागिरीमुळे शत्रूची मधली फळी कोलमडू लागली. त्यासरशी नेपोलियनने आपल्या करारी गार्ड डिव्हिजनला शत्रूच्या मध्यावर तुटून पडण्याचा हुकूम दिला. शत्रूची फळी फुटली; शत्रूच्या पिछाडीस जाऊन गार्ड डिव्हिजनने पुढे घुसणाऱ्या शत्रूच्या बगलांवर हल्ले चढविले. त्याबरोबर माघार घेणाऱ्या फ्रेंच बगला उलटून पाठीवर येणाऱ्या शत्रूच्या बगलांवर तुटून पडल्या. ऑस्ट्रियन फौजेचा धुव्वा उडाला, व नेपोलियनला अपूर्व विजय मिळाला! नेपोलियनने कच खाल्ली नाही. जो जिद्दीने पाय रोवून उभा राहिला म्हणूनच विजयी झाला.

मागल्या पिढीत अशी अनेक जिद्दीची माणसे नाव कमावून गेली. म्युनिसिपालिटीच्या कंदिलाच्या उजेडात अभ्यास करून दारिद्र्याशी, अवहेलनेशी मुकाबला करून अनेकांनी जीवनात यश, कीर्ती व संपत्ती मिळविली. जिद्द असेल तर नराचा नारायण होऊ शकतो. रामशास्त्र्यांच्या मालकाने केलेल्या अवहेलनेमुळे विद्याप्राप्तीची जिद्द उत्पन्न झाली, व त्या जिद्दीमुळेच रामशास्त्री, मराठेशाहीचे सरन्यायाधीश बनले! आंधळी, पांगळी माणसे जिद्दीच्या जोरावर यशस्वी होऊ शकतात. तुरुंगातील

कैदी पदवीधर होऊ शकतात. यश, कीर्ती आणि पैसा जिद्दार माणसाच्या मागे चालत येतात. जिद्दीमुळेच कोलंबस अमेरिका शोधून काढू शकला. जिद्दीमुळेच ऑफिसमध्ये झाडलोट करणाऱ्या पोऱ्याचा ब्रिटिश वृत्तपत्रसृष्टीचा बादशहा लार्ड नॉर्थक्लिफ झाला !

१९४० साली इंग्लंडचा सर्वत्र पराभव होत होता. फ्रान्स पडले. जर्मन फौजा इजिप्तच्या सरहद्दीवर पोचल्या. जपानने भारताच्या सरहद्दी-पासून मध्य पॅसिफिकपर्यंत आपले विजयी झेंडे नाचविले. पण चर्चिल नाउमेद झाला नाही. लढाई जिंकण्याची त्याची जिद्द होती. आपल्या भाषणांनी त्याने इंग्लिश जनतेत आत्मविश्वास, धैर्य निर्माण केले. त्याच्या इशाऱ्यावर जनता रक्ताचे पाणी करीत होती. म्हणूनच शेवटी इंग्लंड विजयी झाले. त्याचे मुख्य श्रेय चर्चिलच्या जिद्दीलाच दिले पाहिजे !

जिद्द नसेल तर गुण मातीमोल ठरतात. जिद्द तुम्हांस आपल्या पायावर उभी करते. जीवनातील यशाच्या मार्गात कितीतरी अडचणी, किती खाचखळगे असतात. अज्ञान, अंध रूढी, सामाजिक चालीरीती, भित्रेपणा, परावलंबन, आत्मविश्वासाचा अभाव या गोष्टी आपणास मागे खेचीत असतात. मोहाला बळी पडून आपण ध्येयाचा मार्ग सोडतो. पण जर जिद्द असेल तर वाकडा रस्ता सरळ होतो. अडचणी भुईसपाट होतात. मनुष्य आपल्या पायावर उभा राहतो, रूढीची बंधने तोडतो. जिद्द भित्र्याला शूर व आंधळ्याला डोळस बनविते. जिद्द तुम्हांस प्रयत्न-वादी बनविते, व यशोमंदिराप्रत पोचविते. म्हणून तुम्ही जे काही काम हाती घ्याल ते पोटतिडकीने-जिद्दीने करा, तरच तुम्ही यशस्वी व्हाल !

# भीती करी सर्वस्वाची माती

१६

जीवनात जर कोणती गोष्ट कटाक्षाने टाळायची असेल तर ती भीती होय. भीती सर्वस्वाची माती करून टाकते. भीती ही एक मानसिक विकृती आहे. भीतीने एकदा तुमच्या मनांत मूळ धरले की, पिंपळाच्या मुळ्या जसा पार उलथून टाकतात त्याप्रमाणे तुमच्या कर्तृत्वाची इमारत कोसळल्याशिवाय राहणार नाही. आपल्याकडे लहान मूल रडू लागले, हट्ट धरून बसले की त्याला त्याची आई, वडील किंवा भाऊ—वहिणी कसली तरी भीती दाखवतात. 'आला बागुलबोवा' म्हणून घोंगडी पांघरून त्याच्यापुढे वेडेवाकडे नाचतात. पोर भीतीने गप्प बसते. पण त्या कोवळ्या मुलाच्या मनावर आपण काय भयंकर आघात करीत आहोत याचे कोणासही भान राहत नाही. नव्याने जन्मलेल्या अर्भकास भीती माहीत नसते. घरची वडीलधारी माणसे त्याला भीती शिकवितात. पण त्यामुळे आपण त्याच्या जीवनाची नासाडी करीत आहोत हे त्यांना कळत नाही. ही भीती त्या अर्भकाला पुढे जन्मभर छळते. यशाचा पेला त्याच्या हातातून हिसकून घेते, त्याचे कर्तृत्व मातीमोल करून टाकते. म्हणून लहानपणापासून भीतीच्या आहारी जाऊ नका. तिची शृंखला वेळीच तोडून टाका. भीतीच्या साखळदंडाने जखडून टाकलेला जीव जीवनसागरात बुडाल्याशिवाय राहणार नाही. भीतीच्या विषाने तुमच्या गुणांचा, कर्तृत्वाच्या दुधाचा पेला नासून जातो हे लक्षात ठेवा.

ज्या माणसाचे धैर्य ऐन वेळी खचते तो जगात काहीच साधू शकत

नाही. उलट, बाजू अंगावर उलटत असताना सुद्धा ज्याचा चेहरा हसरा असतो त्याला पाहून हा माणूस जगावेगळा आहे,—हा मर्द आहे असे आपणास वाटते. काही लोक जन्मभर चिरचिरच करीत राहतात. त्यांना कशातच समाधान वाटत नाही. बारावे असो किंवा बारसे असो, यांचा चेहरा रडका तो रडकाच राहतो. हे लोक दुसऱ्याचे जीवनही नासवून टाकतात. ते जेथे जातील तेथे भीती, शंका, निराशा यांचे वातावरण निर्माण करतात. या जगात विधात्याने आपणास रडण्याकरता जन्मास घातलेले नाही. देदीप्यमान ताऱ्यांनी खचून भरलेले निळे आकाश, आपल्या स्निग्ध प्रकाशाने सर्वांना मोहून टाकणारा चंद्रप्रकाश, आपल्या जीवनदायी प्रभेने जगाला जगविणारा सूर्य, उत्तुंग, शान्त पर्वतराशीवर सुशोभित दिसणारा हिमाचा पांढरा शुभ्र मुकुट, आपल्या गारव्याने व फुलांच्या मदाने आपणास पुलकित करणारा वारा, सकाळ-सायंकाळ कुशल चित्रकाराला मोहून टाकणारे आकाशाचे रंग, उषःकालाचा गुलाबी रंग, संध्येची लाली, मनाला मोहून टाकणारे फुलांचे रंग, खळखळ वाहणाऱ्या निर्झराचे संगीत, डेरेदार वृक्षांची छाया, वनातील वृक्षराजीचा जीवंतपणा दाखविणारा हिरवेपणा—या सर्व देणग्या ईश्वराने मानवाला सुखी करण्याकरता दिल्या आहेत. पण या ईश्वरी इच्छेला विसरून मानव स्वतःच्या कृतीने स्वतःकरता दुःख निर्माण करीत असतो, स्वतःच्याच मनाने विकृती निर्माण करतो, सरळ असेल तेथे वाकडे पाहतो, सुखाच्या जागी दुःख उत्पन्न करतो.

या जगात आपण निर्भयतेने राहावयास शिकले पाहिजे. हे जग आपल्याकरता, आपल्या सुखाकरता आहे असा विश्वास बाळगला पाहिजे, तरच आपण सुखी जीवन जगू शकू. जो सारखी जगाची, शेजाऱ्याची, शत्रूची, अडचणींची, उंचाईची, दारिद्र्याची भीती बाळगतो तो कधीच सुखी होत नाही. भीतीच्या बागुलबोवास तुम्ही घाबरलात तर तुम्ही

निष्क्रिय बनाल. तुमच्या हातून कोणतेच काम होणार नाही. तुम्हांस जगात काहीही साधता येणार नाही. या भीतीमुळे आपण दोरीस साप समजतो, व झाडाच्या फांद्यांतून पडणाऱ्या मानवी आकृतीसारख्या दिसणाऱ्या प्रकाशास भूत समजतो. " वाजे पाऊल आपले, म्हणे मागे कोण आले " असा संदेह निर्माण होतो. ' भित्यापाठी ब्रह्मराक्षस ' ही मराठी म्हण हेच दर्शविते. आपण निष्कारण भीती बाळगतो.

भीतीचे मूळ अज्ञानात, अंध रूढीत, दौर्बल्यात असते. मला आठवत की त्या वेळी मी १२–१३ वर्षांचा होतो. मी पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिकत होतो. आमचे सुपरिन्टेन्डेन्ट फार व्यवहारी होते. ते खरे शिक्षणतज्ज्ञ होते. होळीच्या सणाच्या वेळी आमच्या वेळी बीभत्स रंगास ऊत येई. लहान-थोर माणसेही होळीच्या प्रसंगी गलिच्छ भाषा वापरीत. यापासून मुलांना दूर कसे ठेवावे ? त्यांना गलिच्छ वातावरणातून बाहेर कसे काढावे ? या गोष्टीचा विचार करून सुपरिंटेंडेंटनी होळीच्या सणाचे वेळी कबूतरखान्याच्या शाळेच्या मैदानात मुलांनी येऊन रात्रभर फुटबॉल, हुतूतू, आट्यापाट्या, खोखो, शिवाशिवी हे खेळ खेळावे, कविता पोवाडे म्हणावे, अशी प्रथा सुरू केली. जेवढी मुले खेळावयास येतील त्या सर्वांना रात्री १२–१ वाजता कॉफी पिण्यास देण्यात येई. आमचे तालीम मास्तर कै. श्री. दातार हे देखरेख ठेवीत.

एकदा होळीच्या दिवशी सायंकाळी त्यांचे कोणी नातेवाईक वारले. त्यांच्या अंत्ययात्रेस, निदान त्यांच्या दहनाच्या वेळी तरी श्री. दातार यांना हजर राहणे आवश्यक होते. पण कबूतरखान्यातील व्यवस्था त्यांच्याकडे असल्यामुळे त्यांनी दहनाच्या वेळी ॐकारेश्वरावरच जाण्याचे ठरविले. ते ग्राऊंडवर आले. मुले खेळू लागली. सुमारे बारा वाजण्याच्या सुमारास त्यांनी मला व जोशी नावाच्या दुसऱ्या एका मुलास हाक मारली व म्हटले, " तुम्ही दोघे ॐकारेश्वराच्या

दहनभूमीवर जाऊन आमच्या नातेवाइकाचे प्रेत आले का नाही ते पाहून या. ते आले असले तर मी जाऊन येईन " मास्तरांची आज्ञा. पण ती ऐकून आमच्या पोटात गोळा उभा राहिला. मध्यरात्रीची वेळ होती. कबूतरखान्यापासून मेहेंदळे मारुतीवरून ॐकारेश्वर फार लांब नव्हता, पण मेहेंदळे मारुतीच्या थोडे पुढे एक मोठे चिंचेचे झाड होते. त्यावर भूत आहे अशी समजूत होती. तो रस्ता अगदी निर्जन. एका बाजूस तर नदीच होती. भूत झपाटेल ही भीती. तशात जायचे स्मशानात. तेथे तर भुतांचे वास्तव्यच असते अशी कल्पना. पण मास्तरांना ' जात नाही ' म्हणण्याची छाती नव्हती. शिवाय आपला भित्रेपणा जाहीर होण्याची भीती. शेवटी आम्ही जीव मुठीत धरून निघालो. मेहेंदळे मारुती ते ॐकारेश्वर या रस्त्यावर माणूस नव्हते. चिंचेच्या फांद्यांतून चंद्रप्रकाशाचे पांढरे डाग रस्त्यावर पडले होते. तीच भुते ! रामाच्या नावाला भुते भितात अशी प्रामाणिक समजूत. जानव्याची ब्रह्मगाठ मुठीत धरून तोंडाने ' राम ' ' राम ' म्हणत मेहेंदळे मारुती-पासून आम्ही जे पळत निघालो ते ॐकारेश्वराच्या देवळापाशी श्वास सोडला. ऑलिम्पिक सामन्यातही कोणी पळाले नसेल इतक्या वेगाने आम्ही पळालो ! पण वाटेत आम्हांस भुताने पछाडले नाही. झाडा-खालून पळताना लांबून वाटणाऱ्या पांढऱ्या आकृती भुते नसून चंद्र-प्रकाश आहे अशी आमची खात्री पटली. मास्तरांची नातेवाईक माणसे येऊन पोचली होती. आता आमची भीती चेपली होती. परत येताना आम्ही पळत न येता सावकाश आलो, अगदी चिंचेखालून आलो. भूत नव्हते. आमची भुताची भीती गाडली गेली. ग्राउंडवर परत येऊन, ' आम्ही ॐकारेश्वरापर्यंत जाऊन आलो ' असे ऐटीने सांगताच अनेकांच्या चेहऱ्यांवर आमच्याबद्दल आश्चर्यमिश्रित आदर दिसून आला. पण आम्ही जर त्या रात्री गेलो नसतो तर भुताच्या भीतीने आम्हांस

कदाचित अजूनही सोडले नसते.

भीती तुम्हास लंगडे करून टाकते. सुरुंगाने मोठाले बुरूज, किल्ले, डोंगर उडवून देता येतात. भीती सुरुंगासारखी आहे. ती तुमच्या कर्तृत्वाचे बुरूज उद्ध्वस्त करून टाकते. ती तुमचा आत्मविश्वास नष्ट करते, तुम्हांस लाचार बनविते. तोतरा मनुष्य भीतीमुळे जास्त तोतरा बनतो. वरिष्ठापुढे मान वर करून बोलण्याचे धैर्य तुम्हांस होत नाही. दुसरे हसतील ह्या भीतीने आपली ध्येये, आपल्या आशाआकांक्षा, आपल्या कल्पना दुसऱ्यास सांगण्याचे धैर्य तुम्हांस होत नाही. त्यामुळे अनेकांची कल्पकता मातीमोल होते. अनेक कल्पनांना, ध्येयांना जग मुकते. अनेक काव्ये, कादंबऱ्या प्रकाशित होत नाहीत. जर पोपची भीती मार्टिन ल्यूथरने बाळगली असती तर धर्मसुधारणा झाली नसती. कोलंबसाने भीती बाळगली असती तर अमेरिकेचा शोध लागला नसता, वास्को-ड-गामा भारताचा जलमार्ग शोधू शकला नसता. मोगल व विजापूरच्या सुलतानांची भीती शिवाजीने बाळगली असती तर स्वराज्य-स्थापना झाली नसती.

निर्भयपणापुढे सर्व संकटे पळून जातात. निर्भय माणसाला वाटेतील खाचखळगे, अडचणी, भिववू शकत नाहीत. भीतीचे भूत निर्भयतेच्या रामनामापुढे मान टाकते. निश्चयाची ब्रह्मगाठ सर्व गुंता सोडविते.

अंधरूढीमुळे आपण अनेक गोष्टींबद्दल निष्कारण भीती बाळगतो. कोणी शिडीखालून जात नाही. मांजर आडवे गेले, विधवा समोर आली की, कार्य होणार नाही अशी भीती अनेकांस वाटते. कोणी मीठ सांडणे अशुभ समजतात. कोणी शनीची तर कोणी मंगळाची भीती बाळगतो. आता मनुष्य चंद्राभोवती, पृथ्वीभोवती उपग्रह सोडू लागला आहे. विज्ञानाच्या प्रकाशझोतापुढे अंधविश्वाचा अंधेर लोपला आहे. खुळ्या कल्पनांना आपल्या मनांत थारा देऊ नका.

नेल्सन आपल्या निर्भयपणाबद्दल प्रसिद्ध होता. लहानपणी एके दिवशी संध्याकाळ झाली तरी तो घरी परतला नाही. त्याच्या आजीस काळजी वाटून तिने शोधाकरता माणसे पाठविली. छोटा नेल्सन एका ओढ्याच्या काठी मजेत बसला होता घरी आल्यावर आजीने त्यास विचारले, "मूर्खा, अंधारात एकटे हिंडण्यात तुला भीती कशी वाटली नाही?" त्यावर नेल्सन म्हणाला, "भीती? भीती म्हणजे काय ग आजी?" हाच नेल्सन पुढे इंग्लंडचा दर्यासारंग बनला. लढाईत त्याचा एक डोळा गेला. एक हात तुटला. कोपनहेगनच्या नाविक लढाईत वरिष्ठ दर्यासारंगास किनाऱ्यावरील तोफांची भीती वाटली. शत्रूचे आरमार बंदरात उभे होते. तोफांचे गोळे ब्रिटिश आरमार व बंदर यांच्या मध्ये पडत होते. जहाजे त्यांच्या तडाक्यात सापडतील तर खलास होतील अशी या दर्यासारंगास भीती वाटली. म्हणून त्याने आरमारास मागे फिरण्याचा हुकूम दिला. त्या काळी नाविकदलात सांकेतिक निशाणांनी हुकूम दिले जात. पण नेल्सन धाडसी होता. त्याला पलायन करणे पसंत पडले नाही. एकदा ब्रिटिश जहाजे तोफांच्या मारागिरीतून पुढे घुसली की, विजय मिळवतील अशी त्याची खात्री होती. हाताखालच्या अधिकाऱ्याने सर दर्यासारंगाच्या माघार घेण्याच्या हुकमाच्या निशाणाकडे नेल्सनचे लक्ष वेधले. पण निडर नेल्सनने हुकूम मोडण्याचा निर्णय घेतला. त्याने मुद्दाम आंधळ्या डोळ्यास दुर्बीण लावून म्हटले, "मला तर माघार घेण्याच्या हुकमाची निशाणे दिसत नाहीत. चला, आपल्या काफिल्यास बंदरातील शत्रूच्या जहाजावर तुटून पडण्याचा हुकूम द्या." जहाजे पुढे घुसली. एकदा तोफखान्याच्या टप्प्यातून पुढे घुसल्यावर ती शत्रुदलावर तुटून पडली. शत्रूचा धुव्वा उडाला! अपूर्व विजय मिळाला. याचे कारण एकच—व ते म्हणजे नेल्सनचा निर्भयपणा!

# माझा देश

१७

'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी' या संस्कृत सुभाषितात जन्मभूमीची महत्ता सांगितली आहे. ज्या देशात आपण जन्मतो, ज्या देशातील धान्य, कंदमुळांनी आपले पोषण होते, व मृत्यूनंतर जिच्याशी आपण फिरून एकरूप होतो त्या जन्मभूमीचे ऋण फेडणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. ज्या देशात आपला जन्म होतो त्यास आपण मातृभूमी म्हणतो, म्हणजेच आपली 'आई' मानतो. आईचे पांग फेडणे हे अपत्याचे कर्तव्यच आहे.

आपले भाग्य म्हणून आपल्याला या प्राचीन भरतभूमीत जन्म मिळाला आहे. हजारो वर्षे आपला हा देश इतिहास घडवीत आहे. प्राचीन द्रष्ट्या ऋषींनी याच भूमीत अमर वेद व उपनिषदांची रचना केली. याच देशात आपल्या तपाने व अविरत प्रयत्नांनी भगीरथाने हिमालयातून गंगामातेस खाली मैदानात आणून आपली भूमी सजलां सुफलां केली. याच भूमीत भगवान रामचंद्राने आसेतुहिमाचल आर्यसंस्कृती फैलावून आपल्या 'रामराज्या'ने जनतेस सुखी केले. याच भारतात सत्य व न्यायाच्या प्रस्थापनेसाठी भीषण भारतीय संग्राम लढला गेला, व त्याच प्रसंगी युगानुयुगे भारताला कार्यप्रवण करण्याकरता भगवान श्रीकृष्णाने कर्मयोग शिकविला. मानवतेचा, अहिंसेचा, शान्ती-समतेचा संदेश जगास देणारे भगवान बुद्ध याच भारतात जन्मले. शस्त्रसंन्यास करून सत्य-अहिंसेवर आधारलेले साम्राज्य प्रस्थापित

करणारा सम्राट अशोक याच भारतभूमीचा सुपुत्र होता. आपल्या बुद्धिमत्तेने कार्यक्षम राज्ययंत्रणा कशी चालवावी हे आपल्या 'अर्थशास्त्र' द्वारे शिकविणारा आर्य चाणक्य भारतीयच होता. मौर्य साम्राज्याच्या नाशानंतर शक-हूणांनी ग्रासलेल्या भारतास मुक्त करून वैभवास चढविणाऱ्या गुप्त सम्राटांना भारतीय म्हणवून घेण्यातच अभिमान वाटत होता. पाश्चात्य विद्वान ज्याच्या प्रतिभेने मोहित होऊन ज्याच्या 'शाकुंतला'स अक्षरशः डोक्यावर घेऊन नाचले तो कविकुलगुरू कालिदास याच भारतात जन्मला. आपला पराक्रम, त्याग, विद्वत्ता व उदारता यांनी ह्यूएन्त्संगला वेड लावणारा हर्ष भारतीय होता. याच भारतातील धाडसी नाविकांनी ब्रह्मदेश, मलाया, इंडोनेशिया, सयाम, इंडोचायना येथे भारतीय संस्कृती, भाषा व धर्म यांच्या पताका फडकविल्या. युरोपखंडात गणित प्रगत होण्यापूर्वी सहा शतके भास्कराचार्यांनी गणितशास्त्रातील सिद्धान्त शिकविले ते याच भरतखंडात. मुसलमानी अत्याचारांनी चोहोकडे हाहाःकार उडविला असताना ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, नरसी मेहता, चैतन्य, कबीर, तुलसीदास, पुरंदरदास, मीराबाई, नानक यांनी भक्तिमार्गाद्वारा हिंदु धर्म व समाज टिकविला, समानता शिकविली, व देशभाषा समृद्ध केल्या. स्वत्वाचा विसर पडलेल्या, परक्यांच्या दास्यातच भूषण मानणाऱ्या भारतीयांस खडबडून जागे करून 'हिंदवी' स्वराज्याची घोषणा करणारे युगपुरुष शिवाजीमहाराज याच भारतमातेच्या कुशीत जन्मले होते. स्वातंत्र्य व स्वाभिमान याकरता सर्व विजयी मोगलशाहीस आव्हान देऊन आपल्या असीम धैर्याने, त्यागाने व ध्येयनिष्ठेने आजही आपणास नतमस्तक बनविणारा राणा प्रताप हा भारतमातेचाच पुत्र होता.

इतिहासाचे रहाटगाडगे नेहमी फिरत असते. मोगल, मराठे, शीख, हतवीर्य झाले. आपणास आपल्या स्वतःचा विसर पडल्यामुळे साता समुद्रां-

पलीकडून येऊन इंग्रजांनी आपणास आपले गुलाम बनविले. पण पायाला परदास्याच्या शृंखलांचा थंड स्पर्श होतांच भारतीयातील विचक्षण बुद्धी असलेले द्रष्टे आत्मसंशोधन करू लागले, व त्यातूनच राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद, स्वामी विवेकानंद यांच्या धार्मिक पुनरुत्थानाच्या चळवळीस प्रारंभ झाला. भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना झाली, व भारत मातेस फिरून स्वतंत्र बनविण्याची चळवळ सुरू झाली. ही पाहा या थोर देशभक्तांची मालिका : न्यायमूर्ती रानडे, दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बानर्जी, गोपाळ कृष्ण गोखले--यांनी स्वराज्यमंदिराचा पाया घातला. लोकमान्यांनी आपल्या अतुल त्यागाने त्यावर मंदिर उभारले, व शेवटी महात्मा गांधींनी त्यावर कळस चढविला. हजारो लोकांनी हसत-मुखाने कारावास पत्करला. लाठ्या-बंदुकांच्या गोळ्या झेलल्या. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, शामजी कृष्ण वर्मा, खुदीराम बोस, विष्णुपंत पिंगळे, बाबा खरकसिंग, भगतसिंग, दत्त, राजगुरू, चंद्रशेखर आझाद या क्रान्तिकारकांनी स्वातंत्र्यकुंडात आत्मबलिदान, करून हा अग्नी प्रज्वलित ठेवला. नेताजींनी खड्गाने स्वातंत्र्याचा रथ चार पावले पुढे ढकलला. १९४७ साली आपला भारत फिरून स्वतंत्र झाला.

आता हे स्वातंत्र्य टिकविणे व स्वातंत्र्याचे सुराज्यात, रामराज्यात परिवर्तन करणे हे तुमचे काम आहे. हे काम तुम्ही नाही का पार पाडणार ? मागल्या पिढीने हे स्वातंत्र्य मिळविले ते स्वतःकरता नाही; ते भावी पिढ्यांकरता मिळविले आहे. आपल्या प्रिय भारतावर फिरून दुष्ट शत्रूंची छाया पडू न देणे तुमचे,—या नव्या पिढीचे काम आहे. पाकिस्तान आपला कायमचा शत्रू होऊन बसला आहे. त्यातच १९६२ सालच्या ऑक्टोबर महिन्यात चीनने भारतावर आक्रमण केले. आपल्या प्रिय मातृभूमीचा काही भाग अजूनही चिनी आक्रमकांच्या हाती आहे. तो आपण सोडविला पाहिजे; तेव्हाच आपले स्वातंत्र्य व

सार्वभौमत्व निष्कलंक होईल. हे साधण्याकरता—आपल्या शत्रूंनी फिरून आपल्या देशाकडे वाकड्या नजरेने पाहू नये म्हणून, आपण बलशाली, उद्योगपरायण, कर्तव्यरत बनले पाहिजे. तरच आपला तरणोपाय आहे. नाही तर एक शतकभर लढा देऊन—अश्रू, श्रम, व बलिदान करून मिळविलेले स्वातंत्र्य आपण गमावून बसू. फिरून आपल्या नशिबी गुलामगिरी येईल. स्वातंत्र्य गमावण्याची कल्पना सहन होणारा एकही नतद्रष्ट भारतीय असेल असे वाटत नाही. आपल्या देशात राज्ययंत्रणेत दोष असतील, पुढाऱ्यांत उणीवा असतील,—पण ही यंत्रणा, हे स्वातंत्र्य आपले आहे. लोकशाहीत लोक आजचे सरकार उद्या बदलू शकतात. अंतिम सत्ता, अंतिम अधिकार जनतेच्या हाती आहेत. म्हणून यंत्रणेस, सरकारला दोष देणे व्यर्थ आहे. लोकांच्या पात्रतेप्रमाणे त्यांना राज्यकर्ते लाभतात असे इंग्रजीत म्हणतात,—(People get the Government they deserve) म्हणून लोकांची पात्रता उंचावली पाहिजे. लोकांना योग्य शिक्षण दिले पाहिजे. त्यांचे योग्य मार्गदर्शन केले पाहिजे. ते कोण करणार? आज शाळा-कॉलेजांत शिकणारी मुलेच उद्याचे पुढारी आहेत. तेच या आपल्या प्रिय देशाचे उद्याचे भवितव्य घडविणार आहेत. त्यांनीच आपल्या अंगी पात्रता आणली पाहिजे, आपले ज्ञान वाढविले पाहिजे, ध्येयनिष्ठा अंगी बाणविली पाहिजे. तरच उद्याचा भविष्यकाळ उज्ज्वल होईल!

तरुणांनो! भविष्यकाळ तुम्हांस आवाहन करीत आहे. आपली प्रिय मातृभूमी तुमच्याकडे अपेक्षेने पाहत आहे. या अपेक्षा तुम्हीच पुऱ्या करणार ना? माझी खात्री आहे की, तुम्ही आपल्या मातृभूमीचे पांग फेडल्याशिवाय राहणार नाही. तुम्ही आपल्या देशास मोठे केलेत तरच तुम्ही मोठे ठराल. इतिहास तुम्हास देशाचे भाग्यविधाते म्हणून गौरवील. आज आपल्या देशास चारित्र्यसंपन्न, ध्येयनिष्ठ, त्यागी,

उद्योगी, स्वावलंबी पुढाऱ्यांची आवश्यकता आहे. असे नेते मिळाले तर भारत जगाचे भूषण ठरेल,–जगाचे मार्गदर्शन करील !

तुम्ही डॉक्टर व्हा, वकील व्हा, इंजिनीयर व्हा, उद्योगपती व्हा, शिक्षक व्हा,–किंवा सामान्य मजूर, कारकून, शेतकरी व्हा–पण जे क्षेत्र निवडाल त्यात प्रामाणिकपणे, निरलसपणे, चिकाटीने, जिद्दीने, ध्येयनिष्ठेने काम करा !

आज लाखो लोक वेळेवर वैद्यकीय चिकित्सा व औषधोपचार उपलब्ध न झाल्यामुळे मृत्युमुखी पडत आहेत. तुम्ही डॉक्टर झालात तर पैसे जरूर मिळवा, पण त्याचा काही भाग व आपल्या वेळेतील काही वेळ गरीब, दीन, असहाय बांधवांकरता राखून ठेवा. पडसे झालेल्या श्रीमंताकडे मिळणाऱ्या फीवर दृष्टी ठेवून मोटारींतून धावत जाण्यापेक्षा दोन पैसेही फी देऊ न शकणाऱ्या रुग्णास आधी औषधोपचार करा. डॉक्टरी विद्या घेतल्यावर तुम्हांस वैद्यकीची शपथ (oath of Hyppocretes) ध्यावी लागते—‘ मी माझ्या ज्ञानाचा, कौशल्याचा उपयोग दुःखितांचे दुःख दूर करण्याकडे करीन.’ ती शपथ विसरू नका. रुग्णाच्या पैशापेक्षा रुग्णाच्या तंदुरुस्तीकडे अधिक लक्ष द्या. “A doctor should care more for the pulse of the patient than for the purse of his patient.” गरीब निराश्रिताला औषधोपचार करून तुम्हांस पैसे मिळणार नाहीत, पण त्याच्या डोळ्यांत खेळणाऱ्या कृतज्ञतेचे पाणी व आपण सत्कृत्य केल्याचे, कर्तव्य केल्याचे, जे समाधान तुम्हांस लाभेल ते तुम्हांस मिळणाऱ्या फीपेक्षा शतपटीने अधिक मौल्यवान आहे. काही लोक लुच्चे निघाले म्हणून शंभर सच्चांवर अन्याय करू नका; त्यांच्याबाबत निष्ठुर होऊ नका. फी बुडवणारे श्रीमंतसुद्धा आढळतातच ना ? मानवतेच्या सेवेचे कंकण तुम्ही हाती बांधल्यावर उदारतेवर बंधने घालू नका. आपल्या देशबांधवांची सेवा

हीच देशाची सेवा होय. दगडामातीने, डोंगर-नद्यांनी, पशुपक्ष्यांनी व्याप्त विभागास देश म्हणत नाहीत. लोकांचा देश बनतो. लोक आहेत म्हणूनच देश आहे. तुमच्या ज्ञानाचा फायदा या लोकांस म्हणजेच या देशास द्या. रोगमुक्त जनताच देशाला बलवान बनविते !

तुम्ही शिक्षणक्षेत्रात प्रवेश केला तर ज्ञानदानाचे ध्येय पुढे ठेवा. शिक्षकाचा पेशा केवळ द्रव्यार्जनाचा पेशा नाही हे प्रथम लक्षात ठेवा. प्राचीनकाळच्या आश्रमवासी ऋषींप्रमाणे तुम्हांस विनामूल्य ज्ञानदान करता येणार नाही हे खरे आहे. पण केवळ पगाराच्या पाकिटाकरता शिक्षक बनू नका. सगळ्या पेशांमध्ये वैद्यकी व शिक्षक यांचा पेशा अधिक उच्च आहे. ज्ञानदान हे पवित्र काम आहे. तांबटाप्रमाणे हातोडे मारून भांडी घडवणे हे तुमचे काम नाही, तर आपल्या विद्यार्थ्यांच्या मनावर संस्कार करून त्यांस खऱ्या ज्ञानाची गोडी लावणे, त्यांच्यात सत्प्रवृत्ती निर्माण करणे, त्यांच्यात अन्यायाची चीड, न्याय व सत्याची चाड, समाजसेवेची गोडी, त्याग व उदारतेची महत्ता, सहिष्णुतेचे मूल्य ठसविणे तुमचे कर्तव्य आहे. आजची मुले उद्याचे भाग्यविधाते आहेत. पण त्यांना तसे बनविण्याचे काम तुमचे आहे. तुम्ही त्यांचे चारित्र्य जसे घडवाल, त्यांच्यात गुणांची जोपासना जशी कराल त्याप्रमाणे ते बनतील. लहान मुले मोठ्यांचे अनुकरण करतात. म्हणून तुम्हांस आपले चारित्र्य आदर्श ठेवले पाहिजे. ' मी या देशाचे भावी नागरिक चारित्र्यसंपन्न, देशाभिमानी बनवीन ' अशी तुम्ही आकांक्षा बाळगली पाहिजे. तुमचे विद्यार्थी उद्याचे नेते बनले तर तेच तुमचे खरे बक्षीस, तीच तुमची खरी गुरुदक्षिणा ठरेल !

तुम्ही व्यापारी व्हा. अर्थकारण जरूर करा, द्रव्यार्जन करा,—पण जनतेस लुटण्याची वाटमारी वृत्ती ठेवू नका. तुमचा फायदा दुसऱ्याची लुबाडणूक असता कामा नये. तुम्ही उद्योगपती व्हा, पण लोकांच्या

गरजांचा फायदा घेऊन त्यांना नागवू नका. मजुरांच्या घामावर महाल उठवू नका. मिळालेला सर्व पैसा आपलाच आहे असे समजू नका. ज्या जनतेच्या क्रयशक्तीमुळे तो तुम्हांस मिळाला त्या जनतेचे तुम्ही ऋण लागता हे विसरू नका. लॉर्ड नफील्डने कोट्यवधी रुपये मोटरधंद्यावर मिळवले, पण त्याने कोट्यवधीचा दानधर्म केला हे विसरू नका. एकट्या ऑक्सफर्ड विश्वविद्यालयास त्याने तीन कोटी पौंडांची देणगी दिली. रॉकफेलरने करोडोंची कमाई केली, पण त्याने कोट्यवधी रुपयांचा रॉकफेलर फौन्डेशन ट्रस्ट केला व त्याद्वारे आज मानवतेची सेवा करण्याकरता इस्पितळे, संशोधन-शाळा व अनाथालये काम करीत आहेत. टाटा घराण्याने आपल्या फायद्यातील बहुतांश टाटा चॅरिटीजला दिला आहे, व या चॅरिटीज अनेक क्षेत्रांत विद्यादान, संशोधन, ज्ञानप्रसार, दुःखनिवारण यांसारखी कार्ये करीत आहेत. मिळालेला पैसा परत धंद्यात घाला व आपला देश ऊर्जितावस्थेत आणा. अधिक लोकांना काम मिळवून द्या, अधिक उत्पादन करा, व आपल्या देशाला स्वावलंबी करा !

तुम्ही मजूर असा, कारकून असा,— कोणीही असा; पण आपल्या उद्योगाने, श्रमाने देशाचे हित साधण्याचा प्रयत्न करा. सैनिक देशरक्षणाकरता अघाडीवर लढतात. अधिक उत्पादन करून घरची आघाडी सांभाळणे तुमचे कर्तव्य आहे. आपल्या देशाकरता लागेल तो त्याग करण्याची तयारी ठेवा. वेळ पडली तर आपला देह देशकार्यी अर्पण करा. देशाकरता येणाऱ्या मृत्यूपेक्षा अधिक भाग्याचे मरण कोणतेही नाही. पुढारी येतील व जातील. वेगवेगळे पक्ष अधिकारावर येतील व जातील— पण आपला देश कायम राहणार आहे ! त्याला कायमचा स्वतंत्र ठेवणे, वैभवशाली बनविणे, त्याला विश्वकुटुंबात मानाचे स्थान मिळवून देणे आपले कर्तव्य आहे ! देश आहे म्हणून आपण आहो. हजारो मरोत पण त्यांना पोसणारा, जन्म देणारा देश कायम टिकला

पाहिजे, टिकविला पाहिजे. हनुमानाला ' राम ' कोठे आहे म्हणून विचारताच आपल्या तीक्ष्ण नखांनी स्वतःची छाती फाडून त्याच्या हृदयावर विराजमान झालेल्या रामाचे दर्शन त्याने प्रश्न विचारणाऱ्यास घडविले,—त्याप्रमाणे आपल्या हृदयात देशाला कायमचे स्थान द्या. देशाकरता जगा, देशाकरता मरा. 'केसरी'च्या अग्रलेखावर प्रातःस्मरणीय लोकमान्य टिळकांना उद्देशून लिहिण्यात येणाऱ्या शेवटच्या दोन पंक्तीं-प्रमाणे—

" स्वदेशहितचिंतनाविण दुजी कथा नावडो ।
तुझ्यासमचि आमुची तनुहि देशकार्यी पडो "

या भावनेची जोपासना करा !

जय हिंद !

* * *

म. प्र. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. ९६९६८ नों. दि. ६।८।८५
वि. वा.

IRBK-0116167

IRBK-0116167